# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. ११/०२/२०१०**

आज गुरूवार दि. ११/०२/२०१० रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. ०२/०२/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नलावडे दिनेश दगडू | सभापती, स्थायी समिती |
| २) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ३) | जंगम लक्ष्मण गणपत | विरोधी पक्षनेता |
| ४) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ५) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ६) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ७) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ८) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ९) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ११) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १२) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १३) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १४) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १५) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १६) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १७) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १८) | पाटील शरद केशव | सदस्य |
| १९) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २०) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २१) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २२) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २३) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २४) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २५) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| २६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २७) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| २८) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| २९) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३०) | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | सदस्या |
| ३१) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३२) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३३) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३४) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३५) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३७) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ३८) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ३९) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४०) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४१) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४२) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४४) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४५) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४६) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ४७) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ४८) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ४९) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५०) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५१) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५२) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५३) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५४) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५५) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५६) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५७) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५८) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५९) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६०) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६१) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६२) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६३) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६४) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६५) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६६) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६७) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६८) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ६९) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ४) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| ५) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ६) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ७) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ८) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ९) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| १०) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ११) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १२) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| १३) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| १४) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

**नगरसचिव** :-

मा. महापौरांनी रजेचा अर्ज दिलेला आहे. सभाकामकाज सुरू करण्यापुर्वी राष्ट्रगीत सुरू करण्यापुर्वी मा. पिटासिन अधिकारी म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे. सभागृहामधून मा. पिठासिन अधिकारी म्हणून नेमणूकीसाठी सुचना याव्यात. त्यानंतर सभा कामकाज सुरू होईल.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभागृह नेते श्री. जयंत पाटील साहेबांना मा. पिठासिन अधिकारी म्हणून बसविण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

राष्ट्रीय गीतासाठी सर्वांनी जागेवर उभे राहायचे आहे.

(राष्ट्रीय गीत ''वंदे मातरम'' ने सभेला सुरूवात करण्यात आली.)

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

सभागृहातील सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी आपल्या आजच्या सभेमध्ये दोन नवनिर्वाचित सदस्य आलेले आहेत. त्यांचे सभागृहाच्या वतीने आपण सर्वांनी स्वागत करूया आणि त्यांचा योग्य तो सत्कार नगरसचिव करतील. त्याचबरोबर या सभेमध्ये ज्यांचा सत्कार झाला नाही ते श्री. दिनेश नलावडे, मा. सभापती स्थायी समिती यांचा योग्य तो सत्कार करण्यात यावा अशी मी सुचना करतो.

**नगरसचिव :-**

प्रथम नवनिर्वाचित सदस्य श्री. प्रमोद सामंत यांना मी डायसवर बोलवतो. मा. पिठासिन अधिकारी यांना पुष्पगुच्छ देउन त्यांचे स्वागत करीत आहे. सौ. सरिता म्हात्रे, मा. स्थायी समिती सभापती श्री. दिनेश नलावडे यांनी देखिल याठिकाणी यायचे आहे. त्यांचे देखील मा. पिठासिन अधिकारी पुष्पगुच्छ देउन स्वागत करतील. या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरूवार दि. ११/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. ०२/०२/२०१० रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका लेखापरिक्षण विभागास ISO– 9001-2000 प्रमाणपत्र मिळालेबाबत उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने ISO-9001-2000 या प्रमाणपत्रासाठी इन्टरटेक या संस्थेकडे दि. ०१/०८/२००७ रोजी नोंदणी केलेली होती. या संस्थेने या कालावधीपासून महानगरपालिकेच्या लेखा परिक्षण विभागाची तपासणी चालू ठेवली होती. त्यानुसार आवश्यक बाबींची पूर्तता केल्याने महानगरपालिकेस ISO-9001-2000 प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. याचे सर्व श्रेय महानगरपालिकेचे मा. आयुक्त व मुख्य लेखापरिक्षक श्री. दादासाहेब आनंदराव पाटील यांना व त्यांच्या कर्मचाऱ्यांना जात आहे. ISO-9001-2000 हे प्रमाणपत्र मिरा भाईंदर महानगरपालिकेस मिळणे ही बाब महानगरपालिकेसाठी अभिमानास्पद आहे. तरी याबाबतीत अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**एस. ए. खान :-**

सदर ठरावाल माझे अनुमोदन आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**अभिनंदन ठराव क्र. ४२अ :-**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने ISO-9001-2000 या प्रमाणपत्रासाठी इन्टरटेक या संस्थेकडे दि. ०१/०८/२००७ रोजी नोंदणी केलेली होती. या संस्थेने या कालावधीपासून महानगरपालिकेच्या लेखा परिक्षण विभागाची तपासणी चालू ठेवली होती. त्यानुसार आवश्यक बाबींची पूर्तता केल्याने महानगरपालिकेस ISO-9001-2000 प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. याचे सर्व श्रेय महानगरपालिकेचे मा. आयुक्त व मुख्य लेखापरिक्षक श्री. दादासाहेब आनंदराव पाटील यांना व त्यांच्या कर्मचाऱ्यांना जात आहे. ISO-9001-2000 हे प्रमाणपत्र मिरा भाईंदर महानगरपालिकेस मिळणे ही बाब महानगरपालिकेसाठी अभिमानास्पद आहे. तरी याबाबतीत अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नर्मदा वैती :-**

मी वॉर्ड क्र. ५ च्या रोडबद्दल बोलते. जैन मंदिरापासून राहूलपार्क पर्यंतचा रोड बंद आहे. तुम्ही अजूनपर्यंत चालू केला नाही. तुम्हांला मी किती वेळा पत्र दिले, किती वेळा मी तुम्हांला येउन सांगितले की,

लोकांना तिकडे येण्याजाण्याचा किती त्रास होतो. तो रोड पास केलेला आहे तरी तुम्ही तो रोड का चालू करत नाही? तिकडे एवढा अंधार आहे, तिकडे चो-या होतात. तरी तुम्ही लक्ष देत नाहीत. तुम्ही एक वेळापण माझ्या वॉर्डमध्ये आले नाहीत.

**शानु गोहिल :-**

मा. पिठासीन अधिकारी के परवानगीसे बोलूंगी। सन्मा. नगरसेविका सौ नर्मदाताई वैतीने जो राहूल पार्कका मुद्दा उपस्थित किया है......

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

हा विषय आता विषयपत्रिकेवर नाही.

**नर्मदा वैती :-**

विषयपत्रिकेवर नाही पण आम्हांला बोलायचे आहे. आम्हांला खुप त्रास होतो.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

तुमचा त्रास मला मान्य आहे. मा. आयुक्त साहेब त्याच्याबद्दल निर्णय घेतील.

**नर्मदा वैती :-**

मला उत्तर पाहिजे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

तुम्ही त्यांच्या दालनात जाउन बसा.

**नर्मदा वैती :-**

लोकांना एवढा त्रास आहे. का देत नाहीत? ते लोक टॅक्स भरत नाही?

**शानु गोहिल :-**

मा. आयुक्त साहब, २००२ मे जब हम लोग उस वॉर्ड के नगरसेवक थे। तब महानगरपालिका के तरफ से वहॉ पर रोड का प्रस्ताव पास हो गया था। कॉन्ट्रॅक्टर को काम करने की इजाजत देने के बावजुद भी वहापर अब तक काम चालू हुआ नही। इस विषय को सात वर्ष हो गए। उस एरिया को निगलेक्ट क्यों किया जा रहा है? मै भी संबंधित अधिकारी से इस प्रश्न का उत्तर चाहुंगी।

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, मा. महासभेच्या ठरावाप्रमाणे आम्ही मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भूसंपादनासाठी प्रस्ताव पाठवलेला आहे.

**नर्मदा वैती :-**

साहेब दिलेले आहे हे आम्ही ऐकतच आलो. पण ते कधीपर्यंत होणार?

**मा. आयुक्त :-**

लॅन्ड ॲक्वीझीशन कधी होणार हे आम्ही सांगू शकत नाही. परंतु, लॅन्ड ॲक्वीझीशन मा. महासभेच्या ठरावाप्रमाणे आम्ही पाठवलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. पिठासीन अधिकारी साहेब, दि. ०१/१२/२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता साईबाबा हॉस्पीटलमध्ये एका दर्या दुर्गाराम पुरोहित या १३ वर्षीय शालेय विद्यार्थीनीचे आपल्या गाडी क्र. MH04-M251 या जीपखाली त्या मुलीचा मुत्यु झालेला आहे. मा. आयुक्त साहेब, आम्ही तुमच्याशी चर्चा केली असता आपण सांगितले होते की, आम्ही विषय घेउन येउ. पण अजून आपण विषय आणला नाही.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

आपल्याकडे आजच्या सभेमध्ये बरेचसे विषय आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, एका निष्पाप मुलीचा आपल्या जीपखाली मृत्यु झाला आहे. मा. आयुक्त साहेबांकडे त्यांचे कुटूंबिय पण येउन गेले.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

आजच्या मिटींगमध्ये अत्यंत महत्वाचे विषय आहेत आणि ते आपल्याला ते उरकायचे आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हा महत्वाचा विषय नाही का? जेव्हा ॲक्सीडंड झाला त्याच्या दुस-या दिवशीच आम्ही हा विषय दिला होता. म्हणजे पाच तारखेला विषय दिला होता. त्यानंतर आचारसंहिता लागल्यामुळे हा विषय येउ शकलेला नाही.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

विषय सभेमध्ये आणायला सांगितले होते? मग विषय आणणे हे मा. महापौरांचे काम होते मा. महापौरांनी विषय आणलेला नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौरांना पण आम्ही तसे पत्र दिले होते. पण आम्हांला मा. आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते की, आपण विषय घेउ.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

मा. महासभेमध्ये विषय आणणे हे मा. महापौरांचे काम आहे. मा. महापौरांनी विषय आणलेला नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, प्रशासन आणू शकते.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

आपली साहेबांशी चर्चा झाली?

**प्रेमनाथ पाटील :-**

होय. आमची साहेबांशी चर्चा झालेले आहे. सभा कामकाज "क" मध्ये घ्या.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

तुम्हांला विषय आणावा लागेल. धोरण ठरवावे लागेल. आपल्याला अपघात झाला, काहीही झाले तर त्यांना काय काय द्यायचे ते सन्मा. सभागृहाने ठरवायचे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, याच्यामध्ये चर्चा करायची आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

पण सभेत विषयच आलेला नाही. रितसर विषय नाही. मग तुमचा ठराव कसा होईल?

**प्रेमनाथ पाटील :-**

ठराव करायचा नाही. चर्चा तर करुन घ्या.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

विषय आणू आणि चर्चा करु. पुढच्या सभेमध्ये विषय आणू आणि मग चर्चा करु. आपल्या सभागृहातील सन्मा. सदस्य, माजी नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील यांना "हिंद का गौरव" हा अचिव्ह इन्स्टीट्युट यांच्याकडून पुरस्कार मिळालेला आहे. राष्ट्रीय विकास रत्न इकॉनॉमिक ग्रोथ ऑफ इंडिया याच्याकडून पुरस्कार मिळाला आहे. भारत शिक्षा रत्न ग्लोबल सोसायटीकडून मिळाला आहे आणि राष्ट्ररत्न अवॉर्ड ऑफ इंडिया इन्स्टीट्युटकडून मिळाला आहे. तसेच रत्नज्योती अवॉर्ड हा इंडियन ऑर्गनायझेशन रिसर्च असे पाच पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. त्याचप्रमाणे श्री. जगतकुमार पाटील यांना "आसाचा फेरा" या नाट्यलेखानाबाबत राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे. हे आपल्या शहरातील आहेत. पंडीत आर्ट सिरॅमिकला राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. खरे म्हणजे आपल्या शहरासाठी अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे. त्यांचा सत्कार आपण पुढच्या मा. महासभेमध्ये करणार आहोत. सचिव साहेब, पुढच्या सभेमध्ये त्यांचा योग्य तो सत्कार, आपण त्यांना एक मोमेन्टो बनवा आणि या तिघांचा सत्कार करावा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, मागच्या मा. महासभेमध्ये आपण ठरवले होते की, १४५ आणि १४६ विधानसभा मतदार संघामध्ये जे मा. आमदार निवडून आलेले आहेत. त्यांच्या सत्काराचे आपण ठरवले होते त्याचे पुढे काय झाले?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

पुढच्या सभेमध्ये त्यांचाही सत्कार करु.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, आत्ताच आपण सांगितले की, श्री. जगतकुमार पाटील यांना नाट्यासाठी पुरस्कार दिलेला आहे. पण आत्ताची विषयपत्रिका बघितली तर जी लोकमतमध्ये विषयपत्रिकेमध्ये जो आपला ४७ नंबरचा विषय आहे, आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम आरक्षण व क्र. २६३ नाट्यगृहाकरीता जागा भुसंपादन करणेबाबत विचार विनिमय करणेबाबत. पण आत्ता आम्हाला जी विषयपत्रिका पाठवली त्याच्यामध्ये नाट्यगृहाचा विषयच नाही.

**नगरसचिव :-**

शुध्दीपत्रक दिलेले होते. त्या शुध्दीपत्रकामध्ये आलेला आहे.

**प्रविण पाटील :-**

शुध्दीपत्रकामध्ये नाट्यगृहाचा विषयच नाही.

**नगरसचिव :-**

तो कट केलेला आहे.

**प्रविण पाटील :-**

का कट केलेला आहे?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांनी कट केला आहे. पुढच्या वेळेला तो विषय येणार आहे.

**प्रविण पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये चांगले कलाकार आहेत. त्याच्यावर विचार विनिमय किंवा......

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

पुढच्या सभेमध्ये हा विषय घेउ. आपल्या मताशी सभागृह सहमत आहे.

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराचा तासाला सुरुवात होत आहे. श्रीम. कल्पना महेश म्हात्रे यांचा प्रश्न आहे. ११ वाजून ४५ मिनिटे झालेली आहेत.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मी हा प्रश्न विचारलेला आहे. या प्रश्नाची उत्तरे मला कशाप्रकारे दिलेली आहेत ते मी वाचून दाखवते. मग तुम्ही द्या. प्रश्न क्र.०१ सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शालेय शिक्षकांना दोन टाईम चहा, एक टाईम नास्ता, एक टाईम जेवण देण्याबाबत निविदा शिक्षण मंडळातर्फे काढण्यात आली होती. सदर निविदा किती ठेकेदारांनी भरल्या होत्या त्यांची नावे पत्त्यांसह द्या. मला उत्तर दिले आहे की, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शिक्षकांना दोन टाईम चहा, एक टाईम नास्ता, एक टाईम जेवण देणेबाबत निविदा शिक्षण मंडळातर्फे काढण्यात आली होती. सदर निविदा चार ठेकेदारांनी भरल्या होत्या. त्यामध्ये नावे दिली आहेत ती, राजाराम चव्हाण कॅटरर्स, रशिद खान कॅटरर्स, वैभव लक्ष्मी महिला बाल विकास गट, राधिका महिला सेवा सहकारी संस्था या चार जण. दुसऱ्या प्रश्नाला मला उत्तर दिले आहे की, निविदा भरलेल्यांपैकी चार ठेकेदारांनी भरलेली रक्कम सारखी असल्यामुळे त्यांना निविदा देण्यात आली. पण दि. ०९/०१/२००९ रोजी बालाजी महिला शिक्षण प्रसार व समाज कल्याण संस्था या संस्थेला त्यांनी ठेका दिलेला आहे. हा कसा दिला? कारण याच्यात त्यांचे नावच नाही. याच्यात चार नावे आहेत, राजाराम चव्हाण कॅटरर्स, रशिद खान, वैभव लक्ष्मी आणि राधिका. आणि या बालाजी महिलाचे नावच नाही. मग ह्यांना ठेका कसा दिला?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मा. महापौर साहेब यांच्या संमतीने बोलतो. सन्मा. सभागृह, सर्व शिक्षा अभियानामध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी चार निविदाधारकांचे दर प्राप्त झाले होते. शासनाचे दर निश्चित केलेले असतात. त्यामुळे कमी जास्त दर खर्च करता येत नाहीत. वैभव लक्ष्मी महिला बाल विकास गट व बालाजी महिला विकास गट हे एकाच पदाधिकाऱ्यांचे, प्रोप्रायटरचे गट आहेत.

**कल्पना म्हात्रे :-**

पण त्यांच्या नावाने निविदाच भरली नाही मग तुम्ही दिले कसे? तुम्ही त्यांच्या नावाने पत्र दिले आहे की, या तारखेला तुम्ही पुरवठा करायचे. दि. १७/०१/२००९ आणि .......

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

सदर कामाच्या संदर्भात या संस्थेच्या चेअरमन श्रीम. स्नेहल पवार यांनी वारंवार तगादा लावून स्वतः करीता कामाचा पुरवठा करण्याकरीता आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे ते दिलेले आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

त्यांचे नावच नाही. मग त्यांच्या नावाने तुम्ही कशी काढली? मग वैभव लक्ष्मीच्या नावानेच काढायला पाहिजे.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

नजरचूकीने निघाली असेल.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, नजरचूकीने निविदा दिली असे ते म्हणतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमची चूक झाली हे कबुल करा.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

चूक झालेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चुक झाली, तुम्ही त्यांना दिले आहे?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

कारण या संस्थेचे जे अध्यक्ष आहेत ते एकच आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

शेठ एकच असला तरी त्याच्या कंपन्या अलग आहेत ना?

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, त्यांचे म्हणणे आहे की, तगादा लावला म्हणून त्यांना दिली. तर जो कोणी तगादा लावेल त्यांना तसे कॉन्ट्रॅक्ट देतात का?

**कल्पना म्हात्रे :-**

आम्ही पण तगादा लावतो. आम्हांला पण द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही उत्तर द्या. ज्याची निविदा नसताना त्या माणसाला दिली तर उद्या माझी नाही, यांनी मला सांगितले की तु घे तर घ्यायची का?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

श्रीम. स्नेहल पवार यांनी प्रशिक्षणावेळी पुरवले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, चार लोक होते. तुम्ही पाचव्याला कसे दिले ते सांगा. नियमात आहे का ते सांगा?

**कल्पना म्हात्रे :-**

तुमचे काही सगेसोयरे आहेत की, ते महिला मंडळ कोण आहेत?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

सगेसोयरे वगैरे कोणीच नाहीत.

**कल्पना म्हात्रे :-**

मग तुम्ही का दिले? त्यांच्या नावाने द्यायला पाहिजे नव्हते.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

सदर बाबीचे अजून पैसेसुध्दा पे केलेल नाहीत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, चार ठेकेदारांनी ठेका भरला होता. त्यामध्ये दर सारखाच असल्यामुळे चारही जणांना ऑर्डर दिली. ऑर्डर देताना प्रशासन अधिकारी कार्यालयाकडून चुक झालेली आहे. ती त्यांनी वैभव लक्ष्मी महिला व बालके विकास गट या नावावर ऑर्डर द्यायला पाहिजे होती. परंतु त्यांनी बालाजीचे दिले. ती त्यांनी चूकीची दुरुस्ती करावी आणि ही गेल्या वर्षाची आहे आणि त्यांना यापूर्वी ही कल्पना दिली होती की, ती ऑर्डर चेंज करा. कारण ते प्रोप्रायटर एकच असल्यामुळे त्यांनी बालाजीला दिले. ती त्यांची चुकीची ऑर्डर दुरुस्त करणे गरजेचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, शिक्षण अधिकारी एवढ्या चुका करतील तर विद्यार्थी किती चुका करतील?

**कल्पना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यात संदर्भ दिला आहे. मा. आयुक्त मनपा यांनी मंजूर केलेली निविदा असे दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, प्रत्येक वेळी अधिकाऱ्यांची मंजूरी......

**मा. आयुक्त :-**

टेंडर मंजूरीच्या वेळेला माझ्याकडे येते.

**कल्पना म्हात्रे :-**

पण ते नाव त्यांनी बघायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

वैभव लक्ष्मी महिला बालके हे टेंडर मंजूरीच्या वेळेला होते. ऑर्डर देताना चुक केलेली आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

त्यांच्या चुकीची त्यांच्यावर कारवाई करा. मा. आयुक्त साहेब, प्रत्येक वेळी त्यांची बाजू घेउ नका.

**मा. आयुक्त :-**

सांभाळून घेत नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

ही एवढी मोठी चूक केली आहे आणि त्यांनी अन्न पुरवठा पण केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

नोटीस देवून खुलासा मागविण्यात येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब आळीपाळीने म्हणजे काय?

**मा. आयुक्त :-**

शिक्षकांचे जे प्रशिक्षण असतात ते वेगवेगळ्या वेळी असतात. तर पहिल्या वेळेला यांना, दुसऱ्या वेळेला यांना, तिसऱ्या वेळेला यांना याला आळी पाळी म्हणतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किती वेळा झालेले आहे, किती लोकांना किती वेळा दिले त्याची नोंद द्या.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

शासनाचे दर हे ठराविक दर आहेत. त्याच्यामध्ये आपल्याला काही कमीजास्त करता येत नाही. आत्ता ४० रु. भरले तर त्याच्यामध्ये एकवेळचे जेवण, दोन वेळेचा चहा आणि एक नास्ता, अशा प्रकारचे शिक्षकांना द्यायचे असते आणि आळीपाळीने म्हणजे या महिन्यामध्ये दोन दिवसाचे ट्रेनिंग असेल तर राजाराम चव्हाण यांना दिले असेल, त्यानंतर दुसऱ्या वेळेला दोन महिन्यातून एकदा ट्रेनिंग होते, दोन दिवसांचे ट्रेनिंग सात वेळा होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता तुमचे ट्रेनिंग झाले. एकंदर किती ट्रेनिंग झाले?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

हे २००८-०९ चे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या काळामध्ये किती ट्रेनिंग झाली? आणि किती लोकांनी खाऊर्न पगार घेतला. तुम्ही आळीपाळीने दिले. तर चार संख्येपैकी एकाला ५० ची दिली, नंतर दुसऱ्या पाळीमध्ये याला ७० ची दिली, किती दिली? तुमचे म्हणणे आहे की, प्रशिक्षण चार-पाच वेळा झाले. दहा वेळा झाले असेल.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

दोन महिन्यातून एकदा दोन दिवसांचे ट्रेनिंग असते.

**कल्पना म्हात्रे :-**

त्याला किती शिक्षक हजर असतात? किती वेळ? त्याच्या खर्चाचे काही आहे का?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

तो डाटा आणला नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

आज विषय होता तर आणायला पाहिजे.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

तुम्हांला देतो.

**कल्पना म्हात्रे :-**

मला आत्ता पाहिजे. तुम्ही आत्ता मागवा.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मागवून देतो.

**मर्लिन डिसा :-**

साहेब, पुढच्या वेळी अशी ट्रेनिंग असेल तर मला पण इन्फॉर्मेशन करा. मी पण तिकडे जाते.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

मा. शिक्षण अधिकारी साहेब, सभेमध्ये विषय असताना तुम्ही वाचले असेल. तुम्ही संपूर्ण तयारीत यायला पाहिजे. सन्मा. सदस्य जेव्हा प्रश्न विचारतात आणि ते प्रश्न आलेले आहेत. तर तुम्ही माहिती आणायला पाहिजे. त्यामध्ये चुक मान्य केलेली आहे. तुम्हांला आणखीन काही माहिती हवी असेल तर मा. आयुक्तांकडे आपण गेलात तरी चालेल.

**कल्पना म्हात्रे :-**

एक दुसरे याच्यातच महत्वाचे आहे. माझा प्रश्न आहे की, आतापर्यंत साहित्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांना किती रक्कम देण्यात आली? मला उत्तर दिले आहे की, आतापर्यंत साहित्य पुरवठा शिक्षकांना जिल्हा परिषद ठाणे योंच्याकडून होतो. जर जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडून होतो तर यांनी निविदा काढली कशी?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

उनका प्रश्न है तो उनको बोलने दिजीए।

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मॅडम, आपला प्रश्न आहे की, आतापर्यंत साहित्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांना किती रक्कम देण्यात आली?

**कल्पना म्हात्रे :-**

ते जिल्हा परिषदेकडून होते, बरोबर?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

होय.

**कल्पना म्हात्रे :-**

मग तुम्ही प्रश्नोत्तरामध्ये ३ लाख १९ हजार ७३६ रु. खर्च दिलेला आहे तो कसा?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

अन्नपुरवठा म्हणजे तो प्रशिक्षणाचा खर्च आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

माझ्या उत्तराला तुम्ही असे दिले आहे आणि नंतरच्या प्रश्नोत्तरामध्ये हे उत्तर दिले आहे. ही तफावत का आली आहे?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मॅडम तेच उत्तर आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

माझ्याकडे प्रश्नोत्तराची कॉपी आहे ती तुम्हांला पाठवते. तुम्ही याच्यात ३ लाख १९ हजार ७०० दिलेले आहेत. त्यांच्याकडून कॉपी मागवा.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मॅडम, ३ लाख १९ हजार ७३६ रु. दिलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सभागृह चालु आहे की, काय चालले आहे? महिला प्रश्न विचारतात. इकडे गोंगाट चाललेला आहे. त्यांचा प्रश्न ऐकायला येत नाही. यांनाही ऐकायला येत नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

श्री. सोनार साहेब, मला याचे उत्तर द्या. तुम्ही ३ लाख रु. खर्च कशासाठी केले?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

३ लाख १९ हजार ७३६ रु. हे प्रशिक्षणासाठी शिक्षकांना अन्न पुरवठा करणाऱ्या पुरवठाकारांचे झालेले आहे.

**स्नेहा पांडे :-**

साहित्य पुरवठा का पुछ रहे है तो आप अन्न पुरवठा का अन्सर क्यों बता रहे हो?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ४० रु. सरासरी आहे तर मग ही उलटी फिगर कशी आली?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

४० रु. एका शिक्षकाला पर डे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ३ लाख किती शिक्षकांचे दिले?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मॅडम, पैसे वाटप केले नाहीत. चहा, नास्ता, जेवण दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किती शिक्षकांचे किती प्रशिक्षण आले ते सांगा.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

पुढच्या वेळेला देतो.

**कल्पना म्हात्रे :-**

साहेब, ते जेवण जे दिले जाते, ते ही तपासले जात नाही.

**नुरजहॉ नझर हुसैन :-**

आपको चाहिए तो उन टिचरों को मै सामने खडा कर सकती हु। आपके सामने वह लोग बोलेंगे।

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मॅडम, यह २००८-०९ का है। इस साल उन को पैसे दे रहे है।

**नुरजहॉ नझर हुसैन :-**

अब तक आप लोगों ने दिया नही इसलीए टिचर जाती नही है।

**जुबेर इनामदार :-**

२००८-०९ मध्ये कोण अधिकारी होता?

**नुरजहॉ नझर हुसैन :-**

म्हणून टिचर जात नाही आणि मग तुम्ही लोक शाळेला नोटीस पाठवता.

**मा. आयुक्त :-**

सर्व शिक्षा अभियानाखाली शिक्षकांना जे प्रशिक्षण दिले जाते. ते वर्षातून प्रत्येक महिन्याला वेगवेगळ्या वेळेला टाईमाला दिले जाते. हे मागच्या वर्षाचा खर्च त्यांनी सांगितलेला आहे. मागच्या वर्षी जेवण, नास्ता, चहापाणी केल्याचा खर्च त्यांनी टाकलेला आहे आणि प्रत्यक्षात दिलेले आहेत. चालू वर्षी त्या लोकांची आणि ठेकेदारांची भांडणे झाल्यामुळे आपण प्रशिक्षणाला या. मात्र त्या प्रमाणात त्यांना आता रक्कमच दिली जाते. काही लोक म्हणायला लागले की, जेवण नीट नाही, नास्ता नीट नाही. मग त्यांना कुठे कुठे जाउन जेवायचे किंवा नास्ता करायचा यासाठी सरासरी येणारी रक्कम त्या शिक्षकांना चालु वर्षापासून दिलेली आहे. पाठीमागच्या वर्षी जेवण, नास्ता, चहा दिलेला आहे. त्या दिलेल्या चहा नास्त्यावरुन बरोबर नव्हते ही तक्रार आल्यामुळे आपण सरासरी रक्कम काढून शासनाच्या धोरणाप्रमाणे रक्कम अदा केली जाते. त्यामुळे त्यांचे त्यांनी जेवणाच्या वेळेत जेवून यायचे आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

साहेब, पण ही रक्कम दिली जाते ती बरोबर दिली जाते हे कोणी बघायचे? ज्या संबंधीत शाळेकडून जे शिक्षक येतील त्या शाळेकडून तुम्ही तसे लेटर घ्या की, आम्ही आमचे एवढे शिक्षक आम्ही पाठवत आहेत. तुम्ही असे कोणाला पैसे पाठवू नका.

**मा. आयुक्त :-**

रक्कम मिळाली नाही अशी तक्रार माझ्याकडे आलेली नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

पण रक्कम मिळाली? ती कोणाला मिळाली? ते सबंधीत शाळेलापण समजले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

पावती चिटकवून त्यावर पैसे मिळाल्याच्या सह्या घेतो.

**कल्पना म्हात्रे :-**

आता ते शिक्षक आहेत हे कोणला माहिती पडेल. तुम्ही त्या संबंधीत शाळेकडून मागवा की, आम्ही हे शिक्षक प्रशिक्षणासाठी पाठवत आहोत.

**मा. आयुक्त :-**

चालेल. पैसे मिळाले की नाही मिळाले हे त्या मुख्यध्यापकाकडून मागवतो.

**कल्पना म्हात्रे :-**

आम्ही एवढे शिक्षक पाठवतो असे ही घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, जे पैसे देतात. तुम्ही आत रजिस्टर मागवा. साध्या पेपरवर नाव आणि कोणाच्या तरी नावाने सही. नो रिव्हेन्यु स्टँम्प, नो नथींग. त्याच्यात काही नाही. वाउचर तर सोडून द्या.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

साहेब, ह्या सभागृहाला अशी माहिती द्या की, त्या प्रशिक्षणासाठी १०० टक्के शिक्षक जातात का? आणि १०० टक्के गेल्यानंतर तुम्ही त्यांना पेमेन्ट कुठे करता? आगाऊ देता की नंतर देता? अगाऊ दिल्यानंतर ते जर शिक्षक तिकडे आले नाहीत, प्रशिक्षण घेण्यासाठी तुम्ही ही रक्कम देता. प्रशिक्षणासाठी तिकडे आल्यानंतर दिले तर बरे होईल.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

सन्मा. सभागृह, प्रशिक्षणाच्या स्थळी शेवटच्या दिवशी पेमेन्ट केले जाते. जे शिक्षक दिवसाप्रमाणे उपस्थित आहेत, त्याप्रमाणे त्यांना पैशांचे वाटप केले जाते. एका दिवसाला सरासरी ४० रुपये पडतात. शेवटच्या दिवशी पेमेंट केले जाते.

**कल्पना म्हात्रे :-**

त्याच्या काही सह्या वगैरे घेता का?

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

आमच्याकडे सह्या वगैरे सर्व डॉक्युमेंन्ट्स आहेत. शिक्षकांच्या सह्या आहेत. त्यांचे हजेरी मस्टर आहे, तो किती दिवस हजर होता. त्याप्रमाणे त्यांना पेमेन्ट केलेले आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

आत्ता तुम्ही सांगितले की, खाऊ बरोबर नसतो अशी तक्रार आहे, चहा बरोबर नसतो अशी तक्रार आहे. तुम्ही इकडे माझ्या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. मी विचारले की, हे खाऊ पदार्थ कोणते अधिकारी तपासणी करतात. तुम्ही याच्यात लिहिले आहे की, तपासण्याची पध्दत नाही. उत्तर वाचून दाखवते. शिक्षक प्रशिक्षण स्थळी शिक्षकांना खाऊ पदार्थ दिले जात नाही. हे माझ्या प्रश्नाला उत्तर आहे. माझा दि. १२/०१/२००९ चा प्रश्न आहे.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मॅडम, प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे की, शिक्षक प्रशिक्षण स्थळी शिक्षकांना वरीलप्रमाणे अल्पोपहार, जेवण, चहा, नास्ता दिला जातो.

**कल्पना म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही हे माझ्या प्रश्नाला उत्तर दिलेले नाही. हे प्रश्नोत्तरामध्ये दिलेले आहे. याच्यामध्ये ही तफावत आहे. म्हणजे दोन उत्तरामध्ये किती तफावत आहे हे तुम्ही बघा.

**सोनार (शिक्षण अधिकारी) :-**

मॅडम, तुमचा जो प्रश्न आहे तो शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या संदर्भात आहे. खाऊ आपण लहान मुलांना देतो. मोठ्या माणसांना खाऊ देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब ४० रुपये तुम्ही आता बोलले की, नास्ता देतो. आता बोलता की चहा, नास्ता देत नाही. शेवटी ४० रुपयांमध्ये काय देता हे तरी सांगा?

**मा. आयुक्त :-**

साहेब, मागच्या वर्षी जेवण, नास्ता, चहा देण्याची पध्दत होती. त्याबाबत शिक्षकांनी तक्रार केल्यानंतर या वर्षापासून आपण रक्कम द्यायला सुरु केलेली आहे. आणि प्रशिक्षण संपल्यानंतर शेवटच्या दिवशी आपण त्यांना रक्कम ४० रुपये पर डे चे देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही उत्तर वाचले का? मा. आयुक्त साहेब मी तुम्हाला आधीही सांगितले. संबंधीत खात्याने दिलेले उत्तर कमीत कमी तुम्ही तरी वाचून या. त्यांनी काय दिले की, शिक्षक प्रशिक्षणाच्या वेळी शिक्षकांना वरीलप्रमाणे अल्पोपहार, जेवण, चहा, नास्ता दिला जातो. शिक्षक प्रशिक्षणाच्या वेळी शिक्षकांना देण्यात येणाऱ्या पदार्थाची तपासणी केली जात नाही. कारण शिक्षकांना अन्न देताना तपासूनच देण्याची पध्दत आहे. आत्ता हे सांगतात देतच नाही. हे का? म्हणजे शेवटी तुम्ही देता की नाही हे तरी सांगा?

**मा. आयुक्त :-**

कारण शिक्षकांना अन्न तपासून देण्याची पध्दत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे ते मेले तर चालेल, मुले मेली नाही पाहिजेत?

**मा. आयुक्त :-**

असे नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हेच म्हणणे आहे.

**मा. आयुक्त :-**

शासनाचे गाईडलाईन्स आहेत, मोठ्या लोकांना जेवण देताना तपासून देत नाहीत. आपण प्रत्येकाच्या घरी अन्न तपासत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही लोकांच्या घराचे कशाला सांगता?

**मा. आयुक्त :-**

का सांगतो ते तुम्हांला जस्टीफिकेशन देतो. ज्यावेळेला लहान मुलांचे अन्न देतो त्यावेळेला तपासले जाते. मोठ्या व्यक्ती असतात त्यांचे अन्न तपासण्यासाठी डॉक्टर असतात. शिक्षकांचे अन्न तपासण्यासाठी डॉक्टरांकडून तपासूनच द्यावे असा काही नियम नाही. जर आम्हांला संशय आला की, अन्न बरोबर नाही किंवा बरोबर लागत नाही. त्यावेळेला तपासून दिले जाते. प्रत्येक गोष्ट जर तपासून द्यायला लागले तर ते शक्य होणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता १० मिनिटापूर्वी बोलले की, खाऊ दिला जात नाही. आता ते काय देतात ते काय माहिती. खाऊ म्हणजे अन्न नाही.

**मा. आयुक्त :-**

लहान मुलांना खाऊ म्हणजे अन्न म्हंटले जाते असे ते बोलले आणि नास्ता, जेवण, चहा आपण त्या शिक्षकांना देतो असे सांगितले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे ते तपासण्याची पध्दत नाही? महाराष्ट्र शासनाचा तसा जी.आर. आहे?

**मा. आयुक्त :-**

तपासण्याची पध्दत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जी.आर. आहे का?

**मा. आयुक्त :-**

तपासून घेउ नका असा जी.आर. कधी असत नाही. पण तपासावा असेही लिहलेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

समजा, उद्या काय झाले तर त्याला जबाबदार कोण? उद्या खाद्य पदार्थामध्ये शिक्षकांचा कोणाचा तरी बळी गेला, मग काय करणार?

**मा. आयुक्त :-**

ही जबाबदारी त्या अन्न पुरवणाऱ्या ठेकेदारावर असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे तपासणी करण्याची गरज नाही?

**मा. आयुक्त :-**

हॉटेलमध्ये आपण जेवायला गेल्यानंतर निर्दशनास आल्यानंतर हॉटेल मालकावर फौजदारी गुन्हा दाखल होतो.

(सभागृहात गोंधळ)

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवालजी, आपण प्रत्येक हॉटेलमध्ये जेवायला जातो. तिकडचे अन्न आपण तपासत नाही. हा प्रश्न सन्मा. नगरसेविका श्रीम. कल्पना म्हात्रे यांचा आहे. तरी आपण जे विचारता, पुढे घडेल नाही घडणार या विषयावर आपली चर्चा चाललेली आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, त्यांचे असे म्हणणे आहे की, जर कोणला अन्नबाधा झाली तर काय करायचे? विषय असा आहे, या सन्मा. सभागृहामध्ये सगळ्यांना नास्ता दिला. सगळ्या लोकांनी खाल्ला. पण आमच्या बाजुला आपले श्री. प्रफुल्ल पाटील साहेब बसले आहेत त्यांनी खाल्ला नाही. त्यांना माहिती आहे, कदाचित मला बाहेरचे जमणार नाही. मग ते स्वतः तपासायचे. म्हणून प्रत्येक माणसाचे तपासणे एवढे नाही. पण कोणाला जर तशी अडचण असेल तर त्याने बाहेरचे नाही खाल्ले पाहिजे. ही गोष्ट बरोबर आहे.

**मा. आयुक्त :-**

व्ही.आय.पी. लोकांचे अन्न तपासून द्यावे असे डायरेक्शन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही एका बाजूला सांगता की, अन्न देत नाही. ४० रु. कसले देता ते तरी आम्हांला सांगा.

**मा. आयुक्त :-**

साहेब, हे मागच्या वर्षाचे प्रश्नाचे उत्तर आहे. चालू वर्षी आम्ही अन्न, नास्ता, चहा देत नाही. चालू वर्षी आम्ही पैसे देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

४० रु. कसले देता ते सांगा?

**मा. आयुक्त :-**

दोन चहा, नास्ता आणि जेवण.

**वंदना चक्रे :-**

असे सांगा की, जेलमध्ये तपासून देतात. इकडे दिले जात नाही.

**श्री. सोनार :-**

चाळीस रूपयांमध्ये एका वेळेचे जेवण, दोन-चहा आणि एक नास्ता, असे कॉन्ट्रॅक्स मागच्या वेळेला दिलेले होते. यावर्षी तक्रारी वाढल्यामुळे, अन्नामध्ये बेचव...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, चाळीस रूपये बरोबर आहे? रेटमध्ये फरक आहे का? मग हा फिगर कसा आला. चाळीस रूपयांनी सरासरी केले तर राऊन्ड फिगर येणार.

**श्री. सोनार :-**

साहेब, तो वर्षाचा खर्च आहे. त्यामध्ये अनुदानीत शाळा महापालिकेच्या शाळा, विना अनुदानीत शाळा, कायम विना अनुदानीत शाळा अशा शिक्षकांना नवीन अभ्यासक्रम बदलल्याचे ट्रेनिंग दिले जाते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, ४० रूपयांमध्ये तुम्ही हे दिले?

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, ४० रूपयांमध्ये एवढे सगळे देता. म्हणून यांच्या मनामध्ये शंका आहे. कारण ४० रूपयांमध्ये जेवण नास्ता, चहा...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही काय विचारले की, ४० रूपये असेल तर हा राऊंड फिगर कसा आला?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल, आपल्याला नक्की काय सांगायचे आहे?

**शरद पाटील :-**

मा. विरोधी पक्षनेते साहेब, आपल्याला विनंती आहे की, उत्तर द्यायला प्रशासन सक्षम आहे. आपण त्यांची उत्तरे नका देऊ? तुम्ही सगळ्यांना कशाला सांभाळायला जाता? त्यांना बोलू द्या.

**लक्ष्मण जंगम :-**

श्री. पाटील साहेब, मी उत्तर देत नाही. मी तुमची शंका सांगतो.

**शरद पाटील :-**

ते सांगतील. साहेब, इथे प्रत्येक गोष्टीमध्ये त्यांची प्रिटींग मिस्टेक असते.

**लक्ष्मण जंगम :-**

त्यांनी सांगितले की, ४० रूपयांमध्ये जेवण, नास्ता, चहा. मग ४० रूपयांमध्ये चहा, नास्ता, जेवण देणारे कुठेतरी आहे का?

**शरद पाटील :-**

आज हॉटेलमध्ये पण २० रूपये राईस प्लेट आहे. चला आम्ही देतो. साहेब, जो फिगर दिला तो ४० रूपयांप्रमाणे किती व्यक्तींचा आहे?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

मी तुम्हाला विनंती करतो की, संपूर्ण माहिती साहेबांकडे आहे. आपण जाऊन माहिती काढा. तुम्हाला काही शंका आली तर पुढच्या सभेत विषय काढा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा प्रश्न आज आलेला नाही.

**मा. पिठासीन अधिकारी:-**

मला मान्य आहे. त्यांनी आणायला पाहिजे होते.

**शरद पाटील :-**

वर्षापासून चाललेले आहे. त्याची जर उत्तरे देत नसतील तर कशासाठी पाहिजे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

मी मघाशी सांगितले की, त्यांनी आणायला पाहिजे होते. पण आत्ता माहिती उपलब्ध नाही.

**शरद पाटील :-**

प्रश्न पुढच्या वेळेला घ्या.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

प्रश्न पुढच्या वेळेस घेऊ. मग एवढा वेळ चर्चा का केली?

**शरद पाटील :-**

म्हणजे याला कट करा असे तुम्ही बोलता. मग सभेत येऊन आम्ही काय बोलायचे?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

मी तेच सांगतो की, ती माहिती तुम्हाला उद्यापण मिळू शकेल.

**शरद पाटील :-**

असे नाही. हा एक वर्षापासून दिलेला प्रश्न आहे. आणि मा. महापौर साहेब, याला दोन उत्तरे आहेत.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

हा आपण पुढच्या सभेमध्ये आणू. तोपर्यंत संपूर्ण येईल.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, या संदर्भात एक महत्वाच्या...

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

श्री. पालांडे साहेब, तुमचा पुढचा प्रश्न आहे.

**प्रशांत पालांडे :-**

याच विषयावर बोलायचे आहे.

**भगवती शर्मा :-**

साहब, समय खत्म हो गया।

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, वेळ संपली का?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे. पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेकरिता एकूण दोन लक्षवेधी आलेल्या आहेत.

**मधुसूदन पुरोहित :-**

साहेब, अतिशय गरजेचा विषय आहे. कालपासून आत्तापर्यंत कचरा उचलण्याचे बंद झालेले आहे. हे बाकीचे विषय सुरू होतील, चालतील ठिक आहे. पण मला वाटते २४ तास झाले कचरा उचलत नाही. साहेब, नागरिकांची समस्या काय आहे ते ऐकून घ्या.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

प्रोसीडींगला मंजुरी झाल्यानंतर तो विषय घेऊ.

**मधुसूदन पुरोहीत :-**

२४ तास झाले का उचलत नाही त्याचे उत्तर आत्ता पाहिजे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

आपल्याला उत्तर मिळेल. प्रोसीडींगला मंजुरी झाल्यानंतर मिळेल. आत्ता दोन लक्षवेधी आहेत.

**नगरसचिव :-**

पहिली लक्षवेधी श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांची आहे. त्यांचा विषय आहे, २००६-०७, २००८-०९, मधील लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांच्या पुर्ततेबाबत. आणि दुसरी लक्षवेधी श्री. लक्ष्मण गणपत जंगम, मा. विरोधी पक्षनेता यांची आहे. विषय आहे, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांधण्यात आलेल्या इमारतींना लावलेली शास्ती व त्याबाबत नागरिकांना सोसावा लागणारा नाहक भुर्दंडा विषयी लक्षवेधी प्रस्तावानुसार विनिमय करून निर्णय घेणेबाबत विचारणा केलेली आहे. दोन लक्षवेधी आलेल्या आहेत, त्या मी मा. महापौरांना सुपूर्द करतो.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गारोडिया यांची जी लक्षवेधी आहे ती प्रशासकीय कामकाजाचा एक भाग आहे. ती लक्षवेधी हा लक्षवेधीचा विषयच होत नाही. आपल्याला जी काही माहिती हवी असेल ती आपण...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नियम सांगितला तर बरे होईल.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

आपण नंतर बोला. मी बोलतो. आपल्या लक्षवेधी संबंधात जी काही माहिती हवी असेल ती आपण मा. आयुक्तांकडून घ्या. आणि यामुळे ही लक्षवेधी फेटाळण्यात येत आहे. आणि दुसरी लक्षवेधी जी श्री. जंगम यांची आहे....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, लक्षवेधी कशावर येतात. ज्यामध्ये प्रशासनाच्या माध्यमाने किंवा शहरामध्ये कुठेही अतिवृष्टी झाली असेल, किंवा फार नुकसान झाले असेल. लेखापरिक्षण अहवालामुळे महापालिकेचे लाखो रूपयांचे नुकसान होते आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

मंजुर आहे. पण हा लक्षवेधीचा विषय होत नाही, म्हणून सांगतो. लेखापरिक्षण हा लक्षवेधीचा विषय होत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे असे म्हणणे  आहे की, एकदा वाचून तरी दाखवा दोन्ही लक्षवेधी वाचण्याची पध्दत आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

नाही. ती लक्षवेधी फेटाळलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहामध्ये आत्तापर्यंत लक्षवेधी वाचायचे की नाही? सचिव साहेब, तुम्ही फेटाळा. पण पहिले वाचून तरी दाखवा.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

फेटाळल्यानंतर वाचन कसे होईल? फेटाळा सांगता आणि वाचूनही दाखवा असे म्हणता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वाचून नंतर तुम्ही फेटाळा. आत्ता पर्यंत तसेच झालेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, आपण थोडी माहिती द्या. लक्षवेधी कोणती, पहिल्यांदा येते ती स्विकारावी लागते, कसे असते?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

तसा भाग नाही. यांची जी लक्षवेधी आहे. तो लक्षवेधीचा विषय होऊ शकत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

कुठले निकष लावायचे?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, लक्षवेधी फेटाळली हे ठिक आहे. पण आपण दोन्ही लक्षवेधी वाचून दाखवता हे खरे आहे. या मा. महासभेमध्ये अनेक वेळा दोन्ही लक्षवेधी वाचून दाखवल्या आहेत. तीन असतील तर तिनही वाचून दाखवल्या आहेत. तुम्ही फेटाळली, हरकत नाही.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

ठिक आहे. सन्मा. नगरसेवक श्री. पालांडे यांनी विचारले की, लक्षवेधी कशी स्विकारली जाते? त्यात असे आहे निकडीच्या, सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधणे. पालिका सदस्यास सभेचा प्रारंभ होण्याच्या निदान दोन तास अगोदर मा. महापौर, मा. आयुक्त व महानगरपालिका सचिव यांस लेखी नोटीस देऊन आणि मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीने निकडीच्या, सार्वजनिक, महत्वाच्या कोणत्याही बाबींकडे मा. आयुक्तांचे लक्ष वेधता येईल. निकडीची बाब हा शब्द महत्वाचा आहे. लक्षात घ्या.

**शरद पाटील :-**

श्री. पालांडे यांनी विचारलेल्या प्रश्नाचे ते उत्तर नाही.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, मी विचारले की, लक्षवेधी....

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

निकडीचे असेल तर.

**प्रशांत पालांडे :-**

दोन्ही प्रशासनाशी निगडीतच आहेत ना.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची वाचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आत्ता तुम्ही जे वाचून दाखवले ते उपविधी आहे की, नियम आहे?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

उपविधी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उपविधी मंजूर झाली आहे का? तुम्ही कधी उपविधीचा उपयोग करता. कधी उपविधी नाही म्हणून तुम्ही...

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

मंजुर झालेल्या उपविधी आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कधी ? सचिव साहेब, उपविधी मंजूर झाली आहे का?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

शासनाकडे पाठवले म्हणजे ते मंजुर झाले. श्री. ओमप्रकाश गारोडिया आपण नगरसेवकांचा वेळ घालवू नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही पध्दत चांगली नाही. तुम्ही आत्ता जे वाचून दाखवले ती उपविधी मंजुर नाही. सचिवांना विचारा.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

तुमची लक्षवेधी वाचून दाखवायची की नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ज्या गोष्टीचा उपयोग केला ती उपविधी मंजुर नाही.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

शासनाकडे विशिष्ट कालावधीमध्ये ते मंजुर झाले असे गृहित धरले जाते.

**भगवती शर्मा :-**

आज तक उपविधी के अनुसार सभी कामकाज चल रहा था। इन्होने खुद कई बार हवाला दिया। और आज कहते है की, उपविधी मंजुर नही है।

(सभागृहात गोंधळ )

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही प्रोसीडींगला येऊ द्या.

**नगरसचिव :-**

शासनाकडे उपविधी पाठवलेल्या आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पाठवले म्हणजे मंजुर आहेत?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, सभागृहाने नियम मंजुर केला. ऑब्जेक्शन सेशन पाठवले. अंतिम मंजुरी सन्मा. सभागृहाने केली आणि ती मंजुरीसाठी पाठवली. आणि त्याच कामकाजाच्या नियमाप्रमाणे गेली २००२ पासून आजपर्यंत सभागृह त्या कामकाजाच्या नियमाप्रमणे चालते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही विरोध केलेला आहे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

तुम्हीच बोलणार का? तुमच्या प्रश्नाचे उत्तर देतात तेही तुम्ही ऐकत नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये असे आहे की, मंजुरीसाठी पाठवल्यानंतर इतक्या दिवसात जर मंजुरी दिली नाही तर मंजुर आहे असे गृहीत धरून त्या नियमाप्रमाणे चालायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे आत्ता मंजुर आहे ना?

**नगरसचिव :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची लक्षवेधी वाचून दाखवतो.

प्रति,
मा. नगरसचिव सो.,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- सन २००६-०७, २००७-०८ व २००८-०९ मधील लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांची पुर्तता करणे. (मा. महासभा दि. ११/०२/२०१० करीता लक्षवेधी)**

महापालिकेचा लेखापरिक्षण अहवाल सन २००६-०७, २००७-०८ व २००८-०९ या तीन वर्षाचे लेखापरिक्षणाचे अहवाल स्थायी समिती पुढे ठेवण्यात आले होते. सदर अहवालामध्ये प्रशासनावर महापालिकेच्या उत्पन्नाच्या वसुलीबाबत आक्षेप ठेवण्यात आले. त्यानुसार महानगरपालिकेच्या अनेक खातेदाराकडून महानगरपालिकेच्या कराची वसूल न केल्यामुळे महानगरपालिकेचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. लेखासंहिता नियमाप्रमाणे लेखापरिक्षकाच्या अहवालाप्रमाणे ९० दिवसांत संबंधित आक्षेपावर मा. आयुक्त यांनी कार्यवाही करणे गरजेचे होते. पण तसे न करता महानगरपालिकेचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान अधिकारी वर्गाकडून करण्यात येत आहे.

मा. आयुक्त महापालिका अधिकाऱ्यांना पाठीशी घालून त्यांच्यावर कारवाई न करता दोन चार फ्लॅटधारकांचा कर भरणा बाकी असेल तरी त्यांच्या इमारतींचे पाणी कनेक्शन कापून टाकण्याची भिती दाखवित आहेत. त्यामुळे नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे. खरे तर मालमत्ता कर वसुली बाबत अधिनियमाप्रमाणे कारवाई न करता व संबंधीत खात्याच्या अधिकाऱ्यांना वसुलीबाबत जाब न विचारता नागरीकांनाच वेठीस धरत आहेत. म्हणजे अशी कहावत आहे की, चोर कोतवाल को डाटे हीच परंपरा या महापालिकेत चालत आलेली आहे.

तरी प्रशासनाने लेखापरिक्षण अहवालातील मागील ३ वर्षातील आक्षेपांची पुर्तता करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर घालावी. तसेच बेकायदेशीर खर्चास आळा घालून आक्षेपांची पुर्तता न करणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ नुसार कारवाई करावी.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदक :- श्री. मदन उदितनारायण सिंह**

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

दुसरी लक्षवेधी श्री. जंगम यांची आहे आणि ती स्विकारलेली आहे. त्या लक्षवेधीवर चर्चा करावी.

**नगरसचिव :-**

श्री. लक्ष्मण जंगम, मा. विरोधी पक्षनेता यांची लक्षवेधी आहे. विषय, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधण्यात आलेल्या इमारतींना लावलेली शास्ती व त्याबाबत नागरिकांना सोसावा लागणरा नाहक भुर्दंडाबाबत महासभा दि. ११/०२/२०१० रोजी लक्षवेधी प्रस्तावानुसार विचारविनिमय करून निर्णय घेणे.

**।। लक्षवेधी ।।**

प्रति,

१) मा. महापौर सो.,
२) मा. आयुक्त सो.,
३) मा. नगरसचिव सो.,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बांधण्यात आलेल्या इमारतींना लावलेली शास्ती व त्याबाबत नागरिकांना सोसावा लागणारा नाहक भुर्दंड विषयी मा. महासभा दि. ११/०२/२०१० रोजी लक्षवेधी प्रस्तावा नुसार विचार विनीमय होऊन निर्णय घेणे बाबत.

महोदय,

मी आपणांस वरील विषयानुसार लक्षवेधी मांडत आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ब-याच मोठ्या प्रमाणात बिल्डर्स / विकासकांनी अनधिृतपणे काही इमारती बांधुन सदनीका विकलेल्या आहेत परंतु इमारतीचे बांधकाम चालु झाल्यापासुन सदनीका विकेपर्यंत महानगरपालिका प्रशासनाने बिल्डर्स / विकासकांवर कोणत्याही प्रकारचा अंकुश ठेवलेला नसल्याने विकासकांनी राजरोशपणे अनधिकृत इमारती बांधुन विकल्या आहेत. तदनंतर महानगरपालिके मार्फत शहरातील ब-याच अनधिकृत इमारतींना शास्ती लावलेली आहे, त्याचा भुर्दंड इमारतीत राहणा-या सर्व सामन्य जनतेला होत असुन याला कारणीभुत असलेले बिल्डर्स वास्तुविशारद व प्रशासनातील अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई आजपर्यंत का करण्यांत आलेली नाही ?

सदनीका घेणा-या लोकांना महानगरपालिकेकडुन परवानगी घेतली आहे किंवा नाही. ज्या ठिकाणी बांधकाम चालु आहे त्या बिल्डर्सने / विकासकने महानगरपालिकेकडुन परवानगी घेतलेली आहे किंवा नाही, घेतली असेल तर ती किती मजल्या पर्यंतची आहे याबाबतचे फलक महापालिका प्रशासनाने लावणे गरजेचे होते अथवा बिल्डर्स / विकासकांना अशा प्रकारचे फलक लावणे सक्तीचे करणे गरजेचे होते. असे असुनही ज्यांनी सदरचे फलक लावलेले दिसले नव्हते अशांवर स्थानिक पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करावा अशा प्रकारची प्रक्रीया राबवली गेली असती तरी बिल्डर्स / विकासकांच्या बेकायदेशीर कामांना लगाम लावता आला असता.

परंतु बिल्डर्सने / विकासकांनी जी अपुर्ण व बोगस कागदपत्रे सदनीका धारकांना दिले त्या कागदपत्रांच्या आधारे हाऊसिंग लोन देणा-य कंपन्यांनी व बॅकानी देखिल सदनीका धारकांना गृहकर्ज उपलब्ध करुन दिलेले आहेत हे सर्व सोपस्कार करुन सदनीका धारक राहायला येईपर्यंत त्याला आपण खरेदी केलेली सदनीका अनधिकृत असल्याची काहीच माहिती नसते जेव्हा हि गोष्ट सदनीका धारकास माहित होते त्यावेळी त्याच्याकडे कोणताही मार्ग उरलेला नसतो तेव्हा तो मनापासुन खचलेला असतो व नाईलाजास्तव भुर्दंड भरण्यास तयार होतो या सर्व प्रकारास कारणीभुत असलेले बिल्डर्स / वास्तुविशारद यांची नावे काळ्या यादीत टाकुन त्यांच्या पुढील सर्व कामांना स्थगिती देण्यात यावी व प्रशासनातील विषया संबधीत अधिकारी सर्वस्वी जबाबदार असुन त्यांच्यामुळे सर्व सामान्य जनतेस शास्तीचा भुर्दंड भरावा लागला आहे.

तरी जनतेवर होत असलेला अन्याय दुर करण्यासाठी प्रशासनांने इमारतींना / घरांना लावलेली शास्ती रद्द करावी व यास कारणीभुत असलेले बिल्डर्स / वास्तुविशारद यांना काळ्या यादीत टाकुन प्रशासनातील संबधीत अधिका-यांवर कडक कारवाई करणे बाबत मा. महासभे समोर विचार विनीमय करुन निर्णय घेणे करीता लक्षवेधी मांडत आहे.

**आपला विश्वासु,**

**(लक्ष्मण जंगम)**
विरोधी पक्ष नेता,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, हे दोन्ही विषय अत्यंत महत्वाचे आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, दोन्ही विषयांवर सभागृहात चर्चा व्हायला हरकत नाही?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

तुमचे म्हणणे आहे की, दोन्ही महत्वाच्या आहेत?

**प्रशांत पालांडे :-**

दोन्ही महत्वाच्या आहेत.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

मग कुठली तरी एकच घ्यावी लागते.

**प्रशांत पालांडे :-**

दोन्हीवर चर्चा होऊ शकते ना? चर्चा करायला काय हरकत आहे?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

हा नियम नाही.

**प्रशांत पालांडे :-**

थोडा थोडा वेळ द्या.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

नियम नाही.

**प्रशांत पालांडे :-**

चर्चा करायला काय हरकत आहे?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

नियम नाही बोलल्यानंतर तुम्ही चर्चा कशी करणार? सभा नियमानुसारच चालवायला पाहिजे की, नाही? तुम्ही सुज्ञ आहात मला माहिती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, धन्यवाद.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

ज्यांची लक्षवेधी आहे त्यांनी बोलावे.

**लक्ष्मण जंगम :-**

या लक्षवेधीच्या अनुषंगाने मी पूर्वी दोन पत्र पाठवलेली आहेत. मा. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब आपण ती बघून घ्यावी. विषय असा आहे की, मागच्या सभेला आपण या विषयावर ठराव केला. आणि त्या अनुषंगाने शास्ती वसुलीचे कामसुध्दा झालेले आहे. काही प्रमाणात वसुली ही झालेली आहे. विषय असा आहे की, शासनाचा जी. आर. आला म्हणून आपण ठराव केला. पण त्याच्यामध्ये जे दोषी होते. त्या एक नंबरपासून जर सुरूवात झाली असती. तर चांगले झाले असते. तसे आपण केलेले नाही. जसे सुरूवातीला बिल्डरने बिल्डींग बांधली. मी पत्र दिले आहे. मा. कमिशनर साहेब बघून घ्या. २००७ चे आहे. आणि त्यांनी बिल्डींग बांधली. बिल्डींग बांधल्यानंतर हे काम महिन्यामध्ये, दोन महिन्यांमध्ये, चार महिन्यांमध्ये पूर्ण होत नाही. वर्षानुवर्षे समजा काम चालले किंवा एक वर्ष, सहा महिने तरी कमीत कमी लागतील. अगदी लहान बिल्डींग असेल तरीही. मग बिल्डींग बांधून झाली. त्या ठिकाणी कुठल्या पध्दतीचा फलक नाही. त्या बिल्डींगमध्ये सदनिका घेणारे लोक मिरा भाईंदरचे असतील अशातला भाग नाही. बाहेरून येणा-या लोकांनी विकत घेतले. या ठिकाणी सदनिका विकत घेणा-या लोकांनी साधारणतः २० टक्के रक्कम भरायची आणि बाकीचे लोन करायचे. लोनसाठी लागणारे पेपर हे आपल्या महानगरपालिकेच्या परवानगीचे आहेत. रजिस्ट्रेशन ऑफीसला तुम्हाला एक नाही, हजारो अशी उदाहरणे मिळतील. आणि हे सगळे घडत असताना ज्यांनी ही गोष्ट घडवली, ज्यांनी टोटल इलिगल बांधकाम केले त्याच्यावर किती लोकांवर कारवाई झाली त्याबाबतीत अजून काही निश्चित माहिती नाही. ज्या आर्किटेक्टच्या माध्यमातून चार माळ्यांचे प्लान पास झाले आणि वर दोन माळे इलिगल बनवले. तर त्यांना जितके बिल्डर जबाबदार तितकेच आर्किटेकट जबाबदार. त्यांच्यावर कारवाई झालेले काही ऐकलेले नाही. काही झालेले असेल तर प्रशासनाने माहिती द्यावी. पुढे जाऊन ज्या अधिका-यांच्या कालावधीमध्ये हा सर्व कारभार झाला किंवा ज्या चुका झाल्या, त्यांना आपण कुठेही जबाबदार धरलेले नाही. त्यांच्यावर कुठल्याही पध्दतीची कार्यवाही झालेली नाही. शासनाचा जी.आर. आला त्याच्यामध्ये म्हटले आहे की, जे संबंधित अधिकारी आहेत, त्यांच्यावर सुध्दा कार्यवाही करा. पण या सभागृहामध्ये असणारे आपण सर्व सन्मा. सदस्य, आपण अशा पध्दतीचे जे काम पहिले, सुरूवातीपासून व्हायला पाहिजे होते, ते कुठेही आपण केलेले नाही. पण सर्वसामान्य जो अंधारातील माणूस आहे, त्याच्यावर मात्र आपण या ठरावाव्दारे शास्तीची कारवाई करायला घेतली, आणि ती सुरूवातही झालेली आहे. मला असे म्हणायचे आहे, एकंदरीत जो पहिला ज्याचा कुठल्याही स्वरूपाचा गुन्हा असेल, त्याची एक मर्यादा गृहीत धरून तिथून सुरूवात व्हायला पाहिजे. मग त्याला आपण एक नंबर म्हणतो की, याने सुरूवात केली, हा एक नंबर. त्याला सहकार्य केले म्हणून दुसरा नंबर. तिस-याने आणखीन काही प्रमाणात सहकार्य केले तर त्याचा तिसरा नंबर. आणि मग त्याच्यामध्ये आणखीन हे भरडले गेले ह्यांचा चौथा. पण आपण ते एक, दोन, तीन सोडून दिलेले आहेत. आणि आपण चौथा, जो अंधारतील माणूस आहे, त्याला आपण टार्गेट बनवले, त्याला दोषी ठरवले आणि त्याला आपण दंड लावतो आहे. म्हणजे कोणाचे आझे कोणाच्या खांद्यावर, अशातला हा प्रकार झालेला आहे. मला या लक्षवेधीच्या माध्यमातून ह्या सभागृहातील सर्व सन्मा. सदस्यांना, अधिका-यांना आणि मा. महापौर महोदय आपणा सर्वांना, कमिशनर साहेब, माझी एक विनंती आहे की, या शहरामध्ये येणारा प्रत्येक माणूस नाना प्रकारचे हालअपेष्टा भोगलेला माणूस आहे. आणि या शहराचे हमेशा त्याने नावलौकिक केलेले आहे. म्हणून महाराष्ट्रामध्ये आणि मला वाटते पूर्ण भारत देशामध्ये अतिशय फास्ट लोकवस्ती झाली. अगदी जलद गतीने शहराची रचना किंवा पॉप्युलेशन वाढले. लोकसंख्या वाढली. त्याला मी असे म्हणणे की, या इकडच्या भुमीचे फार मोठे दायीत्व आहे. आणि मी खास करून या गावाने, हे पूर्वी गाव होते, खेडे गाव होते. त्या गावाच्या रहिवाशांनी ज्या पध्दतीने लोकांना सामावून घेतले आणि त्या गावाचे बघता बघता मोठे शहर झाले. तर ह्या भूमीसी या लोकांचे काहीतरी नाते निगडीत झालेले आहे. हे लोक ह्या ठिकाणी राहायला आलेले आहेत. आणि ज्या लोकांना आपण प्रेम द्यायला पाहिजे, दया दाखवायला पाहिजे, मदत करायला पाहिजे, सहकार्य करायला पाहिजे ते आपण कुठेतरी करत नाही. ते आपण बाजूला ठेवतो. आणि जे दोषी आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष करून म्हणजे आपण चोराला सोडतो आणि संन्यासाला फाशी देतो आणि म्हणून हा विषय वारंवार, आत्ता ज्या ज्या लोकांनी

शास्ती भरायला येत आहेत, जर अधिका-यांकडे गेले ज्यांच्याकडे ते काम सोपवले आहेत ते काय उत्तरे देतील त्याना? काही देत नाही. जे दिले आहे ते भरून टाका असे म्हणतात. पण हे शास्ती ज्या वेळेला आपण हा ठराव केला, मा. महापौर साहेब या ठरावामध्ये आपण दि, १/०४/२००८ नंतर कर आकारणी करताना कर विभागाने मागणी केल्याप्रमाणे ज्या इमारतींना नगररचना विभागाने प्रारंभपत्र दिलेले आहे व इमारत बांधकाम पूर्ण झाले असून त्यास भोगवाटा दाखला दिलेला नाही किंवा घेतलेला नाही. परंतु प्रत्यक्ष वापर सुरू झालेला आहे अशा इमारतींच्या सदनिकांचे किंवा गाळ्यांचे बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे केलेले आहे किंवा नाही याची तपासणी नगररचना विभागाने करून त्यामध्ये मंजुर नकाशाप्रमाणे केलेले सदनिका गाळेनुसार बांधकामाचे अधिकृत क्षेत्रफळ व व अनधिकृत बांधकामाचे क्षेत्रफळ नमूद करून संपूर्ण तपशिल कर विभागास सादर करावा व त्यानुसार कर विभागाने अनधिकृत बांधकामा खालील क्षेत्रफळाला कर आकारणी करताना शास्ती लागू करावी. मला असे वाटते की, या ठिकाणी एवढे सगळे होऊन सुध्दा जर नगररचनेच्या लोकांनी कुठल्या पध्दतीची अशी लिस्ट बनवून जर कर विभागाला दिली असेल तर त्याची सुध्दा माहिती दिली तर बरे होईल. म्हणजे सुरूवातीपासून चुका आणि आत्ता त्या चुकांवर कोणच्यातरी डोक्यावर ओझे ठेवल्यावर सुध्दा आपण चुका करतो. हे कुठेतरी थांबले पाहिजे. मी या ठिकाणी एक परमिशनची कॉपी देते. त्याच्या आधाराने जी माहिती घेतलेली आहे, त्याचे देतो. या ठिकाणी आपण बांधकाम दिलेली आहे, १ ते १४ माळ्याची एक बिल्डींग, बाकी १ ते २ माळ्याची एक बिल्डींग, एक सिंगल माळ्याची बिल्डींग. मला वाटते त्या ठिकाणी नगररचनाचे अधिकारी असतील, त्यांना जरा विचारा की, १ ते १४ ची दिली आहे. तिकडे १ ते १४ च्या दोन आहेत का, ते बघा. त्याच्यामध्ये तुम्हाला मी पहिले पत्र दिले त्याच्यामध्ये त्यांनी तशी माहिती दिली आहे. वाढीव बांधकाम केले असे म्हणतात. बांधकाम सध्याच्या स्थितीमध्ये चालू आहे किंवा पूर्ण व्हायला आले आहे, असेही म्हणतात. पण त्याच्यावर कुठल्या पध्दतीची कारवाई करणार आहेत असे काही म्हणत नाहीत. आणि ती केलीही जाणार नाही. मग आपण परत लोकांना शास्ती लावायची एक चौदा माळ्याची बिल्डींग आहे. तिथे दोन चौदा माळ्याच्या बिल्डींग होतात. तरीसुध्दा हे अधिकारी जर बघत नसतील, काय करत नसतील तर मला सांगा की, आपण नेमके करायचे आहे. लोकांना वेठीस धरायचे, लोकांना त्रास द्यायचा म्हणजे किती द्यावचा? मी मागच्या ठरावाच्या वेळेला...

**कल्पना म्हात्रे :-**

श्री. जंगम साहेब, कुठे झाले आहे ते पण सांगा.

**लक्ष्मण जंगम :-**

मी तुम्हाला कॉपी देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्या विकासकर्त्याचे नाव सांगा.

**लक्ष्मण जंगम :-**

या सगळ्या गोष्टी अशा पध्दतीने व्हायला लागलेल्या आहेत. कुठल्याही पध्दतीची शिस्त नाही. ज्या अधिका-यांकडे ही जबाबदारी आहे, ते कुठलीही जबाबदारी पार पाडत नाहीत. आणि मग आपण सभागृहामध्ये येऊन समाजाला वेठीस धरायचे. अतिशय खालचा म्हणजे मला असे वाटते की, हा आपला ठराव जर वाचला तर आपण ठराव करायला बसलो आहे आणि काय केले याच्याबाबतीत लोक काय बोलतील, मला सांगता येत नाही. इतकी वाईट परिस्थिती आहे. म्हणून मी या लक्षवेधीच्या माध्यमातून आज या सन्मा. सभागृहाला विनंती करतो. कमीत कमी आत्तापर्यंत जे केले आहे त्याला कुठेतरी शिस्त यायला पाहिजे. ज्या बिल्डींगमध्ये पाच माळे बांधले आणि वरचे दोन इलिगल बांधले तर आपण ग्राऊन्डपासून सगळ्यांना शास्ती लावतो. म्हणजे समजा मी घेताना बघून घेतले की, सगळे व्यवस्थित आहे. मागच्या मा. महासभेमध्ये जे मा. महापौर होते त्यांना मी सांगितलेले. ते म्हणाले की, लोकांनी इलिगल बिल्डींगमध्ये घेतलेच कशाला? मी सांगितले की, एवढे लोक जर तुमच्यासारखे हुशार असते तर सगळ्यांचे सेव्हन-इलेव्हन झाले नसते का? कारण तुम्ही ज्या दिशेला फिरता तिकडे तुम्हाला फायदा आणि नुकसान कळते. एवढे तज्ञ लोक नाहीत. लोकांना असे वाटते की, आमचे स्टॅम्प ड्युटी झाले, रजिस्ट्रेशन झाले. त्याच्यामध्ये परवानगीचे पेपर जोडलेले आहेत. म्हणजे निश्चितपणे बिल्डींग लिगल आहे. पण आत्ता याला ज्यावेळेला अनधिकृत बांधकाम म्हणून स्टॅम्प मारून जातो. त्यावेळेला लोकांसमोर असा प्रश्न आहे. मा. महापौर साहेब, लोक विचारतात. आम्ही घेतलेल्या किंमतीत तरी आमचे विकले जाईल का? कारण आम्हाला हा कायम स्टॅम्प लागलेला आहे. म्हणून सभागृहामध्ये या विषयावर व्यवस्थितरित्या चर्चा होऊन, हा जनतेच्या जिव्हाळ्याचा विषय आहे, त्याच्यावर निर्णय घेण्यात यावा असे या ठिकाणी मी सुचित करतो. धन्यवाद.

**भगवती शर्मा :-**

मा. पिठासीन अधिकारी, सन्मा. श्री. जंगम साहबने बहोत अच्छी सुचना दी है की, ऐसे अधिकारीयों पर क्या कार्यवाही हो रही है? जनता, जिसको जानकारी नही है वो फ्लॅट ले रहा है। उसके उपर तिप्पट टॅक्स लग रहा है। ऐसी एक सुचना मेरी भी है। पुनम एन्क्लेव्ह करके एक बिल्डींग है, जो ग्राऊन्ड प्लस फ्लोर की बिल्डींग थी। जिसमे ए विंग और दो विंग, जिसके अंदर लास्ट फ्लॅट ४०१ से ४०४ तक अब कुछ

महिने पहिले उसमे पॉचवे माले पर एक-एक फ्लॅट बनाया गया। उसे ए-४०५ और बी-४०५ नंबर दे दिया गया। जबकी वो पाच माला है। सबसे बडी चीज ऐसी है की, उसके उपर टॅक्स लगाया गया। मेरा आपसे निवेदन है की, टॅक्स लगाने से पहले ऐसे काम को डेमोलीश क्यो नही किया जाता है? जब उसमे रहिवासी वापर नही, कमर्शिअल वापर हो रहा है। जैसे इन्होने अनधिकृत बांधकाम की सुचना दी है, उस सुचना दी है, इस सुचना मे इसको समाविष्ट किया जाए। और उसपर तत्कार कार्यवाही कि जाए।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते. आत्ता श्री. जंगम साहेबांनी जी लक्षवेधी मांडली. साहेब, माझ्या वॉर्डमध्ये देखील एक बिल्डींग आहे. श्री. संदिप पाटील या बिल्डरने बांधलेली आहे. तर त्यांनी गाड्या पार्किंगची जागा, स्टील्ट सगळे कवर केलेले आहे. त्याच्यावर माझे पत्र देखील होते. मा. आयुक्त साहेबांनी माझ्या पत्रावर ताबडतोब आर्डर केली की, ते काढून टाकावे आणि त्या बिल्डरवर गुन्हा दाखल करावा. परंतु, त्या अधिकाऱ्यांनी अद्यापपर्यंत काही केलेले नाही. तर आम्ही फक्त पत्र लिहायची का आणि त्या बिल्डरने आम्हाला खुन्नसने बघावे का? ते कधी तोडायचे? ते कधी काढायचे? आणि जर नगरसेवक एवढ्या तक्रारी करतात तर आपले अधिकारी काय करतात? मा. आयुक्तांनी माझ्या पत्रावर ऑर्डर केली की, ते तोडून त्याच्यावर गुन्हा दाखल करा. याच्यावर मला उत्तर पाहिजे.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, अभी श्री. जंगम साहब ने लक्षवेधी रखा। उनकी लक्षवेधी बहोत अच्छी है। लोगों को इलिगल कन्स्ट्रक्शन का बहोत नुकसान हो रहा है। लेकिन श्री. जंगम साहबने ऐसी लक्षवेधी रखी है, जिसका पाच महले का परमीशन है, उपर के दो महले इलिगल है, या थोडा बढाया है। लेकिन इस मिरा भाईंदर शहर मे बहोत कुछ ऐसा हो जाता है। सर्व्हे नं. ५२५, बाजार आरक्षण की जगह अपने बीएमसी की है। उसपर सात महले की टॉवर इलिगल खडी है। और मै तीन से चार बार मा. महासभा मे यह विषय उठा चुकी हू। हर बार सिर्फ यही होता है, कार्यवाही किया जाएगा। कार्यवाही कब तक किया जाएगा? मिरा भाईंदर शहर मे यह क्या चल रहा है? नगरसेवकों के बार-बार पत्रव्यवहार, बार-बार पत्रव्यवहार, बार-बार तक्रार पर भी कोई ॲक्शन नही लिया जाता है। हम लोग क्या इस महासभा मे सिर्फ अपना वक्त बरबाद करने के लिए आते है?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मला याच्यावर उत्तर मिळेल?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

ह्या संपर्ण सगळ्या प्रश्नांची उत्तरे मा. आयुक्त साहेब एकत्र देतील.

**नयना म्हात्रे :-**

माझा विषय त्यांना सांगा. ते आत्ता आले.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य आणि विरोधी पक्षनेते श्री. लक्ष्मण जंगम साहेबांनी मांडलेल्या लक्षवेधीच्या बाजूने मी बोलत आहे. १०/०४/२००८ रोजी सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी मांडलेल्या ठरावाप्रमाणे याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख होता, ज्या इमारतीवर अनधिकृत बांधकाम जास्त झालेले आहे किंवा वाढीव बांधकाम झालेले आहे. त्याच्यावरच शास्ती लावण्यांत यावी. आणि शासनाने आपल्याला पाठवलेला जो जीआर आहे, तोही स्पष्ट होता. कोणत्या इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम झालेले आहे. मला फक्त प्रशासनाला हेच विचारायचे आहे, कोणाच्या आदेशावर अशा प्रकारे संपूर्ण बांधकामावर शास्ती लावण्यात येते? तसा इथे बऱ्याच लोकांनी उल्लेख केला. चार माळ्यांची इमारत आहे, त्याच्यावर सात माळे, तीन माळे, दोन माळे, अधिक चढवले जातात, बांधले जातात. शास्ती लावताना पूर्ण इमारतीवर लावण्यात आली. ते काम कोणाच्या आदेशावर झालेले आहे? प्रशासन ज्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालामध्ये जे अनधिकृत बांधकाम झाले, त्यांना शास्ती न लावता सामान्य नागरिकांवर अशा प्रकारे हा अत्याचारच आहे. जे बांधकाम अनधिकृत आहे, आधी त्या विकासकर्त्यांवर कार्यवाही केली पाहिजे. ते न करता जे तुमचे करदाता आहेत. कर धारक आहेत, या शहरामध्ये....

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

श्री. इनामदार साहेब, ही सगळी माहिती मा. विरोधी पक्षनेते ह्यांनी दिलेली आहे. आपण जे सांगता तीच संपूर्ण माहिती त्यांनी दिलेली आहे. ते त्यांच्या वक्तव्यामध्ये आलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मला प्रशासनाला फक्त एकच प्रश्न विचारायचा आहे. ही शास्ती लावताना ठरावाच्या बाजूने, जे ठराव मांडला गेला होता तो स्पष्ट होता. मग असे का करण्यांत आले?

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

मा. आयुक्त साहेब या विषयी संपूर्ण माहिती देतील.

**जुबेर इनामदार :-**

मला त्याचे उत्तर पाहिजे.

**सिसीलिया बावीधर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. आत्ता मा. विरोधी पक्षनेता यांनी जी लक्षवेधी मांडली आहे. ती अतिशय चांगली आहे. आपण जो ठराव केला त्या ठरावामध्ये आपण उपसुचना केलेली आहे की, जर गावठणामध्ये कुटूंब वाढल्यामुळे घराचे वाढीव काम केले असेल तर त्याला शास्ती लावली जाणार नाही. पण आमच्या गावात जवळ जवळ ८५-१०० लोकांना शास्ती लावलेली आहे. त्यांचा टॅक्स जर २०० रूपये असेल तर त्यांना ५००० रूपये टॅक्स केलेला आहे. तुमचे घर अनधिकृत आहे. म्हणजे त्यांच्याच घरावर त्यांनी एक रूम वाढवला असेल किंवा एक माळ्याचे दोन माळे केले असतील तर त्यांना कशी शास्ती लावलेली आहे? ही शास्ती रद्द करण्यांत यावी.

**वंदना चक्रे :-**

माझ्या वॉर्ड नं. ७१ बद्दल मी पत्रव्यवहार केलेले आहेत. आशादिप बिल्डींग, ओस्तवाल बिल्डर या ठिकाणी चार माळ्याची परमिशन आहे. ती माळे इलिगल बांधलेले आहेत. मी वारंवार पत्रव्यवहार केला. तशा अनेक आहेत. सगळ्यांचे पत्रव्यवहार मी केलेले आहेत. त्याच्यामध्ये तीन माळे इलिगल बनवलेले आहेत. मा. आयुक्त साहेब, आपल्या आधीच्या काळामधील होते. पण मी पत्रव्यवहार केलेले आहेत. जे तीन माळे इलिगल बनवलेले आहेत त्या लोकांना डबल, टिबल टॅक्स लावला गेला आहे. मी त्यावेळेस सांगितले होते, मा. महासभेतील सगळ्यांना माहिती होते की, बोर्ड लावायचे. ते लावले नाही. लोकांनी घरे घेतली. आज ते लोक माझ्या वॉर्ड मधील माझ्याकडे अशी कितीतरी तक्रारी आल्या की, आम्हाला डबल, टिबल, तीन गुना टॅक्स आला आहे. ते टॅक्स ओनरने भरायचे, ज्यांनी घेतले त्यांनी की, बिल्डरने भरायचे, याचा खुलासा करावा. ओस्तवाल बिल्डरने माझ्या वॉर्डमध्ये तीन-तीन, चार-चार माळे एक्स्ट्रा वाढवलेले आहेत. त्यांना तीन गुना, दोन गुना टॅक्स लावलेला आहे. मी त्यावेळेस सांगितले होते की, तुम्ही ते फलक लावा. ते लावले नाहीत. लोकांनी घरे घेतली. आयुष्याची कमाई. ते तुम्ही तोडणार आहात की, टॅक्स कमी करणार आहात? त्या बिल्डरवर लावणार आहात, याचे मला उत्तर द्यावे.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

साहेब, हा विषय अतिशय गंभीर आहे. म्हणजे नगरसेवक जे पोटतिकडीने बोलतात, तो जनतेला जो पुढे भविष्यात त्रास होणार आहे, आजसुध्दा अनधिकृत बांधकाम, सभागृहाच्या मताशी मी सहमत आहे. कारण या शहरामध्ये काय चालले आहे याचा अनुभव सभागृह बोलल्यानंतर तुम्ही सभागृहात नाहीत? मी सभागृहाशी सहमत बोलतो आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळी सभागृहाला काय माहिती. हा शासनाचा जीआर आहे. जीआर कम्पलसरी पास करावा लागेल. आम्ही विरोध केला होता.

**जयंत पाटील (मा. पिठासीन अधिकारी) :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल मला बोलू द्या. हा अतिशय गंभीर विषय आहे. आज सुध्दा शहरामध्ये बिल्डर ही जी जमात आहे, ती तुम्हाला फाट्यावर मारते. या महापालिकेला या कमिशनरना, आमच्या एटीपी डिपार्टमेंटला कोणीही विचारत नाही हे सत्य आहे. हे नाकारता येत नाही. त्याच्यामुळे तुम्ही शास्तीचा कर लावता. त्यांचे म्हणणे बरोबर आहे. श्री. जंगम साहेब, तुमची लक्षवेधी आहे आणि तुम्ही तिकडे चर्चा करता. बिल्डर निघून जातो. त्यांचे म्हणणे बरोबर आहे. बिल्डींग बांधताना जर अनधिकृत बनत असेल तर आम्ही काही करत नाही. त्याचे सेल होते, फ्लॅटधारकांचे रजिस्ट्रेशन होतात. राहायला येतात, बॅंकचे हप्ते चालू होतात. त्याच्यानंतर मागे आपणच ओस्तवाल बिल्डरची बिल्डींग तोडली. सात माळ्याची चार विंगची बिल्डींग साहेबांनी आल्या-आल्या तोडली. त्यांनी खूप चांगले काम केले. तरी हे बिल्डर सुधारलेले नाहीत. सुधारणा होणार नाही. तुम्ही त्यांना सी.सी. देताना तुमच्या नियमामध्येच आहे की, या आर्किटेक्टना आम्ही काळ्या यादीत टाकू, बिल्डरला काळ्या यादीत टाकू. एकाही बिल्डरला तुम्ही काळ्या यादीत टाकलेले नाही. सगळे सोकावलेले आहेत. त्यांना कसली ही भिती वाटत नाही. जनतेला भविष्यामध्ये त्रास होणार आहे. आणि तीच जनता मोर्चे घेऊन नगरसेवकांकडे येतील, आपल्याकडे येंतील. आपण याच्यात निर्णय घ्यावा लागेल. शासनाने आदेश दिलेले आहेत. शासनाचा उद्देश चांगला आहे. पण आपल्याकडे बिल्डरवर कुठल्या तऱ्हेचे नियंत्रण नाही, ही दुःखाची गोष्ट आहे. यासाठी आपण योग्य तो निर्णय घ्यावा.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, बिल्डरची दादागिरी एवढी चालू असते की, सुपर बिल्टअपचे पैसे घेतात. त्याच्यामध्ये लिफ्ट, गार्डन सगळ्याचे पैसे घेतात आणि रजिस्ट्रेशनमध्ये फक्त बिल्टअप एरियाचे पैसे लिहून देतात. त्याच्यावरपण काहीतरी व्यवस्थित कार्यवाही व्हायला पाहीजे.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदय, गेल्या ग्रामपंचायतीपासून आजतागायत जो ग्रामीण भाग होता या ग्रामीण भागावर आपण कराचे ओझे टाकलेले नव्हते. परंतु, या शास्तीने जे-जे लोक साधी रिपेअरिंग करतात, त्या रिपेअरिंगचे १०० रूपये असेल तर चार ते पाच हजार रूपये टॅक्स त्याला आत्ता भरावा लागतो. लोकांचे कंबरडे त्या शास्तीने मोडलेले आहे. ग्रामीण भागामध्ये गेल्यानंतर आम्हाला वाटले होते की, शहर आम्हाला सामावून घेऊ शकेल. जास्त टॅक्स भरू शकणार नाही अशी आशा होती. परंतु या जी.आर. ने आमची आशा फोल ठरलेली आहे. त्यामुळे लोक शास्तीचा हा कर सांगत असताना, श्री. जयंत पाटील, तुम्हालापण भेटले असतील. श्री. जंगम साहेबांनी ती चांगली लक्षवेधी सुचना आणलेली आहे की, तुम्ही ग्रामीण भागातील लोकांना शास्ती कामी करण्याचा विचार करावा. कारण ही शास्ती जर कमी केली नाहीतर ग्रामीण भागात एका घरामध्ये चार-चार, पाच-पाच कुटूंबे राहतात. साधी खोली काढली तर टॅक्स लावायचा झाला तर शास्ती, मा. महापौर सो., आयुक्त साहेब आपण याचा विचार करावा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जे अनधिकृत बांधकामाला शास्ती लावतो. जे सदनिकाधारक आहेत, त्यांना टॅक्स विभागाकडून शास्ती लागत असेल असे मला वाटते. आणि ती इमारत ज्यांनी बांधली, म्हणजे बिल्डर आणि आर्किटेक्ट, त्यांच्यावर नगररचना विभागाकडून कार्यवाही होत असेल. तर असे काही उदाहरणे आम्हाला द्या की, ज्या फ्लॅट ओनरला आपण शास्ती लावली आहे. ती बिल्डींग बांधणारा विकासक आणि वास्तुविशारद यांच्यावरपण कार्यवाही झाली अशी दोन तीन उदाहरणे तरी आपण सभागृहासोर ठेवा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, माहितीच्या अधिकाराखाली माहिती ही सर्वांना ज्ञात आहे. ती सांगण्याची आवश्यकता नाही. आणि माहितीच्या अधिकाराखाली ज्यांना माहिती पाहिजे ते सर्व लोक माहिती घेतात. आणि माहिती देत नाही असे आम्ही म्हणू शकत नाही. त्यामुळे हायकोर्टाने असा निर्णय दिला की, माहितीच्या अधिकाराखाली ओपन असल्यामुळे कोणतीही माहिती घेण्याचे कोणत्याही नागरिकाला मला हे समजले नाही असे म्हणता येणार नाही. मला हे समजले नाही असे म्हणता येणार नाही. मला हे बांधकाम लिगल आहे की इलिगल आहे हे मला समजले नाही म्हणून मी खरेदी केली असे म्हणता येणार नाही. कारण माहितीच्या अधिकाराखाली सर्व माहिती ओपन केलेली आहे.

(सभागृहात गोंधळ )

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मा. आयुक्तांना बोलू द्या. तुम्ही नंतर बोला. तुमचीच लक्षवेधी आहे.

**मा. आयुक्त :-**

आत्तापर्यंत आम्ही ३८६ बांधकामे तोडलेली आहेत. बेकायदेशीर बांधकामे करणारे निगरगट्ट लोक असतात. आणि आपण तोडायला गेल्यानंतर दोन तासामध्ये स्टे येतो. स्टे आल्यानंतर आम्ही पुन्हा मागे येतो. स्टे उठवतो, परत तोडतो, परत संध्याकाळी पाच वाजता स्टे येतो. स्टेची बांधकामे आत्ता माझ्यासमोर फक्त सात आहेत. बाकीची सर्व बांधकामे तोडलेली आहेत. आणि पूर्वीची जी तोडायची आहेत, त्याचा सर्व्हे चालू आहे. हायकोर्टानेच आदेश दिलेले आहेत. ठाणे, कल्याण-डोंबवली, मिरा भाईंदर, भिवंडी, उल्हासनगर ही सर्व बांधकामे सर्व्हे करून ३१ मार्चपूर्वी सादर करायला सांगितली आहेत. आत्तापर्यंत ३८६ बांधकामे तोडलेली आहेत. मा. विरोधी पक्षनेता यांनी जे सांगितले, पण त्यांनी कर आकारणी करताना बाहेरून येणारी व्यक्ती कोण आहे हे आम्हाला माहिती नाही. त्याला भुर्दंड पडायला नको असे म्हटले आहे. परंतु ठरावामध्ये असा शब्दप्रयोग आहे, १९ गावांना लावू नका. बाहेरच्यांना लावले तर चालेल. या विषयावर झालेल्या ठरावावर उपसुचना सादर करीत आहे. मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात १९ गावे असून पिढ्यान् पिढ्या गावकरी तिथे राहतात. कुटूंब वाढल्यामुळे मोडकळीस आलेल्या जुन्या घराची दुरूस्ती व पुर्नबांधकाम केले जाते अशा गावठणास शास्तीतून वगळण्यात यावे. बाकीच्यांना लावा. त्यामुळे जे लोक गावठाण एरियामध्ये राहतात, त्यांनी दुरूस्तीच्या नावाखाली एक माळा, दोन माळे असतील तर ते सहा-सहा माळ्यापर्यंत वाढवतात. आणि कायदा असे म्हणत नाही की, बाहेरून येणाऱ्या किंवा गावठाण सोडून असलेले तिथे इलिगल असेल तर तिप्पट करा आणि गावठाणामध्ये एकपट करा असे कायद्यामध्ये कुठेही प्रोव्हीजन नाही. आणि ही फक्त मिरा भाईंदरमध्येच आकारणी केली जाते असे नाही. हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रासाठी आहे. महाराष्ट्रामध्ये सर्व ठिकाणी जिथे-जिथे बेकायदेशीर घडतील तिथे-तिथे तिप्पट कर आकारणी करायची. आपण आत्ता कुठलीही वस्तु खरेदी करायला जाताना दहा वेळा विचार करतो. आपल्याला माहितीचा अधिकार दिलेला आहे. इथे मी फ्लॅट घेणार आहे, हे फ्लॅट कायदेशीर आहे की नाही हे विचारून खरेदी केले तर बरे होईल. यापूर्वी आपण बोर्ड लावले होते. बोर्ड बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्यांनी काढून टाकले. आम्ही त्या-त्या ठिकाणी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला. त्यांना तो माणूस सापडत नाही. आम्ही लावलेले बोर्ड कोणी फेकून दिले हे ही कळत नाही. आपण असे समजायला पाहिजे की, बेकायदेशीर घरकामवाल्यांनीच काढला. असे समजून गुन्हा दाखल व्हायला पाहिजे आणि अटक व्हायला पाहिजे. आम्ही एमआरटीपी दाखल करतो. पोलिस स्टेशनमध्ये जामीन होतात. आम्ही

एमआरटीपी दाखल केल्यानंतर कोर्ट त्यांना निर्दोष सोडते. एमआरटीपी ॲक्ट असा आहे, पहिल्यांदा बेकायदेशीर बांधकाम सुरू झाले असेल तर ५४ ची नोटीस द्यायची, काम बंद करा म्हणून. दोन तीन फुट वाढले की, ५३ आपोआप लागू होते. म्हणजे डिमॉलीशला लाएबल होते. तोपर्यंत ते ओपन जागेवर माझे दोन माळे आहेत म्हणून स्टे आणला जातो. आम्ही कोर्टाला दाखवतो की, ही ओपन जागा आहे. त्याचे दोन माळे नाहीत. तरी ते दुसऱ्या इमारतीचे फोटो घेऊन दाखवतात. कोर्ट तेच ग्राह्य धरले जाते. आपण त्या विषयी वक्तव्य करू इच्छित नाही. परंतु स्टे आल्यानंतर आम्ही जर तोडायला गेलो तर कन्टेमट होतो. आपण रवि बिल्डरच्या बाबतीत दोन मुद्दे दिलेले आहेत. रवि बिल्डरची नाल्यावरची सात माळ्याची बिल्डींग तोडलेली आहे. आणि बाकीचे आहे ते कोर्टात दोन्ही पार्ट्यांमध्ये भांडण चालू होते. हायकोर्टात मॅटर होते. हाटकोर्टामध्ये जे मॅटर दोन पार्टनरमध्ये चालू होते. बांधकामे नियमित आहेत की, नाही हे तपासून बांधकाम परवानगी द्या असे सांगितले आहे. जे नियमात बसणारे नव्हते, नाल्याच्या बाजूला होते, ते सात माळ्याचे रवि बिल्डरचे तोडलेले आहे आणि दुसरे ५४५ नंबरचे कोर्टातून स्टे आहे. स्टे उठेपर्यंत आम्ही विधी विभागाला आदेश दिलेले आहेत, थर्ड पार्टी इन्टरेस्ट क्रिएट करू नका असे सर्व बिल्डींगमध्ये ऑर्डर घ्या. जेवढी बांधकामे आहेत, आमच्यासमोर आत्ता सात बांधकामे आहेत, मी तुम्हाला सांगितलेले आहे की, मिरारोडला दोन आहेत, १५४ नंतर सीआरझेड मध्ये दोन आहेत आणि ज्या सात बिल्डींग उभ्या आहेत त्यांना थर्ड पार्टी इंटरेस्ट क्रिएट करू नका. म्हणजे कोर्टाचा निर्णय होईपर्यंत त्याला विक्री करायला अलाऊड करू नका. एका केसमध्ये आमच्या बाजून निर्णय झाला. त्यावेळेला थर्ट पार्टी इंटरेस्ट करू नका असे कोर्टाने आदेश दिलेले आहेत, तुम्ही त्यांचे खरेदी विक्रि करू नका असे आम्ही सबरजिस्ट्रारला कळवले. सबरजिस्ट्रारचे आम्हाला उत्तर आलेले आहे की, तुमची ऑर्डर आम्हाला लागू नाही. त्या केसमध्ये आम्ही पार्टीचे रजिस्ट्रेशन करणार. सगळ्या गावठणामध्ये आपण रिलॅक्सेशन देऊ शकणार नाही. जर द्यायचेच असेल तर हा महाराष्ट्र लेव्हलचा निर्णय आहे. म्हणजे गावकरी वेगळे आणि बाहेरचे वेगळे असे......

**लक्ष्मण जंगम :-**

एवढाच विषय मी तुम्हाला सांगण्यासाठी उठलो होतो. मी जे बोललो आणि तुम्ही समजवता त्याच्यामध्ये जो फरक आहे, तेवढाच सांगण्यासाठी उठलो हातो. मी असे म्हटले की, एखादा जो स्थायीक माणूस आहे त्याला कुठल्या ठिकाणी काय चालले आहे त्याच्या बद्दलची जानकारी असते. साहेब, तुम्ही जेवढ्या पोटतिडकीने सांगता तेवढ्या पोटतिडकीने काम झाले तर ५० टक्के सुध्दा असे झाले नसते. ही सत्य परिस्थीती सांगतो. तुम्हाला ते मानावे लागेल. ठिक आहे, तुम्ही त्यांना सांभाळून घ्या. तुम्ही त्यांचे इन्चार्ज आहात. त्यांना सांभाळा निश्चितपणे तुम्ही तुमची बाजू मांडता त्याच्याबद्दल मला काही म्हणायचे नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही असे बोलून चालणार नाही. तुम्ही स्टे नसलेले आणि बांधकाम न तोडलेले दाखवा.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, तुम्हाला तशा पध्दतीची पाहिजे मग आम्हाला तशी माहिती गोळा करायला.

**मा. आयुक्त :-**

दाखवा, मी तिथे उद्या बुलडोझर नाही नेला तर दाखवा.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब, मै आपको अब बता सकता हू की, मा. आयुक्त साहब ने स्टे हटने के बाद भी, देड साल तक अपने प्रशासन के पास मॅटर पडा रहा। और जब मैने उस को ध्यान मे लाया, तो वापस हिअरिंग लगायी है। जब पहले नोटीस दिया हुआ था, ५५०-१९९८ विधी मॅडम को मालूम है। आपके पास हेअरिंग हुआ था। स्टे हटा हुआ था। देढ साल तक केस पेंन्डींग रहा था। नगररचना लिखकर दिया हुआ है। फिर भी मा. आयुक्त साहब ने हेअरिंग लगाया। एक बार जब कोर्ट का स्टे हट गया और आपने खुदने नोटीस देने को लिखा हुआ था तो उसपर हेअरिंग लगाने की क्या जरूरत थी? आप बोलते है की, एक बताओ। स्टे हटने के बाद आपने फिर हेअरिंग लगाया। फिर उसको मौका मिला, फिर कोर्ट मे या फिर स्टे लाया। यह मै आपको एक्साम्पल देता हू। आपने बोला माहिती का अधिकार सबको मालूम होता है। किस अधिसूचना मे, किस बील मे, पब्लीक को सुचना दी है आप माहिती के अधिकार से मालूम करो। जब भी कोई प्रोग्राम करना पडता है, एज्युकेशन देना पडता है तो आप एव्हिडन्स प्रोग्राम लेते है। पब्लीक को बोलते है। माहिती का अधिकार कितने लोगों को मालूम है? आपने खुदने बोला था। श्री. पाटील साहबने बोला था, अपने नगरपालिका के अंदर एक विंडो सिस्टम होना चाहिए की, सर्टीफाइड कॉपी मिले, यह बिल्डींग प्लान लिगल है की, इलिगल है। दस दिन के जगह पाच दिन मे मिलना चाहिए माहिती का अधिकार आज देंगे. एक महिने के बाद हमको......

**मा. आयुक्त :-**

एमआरटीपी किया है।

**भगवती शर्मा :-**

किसको?

**मा. आयुक्त :-**

हमने हर एक बिल्डींग पर एमआरटीपी किया है।

**भगवती शर्मा :-**

साहब, इनको ब्लॅक लिस्टमे डालिए नही तो यह बार बार आकर प्लान पास करके लेकर जाते है। इनको आप ब्लॅक लिस्टेड किजीए।

**राजेंद्र जैन :-**

मैने विधी विभाग से पुछा था कि, कितने केसेस करते है? केसेस दायर करते नही है? बोलते है की, हम कोई केस दायर नही करते है। कोई एमआरटीपी करते नही है।

**मा. आयुक्त :-**

डॉक्टरांचे दोन मिनिटात उत्तर देतो.

**लक्ष्मण जंगम :-**

डॉक्टरांचे होऊ द्या. मी असे म्हणतो, तुम्ही आत्ता म्हणालात की, आपण सबरजिस्ट्रारना पत्र दिले. मी असे म्हणतो, तुमच्या महानगरपालिकेच्या परमिशनची बोगस पेपर्स येऊन रजिस्टरमध्ये, मी हजारो म्हणतो, हजारो सदनिकांच्या बाबतीत बोगस पेपर केलेले आहेत. तुम्ही म्हणाल तर मी ती माहिती घेतो. तुम्हाला आणून सादर करतो. पण मला एक गोष्ट सांगा, ज्यावेळेला तुमच्या महानगरपालिकेचे बोगस पेपर कोणी बनवून करतो तर रजिस्ट्रारना पत्र देऊन थांबवणे कितपत योग्य आहे? तुम्ही पोलिस स्टेशनला कारवाई करायला पाहिजे की नाही?

**मा. आयुक्त :-**

पत्र देऊन थांबलो असे म्हणत नाही. कोर्टाची ऑर्डर होती की, थर्ड पार्टी इंटरेस्ट क्रिएट करू नका. कोर्टाकडून आम्ही बेकायदेशीर बांधकाम आहे. थर्ट पार्टी इंटरेस्ट क्रिएट करू नये अशी ऑर्डर सबरजिस्ट्रारवर बजावली. सबरजिस्ट्रार म्हणाले की, त्या केसमध्ये मी पार्टी नाही. मी रजिस्ट्रेशन करणारच. आणि कोर्टात ज्या केसेस चालू आहेत ते खोट्या सहीचे प्लॅन, खोट्या सहीच्या ऑर्डर स्कॅनिंग केलेले आम्ही सर्व कागदपत्रे दाखवली. आमचा आऊटवर्ड नाही, आमच्या परवानग्या नाहीत हे बिगर परवाना आहेत. हे सगळे केस पेपर पाहिजे तर मी तुम्हाला देतो. एकाच खोट्या प्लॅनवर तीन बांधकाने उभी राहिलेली आहेत. आणि सबरजिस्ट्रारला आम्ही कळवून देखील सबरजिस्ट्रार म्हणतात की, आम्हाला पार्टी करून ऑर्डर घेतली तरच आम्ही रजिस्ट्रेशन थांबवू शकतो. सबरजिस्ट्रारकडे जेवढे रजिस्ट्रेशन झालेले आहेत ते सगळे बोगस कागदावर झालेले आहेत. बॅंकेकडे जी लोनची प्रकरणे झालेली आहेत ती सगळी बोगस कागदावर झालेली आहेत.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहब, आपने शुरू मे कहा की, माहिती के अधिकार मे आम नागरिक भी माहिती ले सकता है।

**मा. आयुक्त :-**

इसका मतलब यह नही है की, मुझे मालूम नही है। कोई भी आदमी बता नही पायेगा।

**स्नेहा पांडे :-**

माहितीका अधिकार कोई भी ले सकता है यह बात एकदम सत्य है। लेकिन कोई भी बिल्डींग जब बनना शुरू हो रही है इसके तीन माले, चार माले का परमिशन है ना? अगर माहिती के अधिकार मे कोई भी व्यक्ती बुकींग कराने से पहले मांगता है, तो इसको जवाब तो नही मिलेगा।

**मा. आयुक्त :-**

मॅडम इसके पहले भी मैने बता दिया की, ओपन प्लाट है। ओपन प्लॉटपर केस स्टे लेने के लिए गये है। और उन्होने बताया की, हमारा तीन माला हो गया है। हमने कोर्ट को कागज दिखाया, वो ओपन प्लॉट है। उधर बांधकाम नही है। तो भी कोर्ट ने स्टे दिलाया। वह दुसरे बांधकाम का फोटो उधर लेकर जाते है।

**स्नेहा पांडे :-**

उसके लिए कौन जिम्मेदार है?

**मा. आयुक्त ;-**

सुबह निकल जाते है, शाम को स्टे आता है।

**स्नेहा पांडे :-**

आपने निकल जाते है, शाम को स्टे आता है।

**स्नेहा पांडे :-**

आपने कितने लोगो पर एमआरटीपी दाखल किया है?

**मा. आयुक्त :-**

स्टे आया हुआ बांधकाम हम तोड नही पायेंगे।

**मा. पिठासीन अधिकारी :-**

सन्मा. नगरसेवक, मा. आयुक्तांचे ऐकून घ्या.

**स्नेहा पांडे :-**

एमआरटीपी कितने लोगों पर लगाया है उसकी माहिती मिलेगी तो अच्छा रहेगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दोन एमआरटीपी झाल्या आहेत. त्या झोपड्यांवर झाल्या आहेत.

**(सभागृहात गोंधळ )**

**चंद्रकांत मोदी :-**

मा. आयुक्त साहब ने जैसा बताया की, ३८६ इमारत तोडे। उसमे शासकिय कितने है?

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, आरक्षण क्र. ५२५ का जवाब नही मिला है।

**मा. पिठासीन अधिकारी :-**

लक्षवेधी ज्या विषयावर आहे त्या विषयावरच बोला.

**चंद्रकांत मोदी :-**

गये टाईम पर बताया था, जो अनधिकृत बिल्डींग है, उस पर बोर्ड लगाने का बोला था। अपने मा. महासभा मे ठराव भी मंजुर हुआ था वो बोर्ड भी अब तक नही लगे।

(सभागृहात गोंधळ )

**मा. पिठासीन अधिकारी :-**

एक-एकाने बोला.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहब, आरक्षण क्र. ५२५ का क्या ॲक्शन है, इसका जवाब आपने दिया नही।

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ज्यांची लक्षवेधी आहे त्यांना बोलू द्या.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहब, मेरे प्रश्न का जवाब नही दिया। मुझे जवाब दिजिए।

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब, आरएनए कोटीयार ने भी बिल्डींग तोडा था। वो फिर से बन गया।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आत्ता मा. कमिशनर साहेबांनी सांगितले की, आम्ही सकाळी केस दाखल करतो. संध्याकाळी आम्हाला स्टे मिळते.

**मा. आयुक्त :-**

आम्हाला नाही. बिल्डर लोकांना.

**मिलन पाटील :-**

म्हणजे बिल्डर लोकांना मिळाला म्हणजे .....

(सभागृहात गोंधळ )

**मिलन पाटील :-**

बिल्डरला एकतर्फी मिळत नाही. तर मी काय सांगतो की, जर तुम्हांला स्टे मिळाला तर त्याच्या पुढील कार्यवाहीकरिता वरचे कोर्ट आहेत की नाही? तुम्ही वरच्या कोर्टात का जात नाही? आपले म्हणणे जर खरे असेल तर आपण हायकोर्टामध्ये जातो की नाही? किंवा वरचे जिल्हा कोर्ट आहे, त्याच्यामध्ये आपण जाऊ शकतो की नाही? खालच्या कोर्टाने तुम्हाला स्टे दिला असेल. वर आहेत ना. अशा तुम्ही किती केसेस त्या कोर्टामध्ये केल्या?

**मा. आयुक्त :-**

साहेब, हे सांगण्याची गरजच नाही. तालुका कोर्टात आम्ही हरलो की, डिस्ट्रीक्ट कोर्टात अपिलमध्ये येतोच. अपिलमध्ये आल्या नंतर अपिलमध्ये हरलो की हायकोर्टात जातो.

**मिलन पाटील :-**

तुम्ही अशी किती केसेस केल्या?

**मा. आयुक्त :-**

त्याची माहिती मागा, मी देतो, डिस्ट्रीक्ट कोर्टात निर्णय झाल्याशिवाय हायकोर्टात जाता येत नाही.

**मिलन पाटील :-**

डिस्ट्रीट कोर्टात किती आहेत?

**मा. आयुक्त :-**

डिस्ट्रीट कोर्टातून हायकोर्टात किती गेले त्याची यादी मागा मी देतो.

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, आपण एकही केस जिंकलेली नाही. आपली जिंकलेली एक तरी केस दाखवावी. विधी अधिकाऱ्यांनी अशा केसेसमध्ये किती केसेस जिंकल्या त्या दाखवाव्या. म्हणजे वर पाठवले की काम संपले. प्रत्येकाला टी.डी.आर. मा. आयुक्त साहेब, दोन मिनिटे आमचेपण ऐकून घ्या. आपण माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. आपण बोललात की, बोर्ड लावले. मी कुठेही अजूनपर्यंत बोर्ड बघितलेले नाहीत. आपण लावला असेल तर आपल्याकडे काय प्रुफ आहे? त्या बोर्डचे फोटो काढलेले आहेत का?

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला दाखवून लावले नाही ही आमची चुक झाली.

**वंदना चक्रे :-**

आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. आम्हाला दाखवू नका. पण तिथे बोर्ड लावलेले नाहीत. याची आपण नोंद घ्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, शास्तीचा विषय आहे. त्याच्यावरच उत्तर देऊ द्या.

**अनिल सावंत :-**

साहेब, तीन तास झाले. फक्त प्रश्नोत्तरे आणि लक्षवेधीवर आपण वेळ घालवतो आहे. लक्षवेधीचा मुळ उद्देश आहे. शास्ती लावणे आणि जे दोषी अधिकारी आहेत, त्यांच्यावर कारवाई हे प्रकरण कुठच्याकुठे भरकटत चालले आहे आणि याच्यातून काही निष्पन्न होणार नाही. तुम्ही ठरावाच्या विरोधात जाऊन जी शास्ती लावता, त्याच्यावर काय करणार आहात ते सांगा.

**लक्ष्मण जंगम :-**

याच्यामध्ये माझा मुद्दा असा आहे की, चार नंबरचा जो खरीददार आहे, त्याच्यावर आपण शास्ती लावली. ही सुरूवात एक नंबरपासून झाली पाहिजे. तो बिल्डर, त्याचा आर्किटेक्ट आणि अधिकारी या सर्वांवर रितसर कार्यवाही झाली पाहिजे. नंतर जे इललिगल असतील, जसे आत्ता कमिशनर साहेबांनी सांगितले, माहितीच्या अधिकाराखाली आपण घ्यायला पाहिजे होते. ठिक आहे, लोकांचे चुकले. त्यांनाही भरू द्या. पण ज्यांच्यापासून सुरूवात झाली, त्यांच्यापासून जर सगळ्या दोषींवर कारवाई होत असेल तर हा शास्तीचा विषय इथे सभागृहामध्ये आहे तसा करायला माझे मत ठिक राहील नाहीतर जर या तिन्ही लोकांना सोडून देणार असाल, बिल्डर सुटतो, आर्किटेक्ट सुटतो आणि अधिकारीही सुटतात. तर शास्तीचा विषय शहरवासी बिलकुल सहन करणार नाहीत. त्याच्यासाठी जर कार्यवाही होत असेल तर एक नंबरपासून होऊ द्या, बिल्डर, विकासक आणि अधिकारी, कमिशनर साहेब, तुम्ही सांगता की, नेमक्या पाच सहा बिल्डींग आहेत, हजारोच्या संख्येने या शहरामध्ये बिल्डींग होतील.

**मा. आयुक्त :-**

सबरजिस्ट्रारचे पत्र वाचून दाखवतो. सर्वे नं. ४६९ पै जुना, नवीन १४३ जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत.... उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, मौजे नवघर, सर्व्हे नं. ४६९ जुना १४३ नवीन मधील इमारत चव्हाण बिल्डर्स यांनी अनधिकृत इमारत बांधली आहे व त्यातील सदनिका नोंदणी करु नये. न्यायालयाने थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण न करण्याचे आदेश दिलेले आहेत परंतु सदरच्या दाव्यात हे कार्यालय पक्षकार नसल्यामुळे न्यायालयाचे आदेश या कार्यालयास लागू होत नाहीत. तरी सदर विषयांबाबत आपण आपल्या स्तरावर कार्यवाही करावी. म्हणजे सबरजिस्ट्रार आम्ही त्या केसमध्ये पार्टी नसल्यामुळे तुमचा आदेश आमच्यावर बंधनकारक नाही. असे सबरजिस्ट्रारने कळवले आहे. त्याची कॉपी घ्या. आणि सबरजिस्ट्रारला विचारून घ्या. जे आर्किटेक्ट आहेत ते बिगर परवानामध्ये नसतात. ज्यावेळेला नियमाप्रमाणे बांधकाम चालू होते, त्यावेळेला नियमाप्रमाणे चालू असलेले बांधकाम होईपर्यंत ते त्यावर अपॉइन्टमेंट केलेले असतात. ज्यावेळेला विकासक इललिगल सुरू करतो त्यावेळेला तो राजीनामा देऊन बाहेर पडतो. आणि विकासकाला ब्लॅकलिस्ट करण्याची प्रोव्हीजन रजिस्ट्रेशन फक्त आर्किटेक्टचे आहे. बिल्डरचे रजिस्ट्रेशन आमच्याकडे नसते. बिल्डरवर कोर्टाकडूनच ऑर्डर आणावी लागते. आणि आपल्याला सदसद्विवेकबुध्दीपूर्वक जिरवायचेच असेल तर त्या केसमध्ये पार्टी होणे आवश्यक आहे. कारण तुम्हाला जेवढे वेटेज असते तेवढे वेटेज महापालिकेला मिळेलच असे सांगता येत नाही. तर ज्याचे बांधकाम तोडायचे असेल, आम्ही तुमच्या बरोबर आहोत. तुम्ही त्या केसमध्ये पार्टी व्हावे. केस जिंकल्यानंतर तुमच्या समोरच बुलडोझर लावून तोडतो. ज्या-ज्या केसमध्ये आमच्या बाजूने निर्णय लागलेला अहे, त्या-त्या केसमध्ये आम्ही तोडलेले आहे. जे कोर्ट मॅटर होऊन स्टे आहेत, त्यामध्ये कन्टेम्पट होईल म्हणून आम्ही तोडलेले नाही. एक केस डिस्ट्रीक्ट कोर्टातून आमचे विरुध्द गेला, त्या केसमध्ये आम्ही होयकोर्टात अपील केले. महापालिकेनेपण तोडू नये आणि विकासकानेपण बांधू नये असे हायकोर्टाचे ऑर्डर आलेले आहेत. सौ. चक्रे मॅडमनी तक्रार केली होती, त्या केसमध्ये आम्ही अपील केले. अपीलमध्ये ते फ्लॅट विकू नयेत. विकासकाने बांधकाम करू नये, आणि महानगरपालिकेने तोडू नयेत. अशा तऱ्हेची ऑर्डर हायकोर्टाची आहे. त्याच्याप्रमाणे आम्ही त्यांना कळविले आहे. विकासकाने बांधकाम करू नये. जैसे थे ठेवावे. हायकोर्टची ऑर्डर आहे. तुम्ही म्हणता ते

मलाही मान्य आहे. मी सभागृहात बोलू शकत नाही. परंतु, हायकोर्टाच्या ऑर्डरमध्ये चेंज करता येत नाही. आम्ही फोटो सादर केलेले आहेत.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहेब, सर्वे नं. ५२५ पर .....

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त साहेब, माझा विषय पुर्ण झालेला नाही. आपण उत्तर दिलेले आहे, त्याचे मी स्पष्टीकरण करते. चव्हाण बिल्डरचे आपण आत्ता हायकोर्टाचे जे आदेश सांगितले की, भविष्यात कधीही ती बिल्डींग तोडणार नाही, चालू करणार नाही, राहायला येणार नाही...

**मा. आयुक्त :-**

याचा अर्थ त्या बिल्डरचे नुकसान झाले नाही की? विकू शकत नाही, बांधू शकत नाही आणि चेंज करू शकत नाही. यापेक्षा दुसरी ऑर्डर काय पाहिजे?

**वंदना चक्रे :-**

त्या ठिकाणी आमची एक सुचना आहे की, तिथे बोर्ड लावा.पण जे ओस्तवाल बिल्डरचे सांगितले ते तोडणार आहात का?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

डॉक्टर साहब, बोलिए। आपका क्या है?

**मा. आयुक्त :-**

ही जी बांधकामाची नावे सांगितली, ते माहिती मागवून तुम्हाला सांगतो.

**स्नेहा पांडे :-**

कब मिलेगा? चार महासभासे मै ऐसे ही पुछ रही हू। माहिती मंगाकर देते है।

**मा. आयुक्त :-**

पाच मिनिट मे लाता हू।

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, बहोत धन्यवाद। आपने मुझे बोलने का मौका दिया। मा. आयुक्त साहब ने यह बोला की, कोई भी ऐसा स्टे बता दो, जिस पर हमने कारवाई नही की। मैने मा. आयुक्त साहब को ५५०/१९९८ की एक केस मे बताया जिसमे स्टे उठने के बावजुद भी देढ साल तक फाईल महानगरपालिका मे पडी रही है। ५५०/१९९८, सुदामा ब्रदर्स का, देढ साल तक स्टे हटने के बाबजुद केस फाइल मे पडी रही है। यह मेरा ओपन चॅलेंज है। उसके बाद जब मैने बात किया तो उसपर हेअरिंग लगाया गया, टाईम दिया गया, तीन महिने निकाला गया और वापस स्टे ले लिया गया। यह नंबर एक पॉईन्ट है। इसका जवाब मा. महासभा मे मा. आयुक्त साहब दे की, क्यो देढ साल तक वह फाईल अटकी रही? नंबर दो बात, मा. आयुक्त साहब जो बोले की, सुबह बोलते है और शाम को स्टे आता है। यह विफलता किसकी है, विधी विभाग की है। विधी विभाग ने आज तक कभी ॲनेलिसीस किया की, जिन पॅनल के वकीलों को किया है, उसपर स्टे किस कारण से आ रहा है? वह हमारा काम कर रहे है की, बिल्डर का काम कर रहे है। आज तक कभी विधी विभागसे ॲनेलिसीस नही लिया गया है। जो पॅनल पर वकील काम करते है वो क्यो, सात साल तक केस, यानी के एक बार अटेंड नही हुआ, क्यो इतनी लंबी डेट मिलती है? अपना वकील बिलकुल नही बोलता हे। हमारे वकील जो काम करते है, वो क्या काम करते है, इसका ॲनेलिसीस करने जिम्मेदारी किसकी है? आज तक एक भी कागज दे दिया जाए, जिसमे यह पुछा गया हो की, यह स्टे क्यों मिला? हमारी क्या गलती गै? हमारे वकील क्या काम कर रहे है? पॅनल के वकील का ॲनेलिसीस करना अपना काम ही नही है। यानी के पैसा हम दे, टाईम हमारा खराब हो और वकिल बिल्डर का काम करते है।

**मा. आयुक्त :-**

यह बात गलत है।

**राजेंद्र जैन :-**

यह गलत नही है। एक भी ऐसा कागज बता दिजीए जिसमे आपने किसी वकील को नाटीस दिया हो की, इस केस मे इतना टाईम क्यो लगा? क्यों डेट लंबी गयी? क्यो हारे? विधी विभाग ने कभी ॲनेलिसीस किया? इतना मुझे जवाब दिजीए। यह काम आपका है। आप नियोक्ता है। आप नियुक्ती करते है।

**मा. आयुक्त :-**

हमारा से क्या दर्ज हुआ, हमारे खिलाफ क्यो गया? हम डिस्ट्रीक्ट कोर्ट मे अपील करते है। और कोर्ट को हम नही पुछ पायेंगे।

**राजेंद्र जैन :-**

आपको किस कारण से स्टे मिला? आपके वकील के डिपार्टमेंट के अंदर रोजनामा की कॉपी नही है। किस केस की कितनी हेअरिंग हुई है इसकी डिटेल नही है। आपके पास डिटेल नही है तो आप काम कैसे करेंगे? मेरे पास आरटीझेड के अंदर पुरा जवाब दिया गया है। केस के हेअरिंग के डेट नही है। आप के पास

से महिनेभर के अंदर जवाब आता है। अगर आज स्टे मिला तो विधी विभाग को महिने भर के बाद नोटीस आता है की, स्टे मिला है। रोज के रोज जानकारी लेने के हालत मे अधिकारी नही है? यह इन्होने मुझे लिखकर दिया है। आप कैसे काम करेंगे? आप अधिकारी से पुछिए। इन्होने मुझे लिखकर दिया है की, हम लोग किस कारण से मिला यह तो बात ही नही है। ॲनेलिसीस, आप नियोक्ता है। पॅनल के वकिलों की नियुक्ती करते है। तो उसकी जिम्मेदारी आप की है की, वो कैसे काम कर रहे है। आज तर कभी ॲनेलिसीस हुआ है। इसी कारण से सब गडबड हो रही है। या तो आप गडबड करते है, फिर कोर्ट या फिर कोर्ट पर डाल देते है। आप भी सरकार और कोर्ट भी सरकारी है। अभी आपने आज तक गव्हर्नमेंट का लेटर लिखकर दिया की, हमे कोर्ट से गलत जजमेंट मिलता है। यह ड्युटी किसकी है? लिखकर देना चाहिए। आपको आगे भेजना चाहिए की, कोर्ट से गलत जजमेंट आ रहा है। ॲनेलीसीस होना चाहिए, कोर्ट गलत है की हमारे वकील गलत है।

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मला अजूनपर्यंत उत्तर मिळाले नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

आत्ता मा. आयुक्त साहेबांनी त्यांच्या माहितीमध्ये सांगितले की, ज्या ज्या लोकांवर, ज्यांनी इललिगल केले आहे. त्या सर्वांवर कारवाई केलेली आहे. एम.आर.टी.पी. चे गुन्हे दाखल केलेले आहेत. साहेब, बरोबर ना? मी असे म्हणतो की, ज्या बिल्डींगमध्ये किंवा त्या बिल्डरवर तुम्ही एम.आर.टी.पी. चा गुन्हा दाखल केला. तर त्या बिल्डींगमधील इललिगल बांधकामावर जी शास्ती लावली याच्या व्यतिरिक्त आपल्याकडे अशा काही बिल्डींग आहेत का की, ज्याच्यावर कुठलीच कार्यवाही झाली नाही. पण नागरीक शास्ती भरत आहेत.

**मा. आयुक्त :-**

असे कसे सांगणार. या गावात दोन लाख प्रॉपर्टीज आहेत.

**लक्ष्मण जंगम :-**

पण साहेब तुम्ही असे म्हणता की, फक्त सातच लोक......

**मा. आयुक्त :-**

तुम्ही नाव द्या. ते तपासणी करुन तुम्हाला सांगतो.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, मला सांगा. आपण ठराव केला. आपण शास्ती लावण्यासाठी सुरुवात केली पण नगररचनेच्या लोकांनी तिकडे जागेवर जाऊन खात्री करावी असे जे ठरावामध्ये म्हंटले आहे ते किती लोकांचे केले ते जरा विचारुन घ्या. कारण दहाव्या महिन्यामध्ये हा ठराव झाला आहे. त्याच्यानंतरच्या मधल्या काळामध्ये कुठेतरी जाऊन बघा, दि. ०१/०४/२००८ नंतर आणि आपण दि. १०/०४/२००८ ला ठराव केला आहे. मग त्या २००८ पासून आत्तापर्यंत किती बिल्डींगचे इललिगल बांधकाम झाले आहे? आत्ता हे कोणी तपासायचे, फक्त नगररचनेच्या लोकांनी ......

**मा. आयुक्त :-**

नगररचना आणि टॅक्समध्ये समजते.

**लक्ष्मण जंगम :-**

त्यांनी टॅक्सवाल्यांना सांगायचे आहे. नंतर त्यांची प्रक्रिया सुरु होते. जरा नगररचनेच्या लोकांना विचारा की, काही तरी ठिक आहे आपण धरुन चालू की, २५ टक्के काम पूर्ण झाले. ५० टक्के झाले की, १० टक्के झाले. काही तरी सांगु द्या. म्हणजे काय केले आणि नंतर सुरुवात झाली कारण त्यांनी सांगितल्याप्रमाणे सुरुवात व्हायला पाहिजे होती.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

या लक्षवेधीच्या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे आणि प्रमाणाच्या बाहेर चर्चा झालेली आहे. ज्यांची लक्षवेधी आहे, त्यांचा विषय झालेला आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

कमिशनर साहेब, आत्तापर्यंत नगररचनेकडून जर अशा पध्दतीचा सर्व्हे झाला नसेल, ज्या पध्दतीने सुरुवातीची कार्यवाही व्हायला पाहिजे ती झालेली नाही हे स्पष्ट दिसते. त्याच्यानंतर ठराव झाल्यानंतर जे व्हायला पाहिजे, ते ही झालेले नाही.

**मा. आयुक्त :-**

सर्व्हे पूर्ण केलेले आहेत. सर्व्हेप्रमाणे काय काय इललिगल आहेत ते ॲफीडेव्हीट हायकोर्टामध्ये केलेले आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

केले आहे तर सांगु द्या.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला यादी देतो.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

तुम्हांला प्रत मिळेल

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर महोदय, मला एकच सांगायचे आहे की, अशा अशा पध्दतीने सुरुवाती पासून हा सगळा कार्यक्रम झालेला आहे. सुरुवातीला ज्या लोकांवर कार्यवाही व्हायला पाहिजे, त्यांच्यावर झालेली नाही. आपण सदनिका खरेदी करणा-यांवर शास्ती लावली. मला या ठिकाणी तुम्हाला, कमिशनर साहेबांना आणि सर्व सन्मा. सभागृहाला विनंती करायची आहे की, जर आपण सरुवातीपासून हा विषय व्यवस्थितपणे हाताळलेला नसेल तर हा अखेरच्या टोकाला नेऊन जो चौथ्या क्रमांकाच्या खरेदी करणा-यांवर जी शास्ती लावली आहे, हा विषय या ठिकाणी थांबवा. त्याची सविस्तर व्यवस्थितरित्या कार्यवाही होऊन नंतर त्या शास्तीला सुरुवात करावी.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो, अनधिकृत बांधकामाचा प्रश्न हा फक्त मिरा भाईंदरमध्ये नाही. हा मुंबईमध्ये, ठाण्यामध्ये, कल्याण-डोंबिवलीमध्ये, उल्हासनगरमध्ये, भिवंडीमध्ये आहे. म्हणजे ज्या ज्या ठिकाणी महापालिका आहेत, त्या सर्व ठिकाणी हा प्रश्न आहे. हे कोणच्याही परवानगीने अनधिकृत बांधकाम करत नाहीत. परंतु, कोर्ट जे निर्णय देते, कोर्टाच्या विरोधात आपण बोलू शकत नाही. त्यामुळे कोर्टाचे पालन करणे हे निश्चितच शासकीय अधिका-याचे काम आहे, हे आपण समजू शकता. कोर्टाच्या आदेशामुळे बांधकामे वाढत चाललेली आहेत. परंतु, साहेब, आपल्याला एक काम करता येईल की, अनधिकृत बांधकामे करणारे जे इमारत विकासक आहेत, बिल्डर आहेत त्यांच्यावर तुम्हाला कठोर कारवाई करावी लागेल. आर्कीटेक्टवर करता येईल की नाही ही तांत्रिक बाब होऊ शकेल. कारण आर्कीटेक्ट नंतर आपला हात काढून घेतो.

**लक्ष्मण जंगम :-**

अधिका-यांवर होता येईल की, ती पण तांत्रिक बाब म्हणायची?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

हेच जर कारवाई करणार असतील तर त्याच्यामध्ये अधिकारी येतच नाही. इमारत विकासकावर तुम्ही कार्यवाही करा तरच हे थांबु शकेल.

(सभागृहात गोंधळ)

**मा. पिठासीन अधिकारी :-**

लक्षवेधींचा विषय इकडे संपलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही आता बोलतात की, त्या बिल्डरवर गुन्हा दाखल करा. पण आत्ता मी जे सांगितले.......

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, आशादिप बिल्डींगचे वरचे माळे इललिगल आहेत आणि खालच्या माळ्यावाल्यांना, त्यांना आणि यांना तुम्ही सारखा टॅक्स लावणार आहात का? पहिल्या माळ्याचा राहणारा रहिवाशी आहे, त्यांच्या तक्रारी आहेत. त्यांना तीन गुना टॅक्स लावलेला आहे. याच्यावर खुलासा झालेला नाही असे मला वाटते. ज्यांचे इललिगल आहे त्यांना आणि ज्यांचे नाही त्यांना, दोघांनाही लावला का? याचे मला उत्तर द्या.

प्रशांत पालांडे :-

साहेब, लक्षवेधीवर एवढी चर्चा झाली. शास्तीबद्दल तुम्ही प्रशासनाला निर्देश दिले नाहीत.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मग या वेळेमध्ये काय चालले होते. त्यांची लक्षवेधी शास्तीसंबंधी होती आणि विषय दुसरीकडेच गेला.

**प्रशांत पालांडे :-**

पण आपण प्रशासनाला निर्देश द्या. आम्ही एवढा वेळ चर्चा केली.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने त्याचे उत्तर द्यावे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्हाला वाटत नाही की, अनधिकृत बांधकाम वाढतात असे आपण बोलतो. त्यांना सर्वस्वी बिल्डर जबाबदार आहे. अधिकारी कोणी जबाबदार नाही. एकच अधिकारी किती वर्षे झाली त्या बांधकामावर आहे आणि त्यांची सबंध टिमच आहे. तुम्हाला समजत नाही, किती वर्षे एक माणूस राहू शकतो? एका पदावर, एका जागेवर किती वर्षे माणूस काम करु शकतो? तो सेटींग करु शकत नाही? तुम्ही दर महिन्याला बदली करा. बांधकामावर वचक बसला नाही तर तुम्ही जे बोलता ते हरेन. दोन महिन्यांनी अधिकारी बदली करा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

तुम्ही नक्की कोणाच्या बांधकामाबद्दल बोलता. सार्वजनिक बांधकामाबद्दल बोलता का? विषय शास्तीचा कर आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, शास्तीबद्दल निर्णय द्या.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपण शेवटला बोलले की, आर्कीटेक्ट याच्यामध्ये दोषी पकडता येईल की नाही. माझी सर्व सभागृहाला विनंती आहे, बोरीवलीला बाभळी नाक्यावर एक बिल्डींग कोसळली. एका ज्वेलरने खालचा कॉलम तोडला म्हणून ती बिल्डींग कोसळली. सगळ्यात पहिले आर्कीटेक्टवर कार्यवाही झाली. आपल्याकडे एफ.एस.आय. ची चोरी आडवी आणि उभी होते. म्हणजे या साईडलापण तुम्ही असा एफ.एस.आय. चोरला आणि हाईट. हाईटमध्ये समजा पाच माळ्याची परवानगी आहे आणि तीन माळे अनधिकृत बांधले तर तुम्ही म्हणता आर्कीटेक्ट विड्रॉल केला तर बरोबर आहे. पण आडव्या एफ.एस.आय. चे काय? कारण या साइडला जर तुम्ही वाढवत गेलात तर ती बिल्डींग पाडली. त्यामध्ये आर्कीटेक्ट दोषी नाही का? जर आर.सी.सी. कन्स्ट्रक्शन खराब असेल तर त्याच्यामध्ये आर्कीटेक्टला दोषी पकडले जाते आणि त्याच्यावर केस केली जाते. तुम्हाला बोरीवलीचे उदाहरण दिले. या कंडीशनमध्ये जसे आता सर्व सन्मा. सदस्यांचे शास्तीबद्दल तुम्ही बोलता त्यामध्ये सर्वसाधारण नागरीकांवर आपण भरपूर आसूड ओढतो, सगळे काही करतो. पण सगळ्यांवर कार्यवाही झाली तर आर्कीटेक्टकडूनसुध्दा आपल्याकडे चुकीची प्रकरणे येणार नाहीत. परत एकदा सांगतो, आडव्या एफ.एस.आय. ची चोरी आणि उभ्या एफ.एस.आय. ची चोरी, सर्रास ९० टक्के बिल्डींगमध्ये आपल्या टिल्टमध्ये दुकाने बांधून दिलेली आहेत. आता टिल्ट तुमच्या एफ.एस.आय.मध्ये कन्झम्पशन आहे का? त्यांनी इन्क्ल्यूड केले आहे का? ८० टक्के बिल्डींग तशा निघतील. मग तुम्ही कोणाकडे कारवाई कराल? कारण ग्राउंड फ्लोअरला त्यांनी टिल्ट दाखवले. नंतर दुकाने काढली, मंदिरे बांधली, त्याच्यात सगळे काही झाले. सोसायटी पार्कींग विकायला लागली. खाली तुम्ही जे पार्कींग सोडता, समजा ५० फ्लॅट आहेत आणि ५० कारची पार्किंग आहे. सोसायटी बेकायदेशीर दृष्टीकोनातून ठेवून त्या फ्लॅट ओनरला गाडीचे पार्किंग जे नियमानुसार असले पाहिजे ते विक्रित सुरू झालेली आहे. म्हणजे ऑफीशियली पंचवीस हजार, पन्नास हजार, दिड, दोन, अडीज लाखापर्यंत पार्किंग विकली जाते. याच्यामध्ये लोखंडी सळ्या लावून ग्रील लावून ते बंद केले जाते. मा. उच्च न्यायालयाचे असे निकाल आहेत की, पार्किंग विकू शकत नाही. याच्यावर आपण काहीतरी निकाल घ्यावा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आपण शास्तीबद्दल निर्णय द्या. ते त्याबद्दल बोलत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, सर्वांत महत्वाचे म्हणजे बारा-तेरा लाख लोकसंख्या आहे. त्यामधले कोर्टात कोण केव्हा जाणार आहे हे माहिती नसते. अगोदरच स्टे आलेले असतात. मग आमच्याकडे नोटीस आल्यानंतर रिप्लाय द्यायला जाणार. रिप्लाय दिल्यानंतर तारखांवर तारखा पडत जाऊन वर्ष जाते, तोपर्यंत बांधकाम होत. ते सगळ्यांना माहिती आहे आणि श्री. पाटील साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे आपण मागच्या मा. महासभेमध्ये स्वतंत्र्य कोर्टाला मंजुरी दिलेली आहे. महापालिकेचे पोलीस डिपार्टमेंट आणि प्रभाग समितीच्या बिट अधिका-यांची नियुक्ती केलेली आहे. त्यामध्ये सॅनिटरीचे मुकादम, सॅनिटरी इन्सपेक्टर, त्या वसुलीचा क्लार्क, जेइ आणि प्रभाग अधिकारी हे पाच जणांनी प्रत्येक एरियामध्ये फिरून यायचे. फिरून येऊन रजिस्टरला नोंद करायची. की, मला हे बेकायदेशीर बांधकाम आढळले. जे नोंद करणार नाही त्यांच्यावर जबाबदारी फिक्स होती. आपल्याला मागच्या वेळेला जीआर वाचून दाखवला होता. त्यानंतरच आम्हाला ठराव करून स्वतंत्र कोर्टाला आणि पोलीस डिपार्टमेंटला आपण मंजुरी दिलेली आहे. आणि कोर्टातून निर्णय झाल्यानंतर, निर्णय काय होता, कायद्याप्रमाणे ड्यु प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करून कारवाई करा. असे असल्यामुळे कोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुध्दा आपल्याला हेअरिंगसाठी सुनावणी घेऊन मग निर्णय द्यायला लागतो. निर्णय दिल्यानंतर पंधरा दिवस थांबायचे असते. थांबल्यानंतर मग कारवाई करायची आहे. तोपर्यंत दुसरा स्टे येतो. आत्ता मॅडमनी मला प्रश्न विचारला होता की, ५२५ चे काय झाले? ती केस कोर्टातून आमच्या बाजूने झाली. पण अपीलमध्ये अपीलचा निर्णय होईपर्यंत स्टे दिला. निर्णयाची कॉपी पाहिजे तर देतो. अपिलमध्ये त्यांनी स्टे घेतला, की, निर्णय होईपर्यंत या निर्णयाची अंमलबजावणी करू नये. तुम्हाला ती कागदपत्रे देतो. दुसरा सौ. चक्रे मॅडमचा आशादिप बिल्डींगचा मुद्दा होता. त्यामध्ये ग्राऊन्ड प्लस फोरची बिल्डींग आहे, परवानगी दिलेली आहे. ग्राऊन्ड प्लस सात झालेले आहेत. मार्जिनल डिस्टन्स मिळत नाही म्हणून गव्हर्नमेंटकडे रिलॅक्सेशन मागायला गेलेले आहेत. आणि ते रिसिव्हींग झोन आहे. त्यांनी प्लॅन गव्हर्नमेंटकडून मार्जिनल डिस्टन्सचे रिलॅक्सेशन मिळाल्यानंतर रिसिव्हींग झोनप्रमाणे आपल्याकडे प्लॅन टाकलेले आहेत. आणि हे निर्णय होईपर्यंत माझे बांधकाम तोडू नये म्हणून कोर्टातून स्टे घेतलेले आहेत. कारण गव्हर्नमेंटने रिलॅक्सेशन दिले तर माझे नियमात बसते. कारण त्यांनी एफएसआय खरेदी करून प्लॅन सबमिट केलेले आहेत. गव्हर्नमेंटने जर मार्जिनल डिस्टन्समध्ये अलाऊड केले तोपर्यंत आम्ही सगळ्या बिल्डींगला तिप्पट कर आकारणी केलेली आहे. मार्जिनल डिस्टन्ससाठी त्यांनी गव्हर्नमेंटकडे पाठवले आहे. आणि रिसिव्हींग झोन असल्यामुळे त्यांनी प्लॅन सबमिट केला

आहे. शासनाकडे मार्जिनल डिस्टन्समध्ये, म्हणजे समास अंतरामध्ये सवलत मिळाली तर माझी बिल्डिंग नियमात बसते. शासनाकडून निर्णय होईपर्यंत माझे बांधकाम तोडू नये असे म्हटलेले असले तरीसुध्दा या जीआर प्रमाणे आम्ही तिप्पट कर आकारणी केलेली आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब नसताना मी सांगितलेले की, माझ्या वॉर्डमध्ये एका बिल्डरने पूर्ण स्टील्ट कव्हर केले आहे. त्याचे काय झाले. मा. आयुक्तांनी माझ्या पत्रावर डायरेक्ट ऑर्डर केली आहे की, त्या बिल्डरवर गुन्हा दाखल करून ते काढा.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, मा. आयुक्त साहब ने दो का जवाब दिया। मेरा जवाब नही दिया। ५५०/१९९८, स्टे कब मिला था और कब तक उसपर स्टे ऐसे ही पेन्डींग पडा रहा?

**मा. आयुक्त :-**

आपको रिप्लाय दिया है।

**राजेंद्र जैन :-**

मै यह बता रहा हू की, उस केसपर स्टे उठने के बादभी देढ साल तक यहा पर कुछ भी नही हुआ। आपने बोला की, स्टे आने बाद क्या नही हुआ, बताईए।

**मा. आयुक्त :-**

२००६ ची केस आहे. कोर्टाने निर्णय दिला की, ड्यु प्रोसेस ऑफ लॉ करा.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहेब, इसमे आप यह पुछिए, यह १९९९ का केस है। मॅडम मै आपसे सिर्फ डेट पुछता हू की, ५५०/१९९८ यह केस मे स्टे कब हटा?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. मी यामध्ये तुम्हाला लिखीत माहिती दिलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही वर-वर बोलून चालत नाही. पुडी बांधायचा संबंध नाही. तुम्ही पुडी बांधत असणार. मी बांधत नाही. मी सत्य असेल तेच बोलणार. महापालिकेने जर समास अंतरामध्ये सवलत मागण्यासाठी पाठवले असेल तर मी कसे बोलणार....

**मिलन पाटील :-**

पण ते महापालिकेच्या किंवा शासनाच्या खिशातले जाणार आहेत का?

**मा. आयुक्त :-**

ते पाठवणारे अधिकारी श्री. घेवारे साहेबांना विचारा. तुम्ही मला कशाला विचारता.

**मिलन पाटील :-**

रिफ्युज करून पाठवले पाहिजे की नाही? शासन तीन माळे अधिकृत करून देईल?

**मा. आयुक्त :-**

त्यावेळेला तुम्ही श्री. घेवारे साहेबांना विचारायला पाहिजे होते. मी आत्ता पाठवलेले चुकीचे आहे म्हणून परत मागवू? गव्हर्नमेंटला सवलत देण्याचा अधिकार आहे.

**मिलन पाटील :-**

किती ?

**मा. आयुक्त :-**

ते तुम्ही त्यांना विचारा. तुम्ही सवलत आणली ना? गव्हर्नमेंटला काय अधिकार आहेत हे तुम्हाला जादा माहिती आहे. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेले गार्डन पलिकडे टाकले. गव्हर्नमेंटकडे जाऊनच आणले ना? गव्हर्नमेंटला काय अधिकार आहेत ते मी सांगू शकत नाही.

**मिलन पाटील :-**

कायद्यात बसेल तेवढेच देणार आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मी तुमच्याकडे एकदा पत्रदेखील आणलेले की, माझ्या वॉर्डमध्ये एका बिल्डरने खालच्या स्टील्ट गाड्या पार्किंगची जागा पूर्ण कव्हर केली आहे. रूम बांधून भाड्याने दिले आहेत. ते तोडण्याकरिता मी तुम्हाला पत्र दिले होते. तुम्ही त्याच्यावर ऑर्डर केली की, ते बांधकाम ताबडतोब काढून त्या बिल्डरवर गुन्हा दाखल करा. पण अद्यापपर्यंत ते काढलेले नाही.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्याच्यावर तुम्ही ताबडतोब निर्णय घ्या आणि पुढचा विषय चालू करा.

**नगरसचिव :-**

सौ. प्रभात पाटील, श्री. स्टिवन मेन्डोंसा, सौ. अनिता पाटील, श्री. याकुब कुरेशी, श्री. धनेश पाटील, श्री. संजय पांगे, श्री. नरेंद्र मेहता यांचे रजेचे अर्ज आहेत. मागील सभेचे इतिवृत्तांत प्रकरण क्र. ४२, दि. ११/१२/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

शासनाने जो निर्णय दिलेला आहे त्याच्या विरोधात ठराव होऊ शकणार नाही. तुम्हाला जर त्याच्या विरोधात जायचे असेल तर तुम्हाला शासनाकडेच जावे लागेल. आपल्याकडे तीन आमदार आहेत. मा. महासभेत त्याच्या विरोधात ठराव होऊ शकत नाही.

**अनंत पाटील :-**

आमच्या व्यथा तुम्ही शासनाला कळवा.

**प्रकाश दुबोले :-**

मा. पिठासीन अधिकारी साहेब, इतिवृत्तांत चौदा महिन्या नंतर आले आहे. याला कारण काय?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

तुमच्या मताशी मी सहमत आहे. त्यावेळी जे नगरसेवक होते ते आत्ता नाहीत.

**प्रकाश दुबोले :-**

पण चौदा महिने लेट का झाले ते मी विचारतो.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मागच्या वेळेस दोन-दोन प्रोसीडींग दिलेले आहेत.

**नगरसचिव :-**

दोन-दोन मिटींग झालेल्या. त्याच्यामुळे दोन दिले तर १५०-२०० पाने होतील. चालेल. तर मी देतो.

**प्रकाश दुबोले :-**

पण चौदा महिन्यांनी

**नगरसचिव :-**

फक्त पाच बाकी आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

याला लेट का झाला?

**मा. आयुक्त :-**

शासनाने तिप्पट कर आकारणी केलेली आहे. त्याच्याविरूध्द ठराव करूनपण काही उपयोग होणार नाही. तुम्हाला सवलत पाहिजे असेल तर गव्हर्नमेंटकडून मागा. शासनाच्या कायद्याच्या विरूध्द तुम्ही ठराव करून त्याचा उपयोग होणार नाही. अंमलबजावणी होऊ शकत नाही. सगळ्यांना समान न्याय आहे. एका ठिकाणी इथे राहतात म्हणून त्यांना कराची सवलत आणि इकडे राहतात म्हणून कराची सवलत असे होणार नाही. हे नियम सगळीकडे सारखे लागणार.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही म्हणता जावे लागेल. पण शासनाचे जीआर आहे ते सगळे आपण तशी पध्दतीने आलो आहे? साहेब, म्हणतात की, शासनाच्या जी.आर. प्रमाणे शासनाचे दुसरेपण जीआर आलेले आहे. त्याचे आपण किती पालन केलेले आहे?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

तुम्ही सत्ताधारी पक्षाचे आहात. आपले मा. मुख्यमंत्री आहेत. तुम्ही काढायचा प्रयत्न करा.

**भगवती शर्मा :-**

दि. ११/१२/२००८ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अनिल सावंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्याच्यावर ठराव होत नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही त्याच्यावर रूलिंग द्या.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

सन्मा. सभागृहाने शासनाकडे शास्तीचा कर या विषयावर प्रयत्न करावा आणि शासनाचा जीआर बदलून घ्यावा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, याच्यावर एवढी चर्चा झाली, सगळे झाले. शास्ती लागते. आत्ता जी अनधिकृत बांधकामे चालू होतील, त्याच्यावर आपले बोर्ड लागतील की नाही? याच्यावर काही आहे की नाही?

**मा. पिठासीन अधिकारी ;-**

मगाशी मी या विषयावर बोललो.

**शरद पाटील :-**

तुम्ही बोलतात पण त्याच्यावर निर्णय काय? तिकडे बोर्ड लागायला पाहिजे, काय लागायला पाहिजे, नाही पाहिजे, काही आहे की, नाही? बोर्ड काढून नेला म्हणजे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्यांना मगाशी हेच सांगितले की, त्या बिल्डरवर कारवाई करा. बिल्डरला ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

**शरद पाटील :-**

आम्हाला याची खात्री द्या की, तिथे बोर्ड लागतील की नाही?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

साहेबांनी सांगितले की, ते कोर्टामध्ये गेल्यावर त्यांना स्टे मिळतो.

**शरद पाटील :-**

त्याच्यानंतर नागरिक येणार नाहीत. आपण सांगितले की, माहितीच्या अधिकारात विचारा. तर माहितीच्या अधिकारात कोण विचारायला येणार नाहीत.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ज्या-ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे चालू आहेत तिकडे बोर्ड लावा. पण तो बोर्डसुध्दा फेकला तर कोण बघणार? सांभाळणार कोण?

**शरद पाटील :-**

त्याच्यावर लक्ष ठेवावे लागेल. आपले अधिकारी ठेवलेले आहेत. गाड्या कशाला दिल्या आहेत? मा. आयुक्त साहेबांसारखे मला पण बोलावे लागेल. मा. आयुक्त साहेब सांगतात घरी चोरी होते तर आपल्याला घरी माणूस ठेवावा लागेल. आपले अधिकारी फिरत असतात.

**लक्ष्मण जंगम :-**

असे तरी म्हणा की, शास्ती सोडून बाकीचा कर भरू द्या.

**मा. आयुक्त :-**

रात्री दोन वाजता बोर्ड आहे की नाही ते बघायला पाठवू?

**शरद पाटील :-**

बघायला पाठवू म्हणजे कोणी काढला त्याच्यावर कारवाई करावी लागेल.

**मा. आयुक्त :-**

तो बोर्ड बघत बसायला रखवालदार नेमू का?

**शरद पाटील :-**

रखवलदार नसला तरी आपले अधिकारी ......

**मा. आयुक्त :-**

बोर्ड रात्री दोन-तीन वाजता काढून टाकतात. ते कोणी टाकले हे आपल्याला समजणार कसे? पोलिसांकडे गुन्हा दाखल केला, बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्यांनीच काढून टाकला. त्यांनी ते ग्राह्य धरून त्याच्यावर पोलिस स्टेशनने गुन्हा दाखल करायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

साहेब, बरोबर आहे. मग तो बोर्ड काढून उडवला. आणि नागरिकांनी त्याच्यात बुकिंग केली. तर त्या नागरिकांना शास्ती लागते. याच्यात त्यांचा दोष काय आहे?

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही कमीत कमी असे तरी रूलिंग द्या की, जे इललिगल आहे, त्या बांधकामाला शास्ती लावू नका. त्याच्यावर दोन माळ्याचे झाले, दोन दुकाने झाली किंवा दोन प्लॅट झाले ते वगळून बाकीच्यांना तरी रेग्युलर ठेवा. तुम्ही पूर्ण बिल्डींगला शास्ती लावली मग कसे काय? काहीतरी निर्णय घ्यावा लागेल. महाराष्ट्र शासनाच्या जीआर मध्येही तसे आहे. आहे की नाही ?

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. पिठासीन अधिकारी, बराच वेळ झाला आपण या प्रश्नावर आहोत. खरे म्हणजे जीआर चा हा जो शास्ती लावण्याचा संदर्भ या ठिकाणी घेतलेला आहे. याच सभागृहाचा तो ठराव होता. त्यावेळी तत्कालीन मा. आयुक्त श्री. राजीव जाधव होते. त्यांनी त्याचा अर्थ कसा काढला की, आजच्या तारखेला या शहरात जेवढी अनधिकृत बांधकामे आहेत. त्या सगळ्या अनधिकृत बांदकामांना आम्ही शास्ती लावणार. मग त्याच्यात आम्ही त्यांना असे विचारले की, साहेब, जीआर मध्ये असा उल्लेख नाही की, हा जीआर पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात

आणावा जेव्हा आज जीआर आला तेव्हा शासनाचे धोरण स्पष्ट आहे की, आजपासून तो अंमलात आणावा. मग जर त्यांना मागच्या पूर्वलक्षी प्रभावाने जर अंमलात आणायचा असता, म्हणजे पूर्वी जी अनधिकृत बांधकामे झाली आहेत, त्याला आपण रेग्युलर टॅक्स लावतो. फक्त टॅक्सच्या रसिटवर आपण लिहितो की, अनधिकृत बांधकाम आहे. हे अधिकृत होत नाही. पण त्यांना तुम्ही आत्ता शास्ती कशी लावणार? त्याच्यावर बराचसा वाद झाला. त्याच्यानंतर त्यांनी ते कबुल केले. की, हे जीआर आल्यानंतर त्या तारखेपासून शास्ती लावावी. आत्ता शास्ती नेमकी कशावर लावावी? आत्ता एक पाच माळ्याची बिल्डींग आहे. त्याच्यामध्ये तीन माळ्याची परवानगी दिलेली आहे. दोन माळे इललिगल बांधले तर दोन माळ्यावर शास्ती लावावी. कारण कोणत्याही भागावर असे म्हटले आहे. कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे म्हणजे पार्ट अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुर्नबांधकाम करील अशा अवैघ बांधकामाच्या बाबतीत त्यांच्याविरुध्द खटला दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, म्हणजे याच्यावर तुम्ही एम.आर.टी.पी. खाली गुन्हा दाखल करणारच. पण त्याच्या व्यतिरिक्त तुम्ही काय करणार, तर कारवाईस बाधा न आणता ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी अशा इमारतींवर बसवण्या योग्य असणाऱ्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल. म्हणजे जो इललिगल पार्ट आहे त्याच्यावर शास्ती लावावी. सगळ्या पार्टवर लावू नये.

**जुबेर इनामदार :-**

लक्षवेधीची तीच स्पष्ट मागणी आहे.

**मा. आयुक्त :-**

श्री. पाटील साहेबांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु ते प्लींथमध्ये जर बदल झाला असेल तर ते टोटल इललिगल होणार.

**प्रफुल्ल पाटील :-**

आमचे म्हणणे काय आहे की, तुम्ही प्लींथ सर्टीफिकेट देता. याच्यावर आत्ता उपायच करु या की, प्लींथ सर्टीफिकेट देईपर्यंत बिल्डर प्लानप्रमाणे प्लींथ बांधतो. तुम्ही एकदा प्लींथ सर्टीफिकेट दिल्यानंतर पुन्हा एकदा चेकींगला कधी जात नाही. म्हणजे आपल्याकडे ती पध्दतच नाही. तो ती प्लींथ तोडून तिथे अॅडीशनल प्लींथ घालतो. अशामुळे सगळी इमारतच बेकायदेशीर होते. पण माझे असे म्हणणे आहे की आपण टाऊन प्लानींगला असे आदेश द्या की, प्रत्येक स्लॅब भराल त्यावेळी आमच्याकडून सर्टीफिकेट घ्या. म्हणजे तुम्हांला तेव्हाच लक्षात येईल की, टोटल बिल्डींग इललीगल बांधत चालला आहे. कारण कोर्टामध्ये दाखवायला त्यांच्याकडे पेपर आहेत की, तुमचे पूर्वीचे प्लान त्यांनी प्लींथप्रमाणे पास करुन घेतले आहेत. हे सगळे प्लान सगळीकडे दाखवले जातात. तुम्ही जसे म्हंटले की, तुम्हाला जे रजिस्ट्रेशन ऑफीसर आहेत, रजिस्ट्रेशन ऑफीसरची काही गरज नाही. तुम्ही कुठलाही डॉक्युमेंट घेऊन जा. कसलेही डॉक्युमेंट घ्या. त्यांना फक्त रजिस्ट्रेशन करायचे आहे. प्रॉपर्टीचे रजिस्ट्रेशन याचा मतलब असा आहे की, ज्या प्रॉपर्टीचे रजिस्ट्रेशन रजिस्ट्रेशन केली आहे ती भले इललीगल असो लिगल असो, वादांकित असो किंवा त्यांची स्वतःची नसो या दोघांमध्ये हा करार झालेला आहे. तो आम्ही या ठिकाणी नोंदणी केली. त्याच्याव्यतिरिक्त त्याला वेटेज नाही. प्रॉपर्टी रजिस्टर झाली याचा अर्थ ती लीगल झाली असा होत नाही. त्याचवर तो इललीगल बांधकाम करु शकतो असा होत नाही. पण किंबहूना माझे असे म्हणणे आहे की जर तुम्ही फ्लोअरवाईज सर्टीफिकेट घ्यायला त्यांच्यावर सक्ती केली तर तुम्हाला तेव्हाच कळेल की, प्लींथनंतर यांनी इललीगल बांधकाम केलेले आहे आणि अशावेळी जर प्लींथ बदलून टोटल बांधकाम केले तर टोटल बांधकाम इललीगल होते. एखादी इमारत किंवा एखाद्या इमारतीचा भाग, इमारतीचा भाग म्हंटल्यानंतर या ठिकाणी प्लींथ आली. प्लींथ तुमच्या प्लानप्रमाणे नाही. टोटल प्लींथ चुकीची आहे, म्हणजे मग ती इललीगल झाली. जर तुम्ही लीगल आणि इललीगल असे व्हर्टीकल ठिक आहे. व्हर्टीकल तुम्ही म्हणू शकता की, तीन माळे लिगल आहेत, वरचे दोन माळे इललीगल आहेत. पण हॉरीझोन्टल कसे म्हणणार. मग असे होईल की, एखादा ५०० स्क्वेअर फुटाचा फ्लॅट आणि १९५ ला तुम्ही इललीगल कर लावू शकत नाही. मग ती बिल्डींग जर हॉरीझोन्टली इललीगल झाली तर ती समांतर म्हणजे टोटल इललीगल होईल. या ठिकाणी असा कुठला वादाचा मुद्दा राहात नाही. आणि गावठणामध्ये आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, मला तिथल्या लोकांना पण सांगायचे आहे की, एक तर आपण तुमच्या लोकांना सांगा की, आता सिटी सर्व्हे चालु आहे. पण तिथले काही लोक दिशाभूल करतात. सिटी सर्व्हे करुन तुमच्या जमिनीची कागदपत्र तयार करुन घ्या. याच्यापुढे तुम्हाला कुठलीही परवानगी घेताना तुमचे कुठलेही कागदपत्र नसल्यामुळे तुम्हाला परवानगी घेताना तुम्हाला परवानगी मिळत नाही. घर दुरुस्ती करायचे म्हंटले तरी करु शकत नाही. घर नवीन बांधायचे झाले तरी करु शकत नाही. एकदा तुमच्याकडे प्रॉपर्टी कार्ड आले तर त्या प्रॉपर्टी कार्डवर तुम्ही महानगरपालिकेकडे परवानगी मागु शकता. मग हा शास्तीचा विषयच या ठिकाणी येत नाही आणि आम्ही सुचना माडली ती सुचना तुम्ही पाठवा. जर गावठण क्षेत्रामध्ये आपल्याला कुठल्याही प्रकारची सवलत देता आली तर आत्ता आम्ही इंडीप्रिएन्सीट करु शकत नाही की, बाहेरुन आलेल्यांना शास्ती लावा. गावकऱ्यांना शास्ती लावू नये पण गावठणामध्ये एक प्रॉब्लेम असा आहे की, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आपण अडीचचा एफ.एस.आय. प्रोजेक्शन केले होते. ते झालेले नाही. खरे म्हणजे ते

पहिले व्हायला पाहिजे. म्हणजे आपले प्रेझेन्टेशन कुठे तरी विकास नियंत्रण नियमावलीचे फायनल हेअरिंग जेव्हा लागली होती, त्यावेळी आपण कुठेतरी ते प्रेझेंट केले नाही आणि गावठणात तुम्ही अडीच एफ.एस.आय. दिल्याशिवाय लोक घरे बांधू शकत नाहीत. आत्ता एवढया मोठ्या फॅमिली झाल्या. म्हणून तशा पध्दतीने आपण पुन्हा एकदा मांडावे. आता आपण विषय आणलेला आहे की, पुढे तीन एफ.एस.आय. द्यावे. त्याच्यात बऱ्याचशा गोष्टी आहेत. शेवटी लोकांना सुविधा मिळाल्या तर पालिका चांगली चालेल. म्हणजे नगरसेवक हे प्रतिनिधी आहेत, तेवढ्यापुरते ते मर्यादित झाले. पण प्रशासन हे कायमस्वरुपी या जनतेचे काही देणे आहे की नाही? जेव्हा लोकांना आपण चांगले रिझल्ट देऊ तेव्हा लोक आपल्याला टॅक्स भरतील, शास्तीपण भरतील. जास्तीचे टॅक्स तुम्ही वाढवून लावलेले आहेत ते पण भरतील पण तशा पध्दतीने आपल्याकडे सवलती मिळत नाहीत. म्हणून अशा या ज्या तुमच्या वाढीव एफ.एस.आय. च्या सवलती आहेत. ही प्रकरणे आपण या ज्या तुमच्या हेअरिंग झाली कारण सभागृहाने जेव्हा विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अडीच एफ.एस.आय. देण्याचा ठराव केला होता. अंतिम मंजूर झाले नाही ही दुःखाची बाब वाटते.

**मिलन पाटील :-**

त्याच बाबतीमध्ये आत्ता जी जुनी घरे आहेत, त्यांना सरकारने आत्ता नवीन आदेश काढून नियमावलीमध्ये थोडा बदल केलेला आहे. आपल्याल दिड मीटरची परमिशन दिलेली आहे. तुम्ही दिड मीटर सोडू शकता. साहेब, बरोबर आहे ना?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

हा विषय खुप झाला. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४२ :-**

दि. ११/१२/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४३ :-**

दि. ११/१२/२००८ रोजीचे मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. अनिल सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा दि. ०२/१२/२००९ रोजी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर संयुक्त लोकशाही आघाडीच्या सदस्या सौ. सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णु यांची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली असे मी जाहिर करतो.

**निर्मला सावळे :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलते. संयुक्त लोकशाही आघाडी, तसेच सर्व महानगरपालिकेचे सन्मा. सदस्य, मा. आयुक्त महोदय यांचे सर्वांचे मी आभार मानते. धन्यवाद.

**प्रकरण क्र. ४३ :-**

सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे.

**ठराव क्र. ४४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा दि. ०२/१२/२००९ रोजी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या स्थायी समिती सदस्य पदावर संयुक्त लोकशाही आघाडीच्या सदस्या सौ. सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू यांची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करण्यात येत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

मध्यप्रश्न – निरंक, स्थायी समिती – निरंक, मा. आयुक्तांकडील पत्रे व कामकाज. प्रकरण क्र. ४४, परिवहन समितीवर नगरसेवक किंवा बाहेरुन सदस्य घेणेबाबत धोरण ठरविणे बाबत विचार विनिमय करणे.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवरील निम्मे ६ (सहा) सदस्य माहे फेब्रुवारी २००९ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झाले आहेत. निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी प्रशासनाने नेमकी कोणती पध्दत अवलंबवावी याबाबत नगरविकास विभागाकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते. क्र. मिभामनपा/११०९/२५९/नवि-२८ नगरविकास विभाग दि. २० जानेवारी २०१० नुसार मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ५१७५/२००७ प्रकरणी दि. २५/०७/२००७ रोजी दिलेला निर्णय व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५ मधील तरतुदीकडे लक्ष वेधले आहे.

परिवहन समितीवर पालिका सदस्य म्हणून निवडून आलेल्या सदस्यांमधून काही सदस्य नियुक्त / नेमणूक करावयाचे असतील तरच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) मधील तरतुदी लागु होतील. तथापी महानगरपालिकेने रिक्त पदांकरीता नियुक्तीसाठी पालिका सदस्य म्हणून बाहेरुन सदस्यांची नियुक्ती करावयाचे ठरविल्यास कलम ३१(अ) च्या तरतुदी लागु होणार नाहीत. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन समितीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५(२) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्यिक, वित्तीय किंवा कामगार विषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य नसतील अशा व्यक्तिंमधून परिवहन समितीवर सदस्य नेमणूक करण्यात यावी. सदरची नेमणूक ही गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात यावी. सदरचा ठराव फक्त ह्या वर्षीच्या परिवहन सदस्य नेमणूकीसाठी लागु राहिल व ठरावानुसार परिवहन सदस्य निवडणूकीचा कार्यक्रम तातडीने घ्यावा असा ठराव मांडीत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

या ठरावाल माझे अनुमोदन आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ठराव मंजूर.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमच्या अजेंडामध्ये मा. स्थायी समितीचे विषय निरंक लिहले आहेत. इथे मा. स्थायी समितीचे जागरुक सदस्य आहेत, अभ्यासु आहेत, अनुभवी आहेत, सिनीअर आहेत. मला त्यांना विचारायचे आहे की, तुमचे प्रश्न इथे निरंक असे असताना तुम्ही एकदम निरंक कसे बसले आहेत? तुम्हाला या शहराची मा. स्थायी समिति ही केंद्रस्थानी असलेली समिती, ज्या समितीकडे संपूर्ण शहराच्या विकासाची कामे आहेत त्यांना काही पडलेले नाही. फक्त सीट मिळाली, पद मिळाले म्हणून गप्प बसून रहायचे. मग तुम्ही केलेल्या कारवाईचा किंवा ठरावाचा ह्या ठिकाणी अजेंड्यामध्ये उल्लेख नसल्यामुळे तुम्ही काय केले असा मला प्रश्न विचारायचा आहे. मा. पिठासीन अधिकारी तुम्ही यांना प्रश्न विचारा. नाहीतर तुम्ही मा. स्थायी समितीमधून राजीनामा द्या. या शहरामध्ये चांगले काम करणारे बाकीचे लोक आहेत.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

श्री. प्रफुल्ल पाटील यांचा विषय चांगला आहे. मा. आयुक्त साहेब, एक निवेदन करत आहेत. मा. स्थायी समितीमध्ये टॅक्सेस वाढविण्यासंबंधी विषय आला होता. तो विषय आता विषयपत्रिकेवर नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला ठरावाबद्दल बोलायचे आहे. ठराव झालेला आहे. आम्हाला माहिती पाहिजे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्या ठरावावर नंतर चर्चा करु.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी या ठिकाणी चांगला विषय मांडलेला आहे. यापूर्वी सुध्दा या सभागृहामध्ये विचार विनिमय झाला की, मा. स्थायी समितीचे कोणते ठराव जनरल बॉडीच्या अजेंड्यावर आणावेत.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

तुम्हाला आता काय माहिती पाहिजे ते बोला.

**अनिल सावंत :-**

तुम्ही आता काय देता? अजेंड्यावर माहिती का आली नाही?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

श्री. अनिल सावंत, सचिव साहेब काय माहिती देतात ते तुम्ही बघा.

**अनिल सावंत :-**

मला एक सांगा, मा. स्थायी समितीचे कोणते ठराव असे तुमच्या उपविधीमध्ये......

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्या विषयावर आपण नंतर बोलू. ते का निरंक आहे हे आत्ता ते सांगतील.

**नगरसचिव :-**

मा. स्थायी समितीच्या २ तारखेच्या अजेंड्यावर जे विषय होते ते मा. स्थायी समितीने शिफारस केले होते. संपूर्ण शिफारशीवर केलेला अजेंडा मा. महापौरांना मी २ तारखेला सादर केला होता. त्यातील संपूर्ण विषय रद्द करुन आजच्या सभेत जेवढे आहेत तेवढेच विषय घेण्यासाठी त्यांनी मान्यता दिलेली आहे. माझ्याकडे अजेंड्यांची पोच आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

शिफारस काय केलेली आहे? करवाढ करावी अशी शिफारस केली आहे?

**नगरसचिव :-**

मा. महासभेत विषय घेण्यासंबंधी मी पत्र दिले होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. स्थायी समितीने निर्णय घेतला की नाही?करवाढीचे पहिले निर्णय, बजेटचा पहिला निर्णय मा. स्थायी समितीचा असतो. करवाढीचे प्रस्ताव मा. स्थायी समितीने मंजूर करुन पुढे मा. महासभेपुढे पाठवायचे. मग मा. स्थायी समितीचा निर्णय काय आहे?

**नगरसचिव :-**

मा. स्थायी समितीने करवाढीचे विषय जसे होते तसे शिफारस केले आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे विषयावर करवाढ सुचवलेली नाही का?

**नगरसचिव :-**

त्याच्यावर चर्चा केली नाही.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मा. महासभेमध्ये त्या विषयावर चर्चा व्हावी म्हणून ते तसेच्या तसे विषय मा. महासभेपुढे पाठवावे असे मा. महापौरांना सांगितले.

**मिलन पाटील :-**

म्हणजे फक्त टेंडरचे विषय त्यांनी पास करायचे?

**भगवती शर्मा :-**

मा. पिठासीन अधिकारी महोदय, श्री. प्रफुल्ल पाटील साहबने जो प्रश्न उपस्थित किया की, जो ठराव हुआ है उसे मा. महासभा मे लाना चाहिए की, नही लाना चाहिए? लेकीन श्री. पाटील साहब, सचिव महोदयने वो प्रस्ताव यहा पर लाने के लिए मा. महापौर साहब के पास निवेदन दिया था। लेकीन उन्होने उसे रिजेक्ट किया है।

**मा. पिठासीन अधिकारी :-**

जो धोरणात्मक निर्णय आहे तो मा. महासभेतच होतो. मा. स्थायी समितीमध्ये नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी आत्ता विषय मांडला तो स्टॅन्डींग कमिटीचे विषय इकडे निरंक दाखवलेले आहेत. स्टॅन्डींग कमिटीच्या सर्व सदस्यांनी आता जो उल्लेख केला, हुषार आहेत, होत नसेल तर पद सोडावे. मी या गोष्टीचा त्यांचा निषेध करतो. ते हुशार असतील, मी मान्य करतो. परंतु, स्टँडींगमध्ये बसलेले जे सोळा सदस्य आहेत हे हुशार नाहीत असे म्हणायचा त्यांना कुठला अधिकार नाही.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

अशा तऱ्हेने बोलू नका. त्यांची शंका त्यांनी विचारली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर महोदय, मा. स्थायी समितीने जो ठराव केला आहे, त्याचे तुम्ही वाचन करा.

**नगरसचिव :-**

मी ठरावाचे वाचन करतो. ठराव क्र. ९८, मालमत्ता कराची आकारणीसाठी कर योग्य मुल्य ठरविण्यासाठी भाडे मुल्याचे वाजवी दर ठरविण्याचा विषय पुढील कर आकरणीशी निगडीत असल्यामुळे सदर विषय महासभेपुढे ठेवण्यात यावा. तसेच प्रकरण क्र. ११९ ते १२२, १२४, १२५ व १२९ ते १३१ हे प्रस्ताव करवाढीचे असल्याने हे सर्व प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात यावेत.त्याला सुचक आहेत श्री. अनिल सावंत.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौरांनी का घेतलेला नाही.

**नगरसचिव :-**

मी सादर केले.

**भगवती शर्मा :-**

त्यांनी काय रिझन दिलेले आहे.

**नगरसचिव :-**

त्यांनी कट मारलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

माझे या ठिकाणी म्हणणे आहे की, मा. महापौरांना त्यांचे काय आहे, पुढचे पुढे ते त्यांचे त्यांनी नियोजित केलेले आहे. त्यांना आजची शेवटची मिटींग होती. ते आजच्या सभेला आले नाहीत.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

खरे म्हणजे आज त्यांनी यायला पाहिजे. त्यांच्या कार्यकालातील ही त्यांची शेवटची सभा आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. पिठासिन अधिकारी साहेब, माझे एकच म्हणणे आहे की, मा. स्थायी समिती ही केंद्रीय समिती आहे. असे मी बोललो. कोण किती अक्कलवान आहे आणि कोण किती अक्कलवान नाही, हे मी बोललो नाही. जर तुमच्याने होत नाही तर तुम्ही पदावर कशाला बसता. हे मी स्पष्ट आतापण बोलतो. तुम्हाला जेव्हा माहिती होते की, उत्तनचा प्रकल्प बंद आहे. मा. स्थायी समितीच्या सभागृहामध्ये मिटींग झाली. आपले १४५ आणि १४६ चे दोन्ही आमदार होते, मा. खासदार होते. आणि लॅन्डफिल साईटचे असे कुठचेपण टेंडर काढणार नाही. ते लॅन्डफिल साईटचे टेंडर तुम्हाला काढता आले. जो प्रोजेक्ट बंद पडला आहे. तो सुरू झाला नाही. लॅन्डफिल साईटचे टेंडर काढायचे तुम्हाला बरोबर सुचले. आणि हे कराचे दरवाढीचा जो प्रकार आहे, हा कशासाठी आहे? JNNURM खालच्या ज्या योजना तुम्हाला अंमलात आणायच्या आहेत, त्याच्यासाठी जर तुम्ही विहित वेळेमध्ये हे प्रस्ताव आणले नाही, तर १४ फेब्रुवारीनंतर एक वर्षभर हा विषय येणार आहे का? मग तुम्ही का दुसऱ्यांचे मार्गदर्शन घेतले नाही. १४ फेब्रुवारी नंतर जर तुम्ही विषय आणला तर पुढच्या वर्षी जाईल. मग वर्षभर काय करणार? हजामपट्टी करणार का? तेव्हा लोकांची कामे करणार का? मग तुमच्या पक्षाच्या लोकांना आणि इतर पक्षाच्या लोकांना तुम्ही काय उत्तर देणार? या सभागृहात काय उत्तर देणार? तुमच्याकडे नगरसेवक निधी वापरायला तरी पैसा राहणार आहे का? हे सगळे माहिती असतानासुद्धा तुम्ही असे म्हणता की, आम्ही फक्त मा. महापौरांकडे शिफारस केली आणि मा. महापौरांनी अजेंड्यावर आणले नाही तर नियम १(ह) प्रमाणे तुम्हाला सभागृहापुढे प्रस्ताव आणता येत नव्हता? सचिवांनी सांगावे की, त्यांना तुम्ही ३ दिवस अगोदर क्लिअर प्रस्ताव दिला असता की, करवाढीचे प्रस्ताव आणावेत. आम्ही स्टँडींगचे चार सदस्य तुमच्याकडे प्रस्ताव सादर करतो. त्यांनी पुरक घोषणा काढली असती आणि तो विषय ऑफिशियली आला असता. तुम्ही जर एवढे जागरूक आहात. मग तुम्ही हे का केले नाहीत? आणि असे म्हणता की, मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधायची? कोणीतरी बांधावीच लागते. जर सत्तेत आहोत, तर आपणच बांधली पाहिजे. तो आपलाच अधिकार आहे. वाईटपण येणारच आहे. पण जे चांगलेपण येणार आहे त्याचे श्रेय तुम्ही घेणार नाही तर काय तुम्ही दुसऱ्याला देणार आहात? जर तुमच्या JNNURM च्या स्कीम सगळ्या कॅन्सल झाल्या तर टाळ्या वाजवत बसाल. दहा वर्षे या शहराचा विकास तुमच्याकडून होणार नाही. शंभर कोटी, सव्वाशे कोटी रूपयांचे फक्त बजेट नाही. सगळे कर आणि कर्ज याच्या व्यतिरिक्त तुमच्याकडे काय आहे? आणि हे असे प्रस्ताव तुम्ही आणून ठेवता. तेही आजच्या मा. महासभेत स्टँडींगचा कोणी सदस्य बोलत नाही. इकडून प्रॉम्प्टींग करत सांगतात की, श्री. दिनेश नलावडे तुम्ही बोला. हे पण तुम्हाला सांगावे लागते, याचे मला हसायला येते. की, एवढे जर बेजबाबदार तुम्ही या शहरात वागत असाल तर फक्त टेंडर श्री. मिलन पाटील अवास्तव बोलले. पण ते जरा बोलले. ठिक आहे, टेंडरचे करावे, न करावे या विषयाशी आमचे काही मतभेद नाही. जरूर करा. पण हे जे विषय आहेत ते तुम्ही जर वेळेत आणले नाहीत, तर ते वेळेत होणार नाहीत.सगळ्याच बाजूने, आत्ता ऑक्ट्रॉय बंद होणार आहे. तुम्ही त्यांचे टॅक्स ऑन इन्ट्री ऑफ गुड्स, त्याचेही आपण फयनल करीत नाही आहोत. मा. आयुक्त साहेब, तुम्ही या शहरामध्ये सांगता की, इललिगल बोर्ड लावा. माझे तर असे म्हणणे आहे की, तुम्ही बोर्ड असे लावा, ७ पैसे लिटर पाणी महानगरपालिका देते, आणि आम्ही हे १२ रू. लिटरचे पाणी पितो. ७ पैसे लिटरने पाणी पीतो त्या ठीकाणी जर पाणीपट्टीची वाढ केली तर कोण विरोध करणार आहे? आज ८० टक्के लोक बिसलेरी पाणी पितात. त्यांना १२ रूपये परवडते. आणि मग

असे जर टॅक्सवाढीचे प्रस्ताव आणले तर कोणाला बदनामी होणार आहे? यांना का लाज वाटते की, आम्ही प्रस्ताव आणले तर आम्ही बदनाम होउ? सत्ताही पाहिजे, बदनामही व्हायचे नाही, लोकांची कामेही करायची नाही. तुम्ही प्रस्ताव ध्या.

**मा. पिठासिन अधिकारी :-**

साहेब, तुम्ही एक निवेदन करा.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही लॅन्डफिलींगचे टेंडर स्टँडीग कमिटी समोर आणले. त्याचा खुलासा करावा.

**मा. पिठासिन अधिकारी :-**

आत्ता तो विषय नाही.

**अनिल सावंत :-**

त्याचा खुलासा करावा. त्याचे आरोप झालेले आहेत.

**दिनेश नलावडे :-**

लॅन्डफिल बद्दल मा. आयुक्त साहेबांशी माझी चर्चा झालेली आहे. आणि कमिशनर साहेबांनी त्याबद्दल निवेदन द्यावे.

**शरद पाटील :-**

आम्हाला प्रत्येक वेळेला कोर्टाच्या धमक्या देउन सगळे विषय करायला लावता.

**दिनेश नलावडे :-**

हा स्टँडिंग कमिटीच्या सदस्यांचा फक्त निर्णय नाही. विचार विनिमय करून हा ठराव आम्ही मा. महासभेमध्ये आणलेला आहे.

**मा. पिठासिन अधिकारी :-**

तो विषय ४९ मध्ये आहे.

**दिनेश नलावडे :-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि काँग्रेस पक्षाच्या नेत्यांशी बसून हा निर्णय झालेला आहे हे मला त्यांना कोणाला सांगायची गरज नाही. पण आज मला याठिकाणी हे निवेदन करावे लागते आहे.

**मा. पिठासिन अधिकारी :-**

ठिक आहे. तो विषय ४९ नंबरवर आहे आत्ता साहेब निवेदन करत आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, महानगरपालिकेचे उत्पन्न स्त्रोत महानगरपालिकेचे सध्याचे सर्व करा. पासुन मिळणारे उत्पन्न पाहता १७५ करोड इतके आहे. JNNURM मधील प्रकल्प पाहता भुयारी गटार योजना मंजुर होउन १९०० कोटी रूपयांचे प्रकल्प केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेले आहेत. यामध्ये शहरासाठी २०० एमएलडी पाणी पुरवठा अंतर्भुत आहे. हे प्रकल्प मुदतीत पुर्ण होणे अपेक्षित आहे. यासाठी केंद्र शासनाचे ३५ टक्के आणि राज्य शासनाचे १५ टक्के अनुदान मिळणार आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेला स्वतःचा हिस्सा म्हणून घालावे लागणार आहेत. त्यातुनच मुलभूत सेवा सुविधा व खर्चामध्ये देखिल दिवसेंदिवस वाढ होत आहे. कर्मचाऱ्यांना देखील सहावा वेतन आयोग लागू केलेले आहेत. सद्याचे उत्पन्न पाहता एमएमआरडीए चे कर्ज फेड क्षमता लक्षात घेउन मागील असलेल्या कर्जाचे दायीत्व भुयारी गटार योजनेसाठी २२६ कोटी रूपयांचे मंजुर करून घेतलेले आहे. यापुढे कर्जाची मागणी करता येणार नाही. कारण केंद्रशासन व राज्य शासन हे कर वाढविण्याबाबत अनिर्वाय बंधन घातलेले आहेत. दरमहा कर्ज परतफेड निधी म्हणून तीन कोटी रूपये बाजूला ठेवण्याची अट एमएमआरडीए ने कर्ज मंजुरीच्या करारनाम्यात घातली आहे. स्वतंत्र अकाउंट उघडून त्यामध्ये ती रक्कम ठेवणे बंधनकारक केलेले आहे. सध्या महानगरपालिकेचे वॉर्ड साफसफाई, वेतन, पाणी बिल, इलेक्ट्रीसिटी स्ट्रीट लाईट, इंधन, मलनिःसारण केंद्र चालवणे आणि देखभाल दुरूस्ती यावर दर महिना आठ कोटी रूपये खर्च येतो. यावर प्रतिवर्षी ९६ कोटी रूपये खर्च येतो. सध्या जेएनएनयुआरएम मधील स्वतःचा हिस्सा महानगरपालिकेला घालता येणार नाही. परिणामी असे मोठे प्रकल्प राबवता येणे कठीण होउन बसले आहे. ५० टक्के केंद्र शासन व राज्य शासनाकडील अनुदानास मुकावे लागणार आहे. नवीन विकासाची कामे देखिल करता येणार नाही. यातुन शासनाने ‘‘ड’’ वर्ग महानगरपालिकेचे उत्पन्न स्तोत्र ‘‘जकात’’ बंद करून त्याऐवजी स्थानिक कर लागू करावा असा अध्यादेश प्राप्त झालेला आहे. याबाबत पुर्व इतिहास पाहता महानगरपालिकेकडून सप्टेंबर २००८ ते १८ डिसेंबर २००८, उपकर वसुलीमध्ये ५० टक्के नुकसान झालेले आहे. त्याचा विचार करता नव्याने लावण्यात येणाऱ्या स्थानिक करापासुन देखिल असा तोटा सहन करावा लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. महानगरपालिकेचे सध्याचे कर व दर पाहता १९९६ पासून रिव्हीजन करण्यात आलेले नाही. ‘‘अ’’ वर्ग नगरपालिकेचे दर सध्या अस्तित्वात आहेत. इतर महापालिकेशी तुलना करता महापालिकेचे दर अत्यंत कमी आहेत. याचा तुलनात्मक तक्ता आपल्या माहितीसाठी सोबत जोडत आहे याचा कृपया विचार व्हावा. महानगरपालिकेचे कर दर वाढ न केल्यास उत्पन्न वाढणार नाही. त्यामुळे जे.एन.एन.यु.आर.एम. खालील योजना घेता येणार नाही. याचाही तपशिल आपल्या

माहितीस्तव सोबत जोडला आहे. विविध महानगरपालिकेची कर आकारणी बाबत तुलनात्मक तक्ता. ठाणे महापालिका, ४९ टक्के निवासासाठी आणि ८५ टक्के बिगर निवासासाठी कल्याण डोंबिवली, निवासासाठी ५४ टक्के आणि बिगर निवासासाठी १०७ टक्के नाशिक महापालिका, निवास ४८ टक्के, बिगरनिवासी ४८ टक्के, मुंबई महापालिका, निवासासाठी १०४.५० टक्के बिगर निवासी १९८ टक्के मिरा भाईंदर महापाकिा, ३१टक्के निवासी, आणि बिगर निवासीसुद्धा ३१ टक्के आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिका उत्पन्नात वाढ झाल्यास अत्यावश्यक सेवा पुरविणे व विकास कामे करणे वाढ न झाल्यास कठीण होउन बसणार आहे. विकासकामासाठी शासनाकडील ५० टक्के अनुदानाला देखील मुकावे लागणार आहे. त्यामुळे वरील तुलना पाहता, प्रकल्प व विकासाची कामे मंजुरीस्तव पाठविण्यात आलेले प्रकल्प, पूरवावी लागणारी सेवा याचा विचार करता महानगरपालिकचे दर फारच कमी आहेत. मा. स्थायी समितीने या ठरावावर चर्चा करण्यासाठी मा. महासभेकडे विनंती केलेली आहे. आपण चर्चा करून निर्णय द्यावा अशी विनंती आहे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही आत्ता काय वाचले? मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी काढलेला विषय बाजूलाच राहिला.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावाडे :-**

मा. आयुक्त साहेब, लॅन्डफिलच्या बाबतीत मी हा विषय घेण्यापुर्वी मा. आयुक्त साहेबांना भेटलो न्यायालयाचे लेटर दाखवले हा विषय जर तुम्ही पटलावर घेणार नाही तर तुम्ही न्यायालयाचा अपमान करता. आम्ही ते निवेदन करण्यासाठी सांगितले होते. आम्हाला तो विषय का घेउन मंजुरी द्यावी लागली, त्याच्याबद्दल आपण निवेदन द्या.

**मा. आयुक्त :-**

लॅन्डफिल संबंधी २००७ आणि २००८ मध्ये टेंडर काढलेले होते. ज्यावेळेला प्रकल्प सुरू करायचा होता. त्याचवेळेला टेंडर काढलेले होते. पंरतु, केंद्र शासनाची आणि राज्य शासनाची तज्ञ समिती येउन प्लान्टची पाहणी केली आणि प्लान्ट सुरू करावा किंवा नाही याबाबत माहिती घेउन त्या तज्ञ समितीने मा. मुख्यमंत्री साहेबांना अहवाल दिला. त्यामध्ये ज्या त्रुटी दाखवल्या गेल्या. त्यामधील कंपाउंड वॉल, लॅन्डफिल साईट आणि ट्री प्लान्टेशन या ज्या सुधारणा सुचवल्या, प्लान्ट चालविण्याचा माणसाला काही सुधारणा करायला आदेश दिलेले आहेत आणि महापालिकेने जे करायचे आहे ते गव्हर्नमेंटने आम्हाला कळवले असल्यामुळे तो विषय ठेवण्यात आला. कारण, त्याची पुर्तता करणे गरजेचे आहे. ते देखिल घ्यायला तयान नव्हते, कारण प्लान्ट चालू नाही तर मी लॅन्डफिल साईट घेउन काय करू? परंतु, शासनाच्या आदेशाप्रमाणे निदान ॲग्रीमेंट करून ठेवू आणि शासनाला सांगू की, आम्ही मंजूर करून ठेवले आहे. जर प्लान्ट सूरू झाल्यानंतर वर्क ऑर्डर द्यायची. कारण पुर्तता केली नाही तर प्लान्ट सूरू होणार नाही. कारण गर्व्हनमेंटने आठ महिन्यांची अवधी दिली होती. त्यासाठी तो विषय घ्यायला सांगितले होते.

**अनिल सावंत :-**

मग त्यानंतर त्यादिवशी ज्यावेळी स्टँडींग कमिटी मध्ये मा. आमदारांची मिटींग झाली. त्यांच्या निदर्शनाला तुम्ही या गोष्टी आणल्या का?

**मा. आयुक्त :-**

मी सांगितले.

**अनिल सावंत :-**

मग श्री. प्रफुल्ल पाटील साहेब कसे म्हणतात की, आम्ही कोणतेही लॅन्ड फिलींगचे टेंडर काढणार नाही म्हणून कमिशनर साहेबांनी ॲक्सेप्ट केले होते? त्या मिटींगमध्ये आम्ही लॅन्ड फिलींगचे कोणतेही टेंडर काढणार नाही ही कमिटमेंट तुम्ही दिली होती का?

**मा. आयुक्त :-**

प्लान्ट सुरू होईपर्यंत पुढची कार्यवाही करणार नाही. प्लान्ट सुरू झाल्यानंतरच मालकपत्र देणार.

**अनिल सावंत :-**

साहेब, दुस-यावर आरोप करणे नेहमी सोपे असते. पण ते वस्तुस्थितीला धरून असावे.

**दिनेश नलावाडे :-**

मा. महापौर साहेब, त्यावेळेला आम्ही हा विषय घेतला आणि मंजुर करताना आम्ही गोषवा-यामध्ये काय बनवले आहे? जोपर्यंत हा कारखाना सुरू होत नाही. आम्ही फक्त मान्यता देतो. परंतु, कारखाना सुरू होत नाही तोपर्यंत लॅन्डफिलचे काम करण्यात येउ नये असा ठराव आम्ही सर्वानुमते केलेला आहे. हे जे आरोप करतात ते चुकीचे आरोप करत आहेत.

**भगवती शर्मा :-**

वह प्रश्न नही। अभी मा. आयुक्त साहब ने जो निवेदन पढा है, मेरे ख्याल से उसपर चर्चा करेंगे तो बेहतर होगा।

**मा. पिठासीन अधिकारी :-**

४९ नंबरमध्ये तो विषय आहे. त्याच्यावर नंतर बोलू.

**प्रविण पाटील :-**

विषयच नाही. त्याच्यावर तुम्ही चर्चा कसे करणार?

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहब ने अभी जो बोला की, मत्रालय से जो लेटर आया है की, लॅन्ड फिलींग साईट हमे करना है।

**मा. पिठासीन अधिकारी :-**

उस विषयपर अब चर्चा नही करेंगे बाद मे वो सब्जेक्ट है।

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब मै यह बोलना चाहता हू की, मा. स्थायी समिती मे लिया गया प्रस्ताव गलत है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेबांनी निवेदन केले की, जे.एन.एन.यु.आर.एम., एम.एम.आर.डी.ए. कर्ज या महापालिकेचे काम पैसे नाही म्हणून थांबणार.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

साहेब, एमएमआरडीए नाही. बोलले. फक्त जेएनएनयुआरएम बोलले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या विषयावर तुम्ही गांभिर्य घेतले नाही. आज महापालिकेच्या उत्पन्नामध्ये लखा परिक्षण अहवालामध्ये आक्षेप ठरलेला आहे. कोट्यावधी रूपये अधिकारी वसुल करत नाहीत. शहराचे बाकी आहेत. म्हणून तुम्ही आता कार्यवाही केली तर पैसे वसुल होणार आहेत. लाखो रूपये वसुली करायची आहे. ती होत नाही आणि तुम्ही दरवाढीचा विषय आणता? पहिले अधिका-यांना सांगा की, वसुली करा.

**प्रविण पाटील :-**

आत्ता जे निवेदन केले ते कोणत्या विषयावर होते?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ते निवेदन करणे गरजेचे आहे.

**प्रविण पाटील :-**

गरजेचे आहे. पण तो विषयच नाही. त्याच्यावर तुम्ही निवेदन करता.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

तुमचे त्या विषयावर मत मांडा.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही विषय सांगा. विषयपत्रिकेवर तो विषय आहे का? मा. स्थायी समितीवर कोणाची सत्ता आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मा. स्थायी समितीवर आपण आहात.

**प्रविण पाटील :-**

मा. स्थायी समितीवर आहे म्हणून बोलतो. मा. स्थायी समितीचा विषय होता की, हा विषय मा. महासभेपुढे आणावा. पण कशाला आणला नाही?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मा. महापौरांना विचारा.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, चार सन्मा. सदस्य निवेदन देउन हा विषय आणू शकत होते.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मग तुम्ही मा. स्थायी समितीचे चार सदस्य मिळून का आणला नाही?

**प्रविण पाटील :-**

सत्ता कोणाची आहे? मा. आयुक्त साहेब, ठराव मी सोडून इतरांनी केला.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ठराव कोणी केला ते नाही. एकमान्यतेने झालेला आहे.

**प्रविण पाटील :-**

हा गांभिर्याचा विषय आहे तर तुम्ही का आणला नाही? चार सदस्यांना वाटले, कॉंग्रेसची सत्ता आहे. मग कॉंग्रेसच्या सन्मा. सदस्यांनी हा विषय का आणला नाही?

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

निरंक लिखने का मतलब क्या है।

**अनिल सावंत :-**

निवेदन काय आहे? तुम्ही अजेंड्यामध्ये तो विषय घेणार आहात का?

**प्रविण पाटील :-**

विषय नाही. त्याच्यावर तुम्ही निवेदन करता.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

या विषयावर ठराव होणार नाही. या विषयावर तुम्हाला चर्चा करता येईल.

**प्रविण पाटील :-**

पहिली गोष्ट म्हणजे तुम्हाला चर्चा करता येते की, नाही ते बघा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

तुम्हाला एकतर हे मान्य करावे लागेल, या शहरामध्ये २०० एमएलडी पाणी आणायचे की नाही? आणि जर आणायचे नसेल तर तसे सांगा. जर आणायचे असेल तर त्याला लागणारा निधी तुम्ही कसा गोळा करणार, कुठून आणणार तेही सांगा सभागृहाला माहिती द्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आमचे म्हणणे आहे की, तुम्ही अजूनही विषय आणू शकता. तुम्ही याच्यासाठी विशेष मा. महासभा लावू शकता. तुमच्याकडे वेळ आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ९९ प्रमाणे फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा तत्पुर्वी निश्चित केले पाहिजे. म्हणजे २० तारीख किंवा २० तारखेपुर्वी हा विषय चर्चेला आला तरच या विषयावर चर्चा. आत्ता हा विषय आलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. मा. महापौरांना मी विनंती केली हे जर २० तारखेपुर्वी आपण सभागृहाला सांगितले. सभागृहाचा निर्णय फायनल असतो. मा. महापौर साहेबांनी मला वाचायला सांगितले की, असा असा मा. स्थायी समितीपुढे प्रस्ताव पाठवला होता. हा घ्यायचा की, नाही घ्यायचा हा संपुर्ण सभागृहाचा प्रश्न आहे. मा. महापौर साहेब म्हणाले की, संपुर्ण सभागृह काय निर्णय घेईल तो घेईल. तुम्ही निवेदन करा. त्यामुहे इतर महापालिकेचे दर पण ठेवा म्हणून त्यावेळेला चर्चा झाली होती. त्यामुळे सर्व महापालिकांचे दर मागवले आणि आत्ता आपण जो विषय मा. स्थायी समितीपुढे दिला होता. त्या विषयासंबंधी आपण विचार करणार असाल तर बघा. नसेल तर राहिले. परंतु हे विषय २० तारखेपुर्वी करणे गरजेचे आहे. नाही केले तर ते ॲप्लीकेबल होणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

९९ (अ) वाचा त्याच्यामध्ये काय लिहिलेले आहे? ते पण जरा सांगा.

**मा. आयुक्त :-**

कलम १२७, पोटकलम २ खंड अ मध्ये विनिर्दिष्ट केलेले उपकर बसविण्याचे महापालिका प्रथम ठरविल त्यावेळी कोणत्याही वर्षाच्या १ एप्रिल पुर्वी व या अधिनियमाच्या कलम ९९ तरतुदी व इतर संबंध तरतुदी या अनुसार उपकर बसविता येत नसेल तर कलम ९९ मध्ये काही अंतर्भुत असेल तरी महापालिकेला प्रकरण ११(अ) विहित केलेल्या मर्यादा शर्ती व नियमाच्या अधिन राहून ज्या दराने व ज्या मर्यादेपर्यंत ज्या तारखेपासुन उपकर बसविण्यात येईल दर व मर्यादा तारीख निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी बोलावलेल्या विशेष सभेमध्ये त्या गोष्टींची निश्चित करता येईल आणि त्यानंतर अशा तऱ्हेने निश्चित केलेल्या दराने तारखेपासुन उपकर बसविण्यात येईल. या अधिनियमाचे कलम ९९ व तरतुदी याद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्य पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला असावा. अशा प्रकारे या अधिनियमाच्या सर्व संबंध तरतुदी शक्य असेल तेथवर उपकराला लागू राहतील. माझ्या बोलण्याचा अर्थ असा होता की, आपण एप्रिल ते मार्च हे महापालिकेचे वर्ष आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा नियम सेस लावायला आहे. याच्या अगोदर भानगडी केल्या आहेत. या सगळ्यांच्या मुर्ख पणामुळे या भानगडी आम्ही केल्या आहेत. सेस लावला. डोक्यावर आपटून घेतले. नंतर रद्द केला. किती वेळा हेच करायचे? तो फक्त सेससाठी आहे. म्हणजे तुम्ही कुठल्याही आर्थिक वर्षात लावू शकता पण तुम्हाला जर हे विशेष कर लावायचे असतील.....

**मा. आयुक्त :-**

विशेष कर ९९ प्रमाणेच लावायचे आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, या विषयावर चर्चा करायला आपल्याकडे फिगर्स कुठे आहेत. या निवेदनावर काही निर्णय होणार आहे का? आम्हाला माहिती पाहिजे की नको? हे जे निवेदन दिले आहे त्याच्यामध्ये फिगर्स कुठे आहेत? कशावर निर्णय घ्यायचा आहे?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मा. कमिशनर साहेबांना मी निवेदन करायला सांगितले, या शहरामध्ये जे.एन.एन.यु.आर.एम. च्या माध्यमातुन बऱ्याचशा योजना राबवायच्या आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

तो विषय नाही. आम्हाला जर निर्णय घ्यायचा आहे तर आमच्याकडे काही फिगर्स पाहिजे की नको? कुठल्या विषयावर आम्ही निर्णय घ्यायचा. दर किंती वाढवायचा आहे?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ते तुम्ही ठरवायचे आहे ते सभागृह ठरवणार आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आजच्या सभेत ठरवायचे आहे का?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आज ठराव होत नाही. फक्त निवेदन केलेले आहे. या विषयावर विशेष सभा लावावी लागेल.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, दरवाढ करायचीच असेल तर एक विशेष सभा बोलवू शकता. त्याच्यावर रितसर चर्चा होउ द्या.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

या विषयावर आपल्याला एक विशेष सभा लावायची आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सचिवांनी मगाशी एक गोष्ट स्पष्ट केली की, मा. स्थायी समितीने दरवाढ सुचवली नाही. डायरेक्ट मा. महासभेपुढे प्रस्ताव शिफारस केले. आत्ता त्याचा अर्थ मी असा घेतलेला आहे की, त्यांना स्वतःच्या अंगावर करवाढीचे काही घ्यायचे नाही. मा. महासभेमध्ये आपण सगळेच आहोत. म्हणजे आपल्या सगळ्यांच्या अंगावर आले असते. पण मा. स्थायी समितीचा प्रस्ताव मा. महापौरांनी मा. महासभेपुढे घेतला नाही. त्याच्यावर तुम्ही काही केले नाही. याच्यात कायद्याच्या तरतुदी होत्या की, आजच्या सभेत तो विषय आणता आला असता. तुम्ही काय ठरवता की, २० फेब्रुवारीची मा. महासभा बोलवू. मग आता मा. महापौरांना फोन करून विचारा की, २० फेब्रुवारीला मा. महासभा बोलविण्याची त्यांची मानसिकता आहे का? जी मानसिकता आज आहे तीच त्यांची उद्या राहणार आहे. मग तुम्ही मा. महासभा काय बोलवणार. म्हणूनच जे कायदे दिलेले असतात की, ज्या ठिकाणी मा. महासभा बोलविण्याचे अधिकार मा. महापौरांना असतात आणि ते विषयांचा अजेंडा ठरवतात. त्याठिकाणी सभागृहातील सभासदांना काही अधिकार असावेत म्हणून कामकाज नियमामध्ये तशी तरतुद केलेली आहे. ०६ तारखेला जर तुम्ही स्टँडींगच्या चार सन्मा. सदस्यांनी सचिवांना पत्र दिले असते की, नियम १(एच) खाली हा विषय तुम्ही मा. महासभेत ठेवावा.तर तो आजच्या सभेत आम्हाला चर्चेला घेता आला असता. मा. महापौरांचा त्या ठिकाणी काही अधिकार राहत नाही. आत्ता तुम्ही कुठल्या मा. महापौरांना सांगणार एकतर येणाऱ्या मा. महापौरांना सांगायचे की, अगोदर मिटींग आणि मा. महासभा लावा. नाहीतर आहेत त्यांना विनवणी करून होणार आहे का? नाही होणार. म्हणजे अशक्य गोष्टी साठी आम्ही मेहनत करतो अणि शक्य तितक्या गोष्टी आहेत, त्यांच्याकडे आम्ही दुर्लक्ष करतो. या सभागृहात माहिती नाही का? कितीतरी विषय आम्ही अनेकवेळा "क" खाली आणलेले आहेत. मग "ह" खाली हा विषय का आणला नाही? मा. आयुक्त साहेबांनी त्या सन्मा. सदस्यांना सांगितले होते की, तुम्ही चार सदस्यांनी सचिवांना नोटीस द्या. मी तो विषय घ्यायला लावतो आणि सचिवांना तो विषय घ्यायला लागला असता. मग सन्मा. सदस्यांनी का दिले नाही? श्री. प्रफुल्ल पाटील बोलल्यानंतर मिरची लागते. श्री. प्रफुल्ल पाटील यांची जीभ तर तिखट आहे, असणारच, असायलाच पाहिजे. कारण लोकशाही राज्यात काम करतो. आम्ही कोणावर अन्याय होउ देणार नाही. या शहरावर तर मुळीच होउ देणार नाही. या शहरावर जेव्हा अन्याय झाला, जेव्हा आंदोलने झाली तेव्हा आम्हीच बाहेर आलो. बाकीचे बीळात घुसले. पण तुम्ही तुमची स्वतःची जबाबदारी स्विकारत नाही. आणि मग सांगता की, लॅन्डफिल साईटवर बोललात. लॅन्डफिल साईटवर जे झाले तेच बोललो. आजही बोलतो. तुमची स्वतःची जबाबदारी होती. जेव्हा मा. आयुक्तांनी तुम्हाला सांगितले. श्री. प्रफुल्ल पाटील यांनी सांगितले तुम्ही ऐकणार नाही ते मला माहिती आहे. म्हणून मला कधी कधी उलटे सांगावे लागते तेव्हा तुम्ही सुलटे ऐकता. जर तुम्हाला मा. आयुक्तांनी सांगितले होते की, असा प्रस्ताव चार दिवस अगोदर द्या. तर तीन दिवसांची पुरक घोषणा काढून हा विषय आजच्या मा. महासभेपुढे आला असता. आणि म्हणून ही जी करवाढ होत नाही याला सर्वस्वी जबाबदार तुम्हीच आहात.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, हे विषय घेण्या संदर्भामध्ये मी मा. आयुक्त साहेबांना भेटलेलो चर्चा केली ते घेणार होते. त्यांनी बोलल्यानंतर मी हा पुढचा प्रश्न घेतला नाही. मा. आयुक्त साहेबांनी याचे निवेदन द्यावे. आज विषय न घेण्यासंबंधी स्टँडींग कमिटीवर आरोप होतो आहे. याच्या बाबतीत मी तुम्हाला भेटलो नव्हतो. तुम्ही या संदर्भात निवेदन द्या.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ती चर्चा मगाशी झाली.

**दिनेश नलावडे :-**

हे आरोप केले जात आहेत. त्याचे उत्तर मी दिलेले आहे. पुढचे उत्तर कमिशनर साहेबांनी द्यायचे आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मा. सभापती साहेब, आपण जरा बसा मी सांगतो. हा सगळा घोळ मा. महापौरांनी केलेला आहे. मा. महापौरांना सभा लावायची मानसिकता नव्हती. हा विषय मा. स्थायी समितीमधून मा. महासभेपुढे जसाच्या तसा आणायचा होता. तसा तुम्ही ठराव केलेला आहे.

**दिनेश नलावडे :-**

सर्वमान्य ठराव आहे. दोन्ही पक्षाच्या नेत्यांचा ठराव आहे. माझा एकट्याचा ठराव नाही. हे इथे मला निवेदन कोणामुळे तरी करावे लागते.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

पण मा. महापौरांची मानसिकता याच्यामध्ये नव्हती एवढाच याच्यामधला भाग आहे.

**प्रविण पाटील :-**

त्या ठरावाला पण आमचा विरोध होता.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, हा प्रस्ताव जेव्हा मा. स्थायी समिती समोर आला..

**मा. पिठासीन अधिकारी :-**

या विषयावर तुम्ही किती चर्चा करता.

**अनिल सावंत :-**

बोलावेच लागणार आहे. तुम्ही एकाला बोलायला द्याल आणि दुसऱ्यांचे ऐकून घेणार नाही असे चालणार नाही. मा. महापौर साहेब, हा प्रस्ताव प्रशासनाने ज्यावेळी मा. स्थायी समितीसमोर दिला. तो जसाचा तसा मा. महासभेसमोर पाठवलेला आहे. त्याच्यावर दोन तास चर्चा झाली. सर्व सदस्यांनी आम्ही सुद्धा करवाढीला विरोध केला. आम्ही एका राजकिय पक्षाचे नेतृत्व करतो. जो नॅशनल पातळीवर आहे. लोकांना आम्हाला जवाब द्यायचा आहे. आज शहरामध्ये जागोजागी कचरा साठलेला आहे. रस्त्याची परिस्थिती ठिक नाही. लोकांना ७२ तासांनी पाणी मिळते. आणि कसले टॅक्स वाढवायचे प्रस्ताव तुम्ही घेउन येता. त्याच्यावर सर्व लोकप्रतिनिधींचा, स्टँडींग कमिटीमध्ये फक्त सोळा जण असतात. मा. महासभेमध्ये ७९ लोकप्रतिनिधी आहेत आणि पाच कॉप्शनचे आहेत. त्या सर्व लोकप्रतिनिधींनी विचार करावा. म्हणून हा प्रस्ताव मा. महासभेपुढे आणावा. असा ठराव झालेला आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

श्री. सावंतने बोला उससे मै सहमत हू।

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मा. महासभेमध्ये या विषयावर चर्चा होण्यासाठी, तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही मा. महासभेमध्ये तो विषय आणण्यासाठी तुम्ही मागणी केली. पण तो विषय आला नाही. करवाढ करायची की नाही हे सभागृह ठरवेल.

**अनिल सावंत :-**

आमचा करवाढीलाच विरोध आहे. सचिव साहेब, ज्यावेळी एखादा प्रस्ताव शहराच्या हिताशी निगडीत असेल आणि कमिशनर साहेबांना वाटते की, हा प्रस्ताव मा. महासभेत अजेंड्यावर यायला पाहिजे आणि जर मा. महापौर परमिशन देत नसतील तर बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये कुठे प्रोव्हीजन आहे की, प्रस्ताव घ्यायला मा. महापौरांची परवानगी पाहिजे? कुठे प्रोव्हीजन आहे? रूल दाखवा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

तुम्ही जरा मुंबई प्रांतिक अधिनियम वाचून बघा.

**अनिल सावंत :-**

वाचला आहे. जरा तुम्ही सचिवांना विचारा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

दुसरी गोष्ट अशी आहे की, आपण करवाढीला विरोध करता.

**अनिल सावंत :-**

या परिस्थितीमध्ये विरोध आहे.

**प्रविण पाटील :-**

श्री. अनिल सावंत, करवाढीला विरोध आहे की, नाही हे तुम्ही स्पष्ट सांगा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आपला करवाढीला विरोध आहे हे मला मान्य आहे.

**जुबेर इनामदार :-**

करवाढीला विरोध आहे. चर्चेला विरोध नाही. चर्चा होउ द्या. रितसर विषयपत्रिकेवर विषय घेउ द्या आणि चर्चा करा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मला तुम्ही हे सांगा, या शहरामध्ये २०० एम.एल.डी. पाणी जे आणायचे आहे ते आणण्यासाठी जो निधी लागणार आहे तो कुठून आणायचा याचे उत्तर आपणच द्या. आपल्याकडे उत्तर असेल.

**अनिल सावंत :-**

२०० करोड काय आपण २००० करोडची कामे आपण करू.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मी २०० एमएलडी पाणी म्हणतो आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच्यासाठी लागणारा जो निधी आहे, २०० करोड काय २००० करोडची कामे करू. त्यासाठी शहरामध्ये तत्कालिन परिस्थिती आहे, जिथे तिथे कचरा साठला आहे. पाणी ७२ तासावर गेले आहे, ती परिस्थिती अगोदर सुधारा....

**मा. पिठासीन अधिकारी :-**

पाणीच नाही ना.

**अनिल सावंत :-**

मग ती परिस्थिती अगोदर सुधारा.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

३५ एमएलडी झाले ते अजून मिळत नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, १६ सदस्यांनी तिथे विचार केला आणि त्यांनी असा विचार केला की, आम्ही १६ लोकांनी निर्णय घेउन हे ७९ लोक काय म्हणणार आहेत. मा. महापौरांना त्याच्यामध्ये काय वाटले किंवा त्यांची काय अडचण असेल म्हणून त्यांनी तो विषय घेतला नसेल. पण आता विषय नसताना आपण चर्चा करतो. मग सर्वांच्या मताने असे ठरू द्या की, आपल्याला करवाढ करायला पाहिजे. या शहराचा विकास व्हायला पाहिजे. असे सर्वानुमते या ठिकाणी म्हणू आणि मग विशेष सभा लावा. या शहराचा विकास करताना तुम्ही या सभागृहाचे सन्मा. सदस्य म्हणून या शहरातील लोकांना सुखसुविधा पुरविण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. आणि मग तसे असतांना त्या मा. स्थायी समितीच्या १६ लोकांनी निर्णय घेतला किंवा सत्ताधारी मधील दहाच लोकांनी निर्णय घेतला. त्यांच्या माथ्यावर मारायचे आणि आपण शल्क राहायचे. तसा विषय डोक्यात कशाला घेता. आपल्याला या शहराचा जर विकास करायचा आहे तर सर्वांना एकमुखाने या ठिकाणी असे म्हणा की, आपल्याला विशेष सभा लावून या सगळ्या गोष्टी करायला पाहिजे. या शहरातील लोकांना ज्यावेळी आपण अनाठायी कुठेतरी करतो तेव्हा लोक समजुन घेतात आणि त्यांच्या हिताचा निर्णय घेउ तेव्हा लोक समजून धेतील. पण ते कोणावर तरी अमुक लोकांच्या माथी मारून मोकळे व्हायचे आणि बाकीच्यांनी कटआउट लावायला मोकळे व्हायचे.....

**लक्ष्मण जंगम :-**

आपल्या सभागृहामध्ये आपल्याला काय काय करता येईल ते बघा.

**शरद पाटील :-**

साहेब, कोणती आणि कोणाची कटआउट लागतात ते पण आपल्याल माहिती आहे. आम्ही कशाला बोलायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, मा. स्थायी समितीसमोर जे करवाढीचे विषय आणले होते. त्यावेळेला जवळ जवळ दोन तास चर्चा झाली आणि त्यावेळेला जर मंजूरच करायचे नव्हते, मा. महासभेमध्ये चर्चेला पाठवायचेच नव्हते तर नामंजूर केले असते तर हा प्रश्नच आला नसता. दुसरा महत्वाचा प्रश्न, करवाढ करायची परंतु, ४० तासावरुन ८० तासावर पाणी गेल्यानंतर आणि कचरा उचलला नाही तर मग पूर्ण क्लीअर झाल्यानंतर करवाढ करु. सर्वात महत्वाची हास्यास्पद गोष्ट आहे की, आत्ता आपण शहाड-टेमघर पाणी पुरवठ्याकडून पाणी विकत घेतो. त्याशिवाय दुसरा सोर्स नाही. तर पाण्यामध्ये सुधारणा करा आणि मग कर वाढवा. म्हणजे आकाशातून पाणी आणायचे आहे का? प्रश्न तो महत्वाचा आहे की, महापालिकेचा सोर्स बघायला पाहिजे. सोर्स बघून तिथून पाईपलाईन टाकून योजना राबवायला हवी. असे किती वर्षे तुम्ही म्हणत बसलात, पाण्यामध्ये सुधारणा करा तर कर वाढवा. हे शक्यच होणार नाही. जोपर्यंत तुम्ही योजना करणार नाही जोपर्यंत सोर्स बघणार नाही. जोपर्यंत स्किम मंजूर होणार नाही तोपर्यंत वाढ होणार नाही. हे जे श्री. पाटील साहेब म्हणाले यात

सुधारणा झाल्याशिवाय काही करायचे नाही, तर मग पाणी आठ दिवसातून एकदा येईल. परत तुम्ही कर वाढवू नका. महिन्यातून एक दिवस येईल. प्रश्न तो नाही. म्हणजे इकडे पाणीही पाहिजे आणि इकडे करही वाढवू नका. मग पैशाचा रोक कोणी घ्यायचा? दुसरे महत्वाचे, जे.एन.एन.यु.आर.एम. खाली १९०० कोटीच्या योजना पाठवल्या आहेत. याच सभागृहाने १९०० कोटीच्या योजना मंजूरी दिलेल्या आहेत. आणि त्यामध्ये ११०० कोटीची पाणी पुरवठ्याची योजना याच सभागृहाने मंजूरी दिली. स्टेट गर्व्हमेंटने आणि सेंट्रल गर्व्हमेंटने मिळून ५० टक्के रक्कम घ्यायचे असेल तर ५० टक्के रक्क्म कुठून भरायची ही तयारी करायला पाहिजे आणि या संधीचा फायदा तुम्ही उचलला नाही. पुढे तुम्हाला १०० टक्के तुमचा तुम्हीच खर्च करुन योजना करावी लागेल. शासनाचे २०१२ पर्यंत जे.एन.एन.यु.आर.एम. आहे. त्यानंतर योजना राहील की जाईल हे आत्ता सांगता येणार नाही. परंतु, शासनाकडे टॉप प्रायोरीटीवर पाणी पुरवठा आहे. सेकंड प्रायोरीटीवर अंडरग्राउंड ड्रेनेज आहे आणि थर्ड प्रायोरिटीवर घनकचरा व्यवस्थापन आहे. त्यामुळे प्रसिध्दी घेण्यासाठी कर वाढवायचे नाही हे म्हणणे संयुक्तिक नाही. इथे महापालिका चालवायची आहे. यापूर्वी तुम्ही ३०० कोटी कर्ज घ्यायला मंजूरी दिली आहे. महिन्याचे हफ्ते भरायचे आहेत. तुम्ही सहाव्या वेतन आयोगाला मंजूरी दिलेली आहे. पगार करायचा आहे. या सर्वांचा खर्च विचार केला तर ५०-४५ टक्के खर्च हा आस्थापनेचा आहे. राहिले शिल्लक ५० टक्के त्यामधील १० टक्के महिन्याला पाणी खरेदीमध्ये जाते. दुसरे १० टक्के लाईट बिलसाठी जाते. तिसरे किरकोळ कामासाठी खड्डे बुजविणे आणि नवीन योजना एकही घेता येणार नाही. कारण आपण जे ९६ कोटी दिलेले आहेत, हे महिन्याचा खर्च रिकरिंग आहे. म्हणजे कोणतेही काम न करता पुढचे ७६ कोटी राहतात. ७६ कोटीमधून सगळा कर्ज भागवणे, योजना घेणे आणि ५० टक्के रक्कम भरणे हे शक्य होणार नाही आणि आता जे आपण इतर महापालिकांचे दर पाहिले, पाणी पुरवठा लाभकर साफसफाई लाभकर आणि अंडरग्राउंड ड्रेनेज लाभकर आणि रोड लाभकर हे चार कर इतर महापालिकेमध्ये बसवलेले आहेत. पण आत्तापर्यंत आपण २००२ पासून दहा वर्षात बसवलेले नाहीत. त्यामध्ये एकही रुपये करच सुचवलेला नाही. इतर महापालिकेमध्ये तो आहे आणि आपण पाणीपट्टी पॉईंट ७ पैसे लिटरने देतो. आणि हे जे कर आपण वाढवतो आहे हे कर आपण मेन्टेनन्स, रिपेअर आणि पाणी खरेदीचे दर हे वेगळे. लाभकर म्हणजे योजना घेण्यासाठी. मग कर्ज काढले तर परतफेड करण्यासाठी किंवा सेंट्रलने आणि स्टेटने अनुदान दिल्यानंतर ५० टक्के रक्कम घालण्याची योजना करण्यासाठी. आता उदाहरणार्थ आपण माहिती घ्या. आपण जेसलपार्कची एस.टी.पी. प्लान्ट ताब्यात घेतली. एस.टी.पी. प्लान्ट ताब्यात घेतल्यानंतर ती सोसायटी चालवणार होती. सोसायटी चालवत होते त्यावेळेला सोसायटीचे लोक सोसायटी वर्गणी काढून भरत होते. त्या माणसाने आमच्याकडे चालवायला दिली मग आम्ही एस.टी.पी. प्लान्ट चालवले. त्यामध्ये जो खर्च येतो तो १३ टक्के प्रॉपर्टी टॅक्सवर वाढवला. आत्ता आपण ४९१ कोटीचे अंडरग्राउंड ड्रेनेज घेतले आहे. ४९१ कोटी पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी कर्ज आणि व्याज भरावयाचे चालू होईल म्हणजे लाभकर म्हणजे आपल्याला एखादी कंपनी काढायची असेल तर शेअर्स गोळा करतो आणि राहिलेले सेंट्रल गर्व्हमेंट, स्टेट गर्व्हमेंट किंवा बँक देते आणि मग कंपनी पाया खोदायला सुरु होतो. त्यामुळे पाणी पुरवठा योजना जर हाती घ्यायची असेल तर लाभकर इतर महापालिकेत पाणी पुरवठा चालू आहे. योजना घेण्यापूर्वी त्यांनी लाभकर बसवला. लाभकर फंडातून आलेली रक्कम त्यांनी लगेच भरली. आपण अजून लाभकर बसवलेलाच नाही. म्हणजे योजना १०-१५ वर्षापुढे येणार आहे. त्याची सुरुवात आत्तापासूनच करायला पाहिजे. म्हणजे आपण गावातील जे एस.टी.पी. प्लान्ट ताब्यात घेतो. पण ताब्यात घेतलेले योजनेमध्ये कोणकोण येतात, त्यांच्यावरच टॅक्स भरतो. ज्यांना या योजनेचा लाभ नाही, त्यांना टॅक्स नाही. म्हणजे जेसलपार्क, शांती स्टार, या योजना जे आपण एस.टी.पी. प्लान्ट घेतले त्याच लोकांवर कर लावला. ज्या लोकांना एस.टी.पी. प्लान्टचा उपयोग नाही, त्या लोकांवर नाही. पण आपण आता जी ४९१ कोटीची योजना घेतली ती संपूर्ण शहरासाठी आहे. त्यामुळे संपूर्ण शहरासाठी योजना घेताना आपल्याकडे भांडवल नाही. भांडवल उभा करण्यासाठी त्यापुढे मिळणारा लाभ याचा कर आतापासूनच लावणे गरजेचे आहे. पाणी पुरवठा योजना, आत्ता आपल्याला स्टेट गर्व्हमेंटने मंजूरी दिली. एम.एम.आर.डी.ए. कडे पडलेले आहे. एम.एम.आर.डी.ए. कडून सेंट्रल गर्व्हमेंटकडे शिफारस होईल. पाणी पुरवठा योजना टॉप प्रायोरिटीवर आहे. आपण जर पाणी पुरवठा सुधारणा होईपर्यंत वाढवायचे नाही असे ठरवले तर योजना होणारच नाही आणि तुमच्या पाण्यात पण वाढ होणार नाही. कारण जर योजना मंजूर झाली तरच पाणी येणार आहे. त्यामुळे ही योजना सेंट्रलकडे गेल्यानंतर सेंट्रल गर्व्हमेंटच्या टॉप प्रायोरिटीवर आहे. त्यामध्ये ५० टक्के अनुदान घेण्याची संधी महापालिकेला दिली आहे आणि ५० टक्के महापालिकेने घालण्ण्याची व्यवस्था करावी. मग कर्जाद्वारे असेल लाभकराद्वारे जरी गोळा केले तरी याला ७-८-१० वर्षे लागणार. लाभकर गोळा व्हायला म्हणजे पुढे पण चालु रहायला. हे जे आपण पाण्याचे दर वाढवतो, प्रॉपर्टी टॅक्स वाढवतो हे मेन्टेनन्ससाठी म्हणजे शहाड-टेमघर पाणी पुरवठ्याकडून आपण पाणी खरेदी केले. त्याचे येणारे पाईपलाईन, मेन्टेनन्स, आपल्या गावातील पाणीपुरवठा, लाईट बिल, याच्यासाठी ते पाण्याचे दर घेतो आणि पुढे येणा-या योजनेसाठी आपण लाभकर घेतो. त्यामुळे आपण सर्वांनी असा विचार न करता आपण महापालिका चालविण्याच्या दृष्टीकोनातून आणि योजनेचा फायदा घेण्याच्या दृष्टीकोनातून आपण विचार करावा अशी नम्रतेची विनंती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, शहराला पाणी पाहिजे. अंडरग्राउंड ड्रेनेज पाहिजे सर्व आहे. त्याला कर्जफेडीसाठी पैसे पाहिजे. जी गोष्ट तुम्ही सांगता पैसे पाहिजे, या शहराने वेळोवेळी पैसे दिलेले आहेत. आज मी पुन्हा सांगतो. या महापालिकेकडे कोट्यावधी रुपये ज्या अधिकाऱ्यांनी वसुल केले पाहिजे. ज्या डिपार्टमेंटने वसुल करत नाही. त्याच्यावर तुम्ही कार्यवाही का करत नाही?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आपके टॅक्स बढाने के बारेमे क्या बोलना है, उतना बोलो। शहरामध्ये योजना राबवायची आहे, पाणी आणायचे आहे की नाही? सचिव साहेब, जेवणाची सुट्टी करा.

**मा. आयुक्त :-**

साहेब, यांच्या प्रश्नाचे उत्तर देतो. ऑडीट म्हणजे गाईडलाईन्स असतात. ऑडीट आक्षेप काढला की त्याचे उत्तर देतो. उत्तर मान्य न झाल्यास दोषी व्यक्तींवर इन्क्वायरी असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही काय केले? तीन वर्षामध्ये अतिक्रमण विभागाने साठ लाख रुपये.......

**मा. आयुक्त :-**

जरा ऑडीटरकडे बसा. ऑडीट काय असते ते बघा. याच महापालिकेचे नाही, सगळ्या महापालिकेतील ऑडीटची उत्तरे द्यावी लागतात. आणि ते वसुल करुन योजना होत नाही. ७० लाखाची वसुली आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

जेवणाची सुट्टी झालेली आहे.

**लंचटाईम :-**

**नगरसचिव :-**

जेवणानंतर सभा कामकाजाला सुरुवात होत आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

विषय क्र. ४४ मंजूर झालेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, त्या ठरावाचे वाचन तरी करुन दाखवा.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, तो ठराव पहिले वाचून दाखवा.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, परिवहनचे कोण आले आहेत त्यांना बोलवा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवरील निम्मे ६ (सहा) सदस्य माहे फेब्रुवारी २००९ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झाले आहेत. निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी प्रशासनाने नेमकी कोणती पध्दत अवलंबवावी याबाबत नगरविकास विभागाकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते. क्र. मिभामनपा/११०९/२५९/नवि-२८ नगरविकास विभाग दि. २० जानेवारी २०१० नुसार मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ५१७५/२००७ प्रकरणी दि. २५/०७/२००७ रोजी दिलेला निर्णय व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५ मधील तरतुदीकडे लक्ष वेधले आहे.

परिवहन समितीवर पालिका सदस्य म्हणून निवडून आलेल्या सदस्यांमधून काही सदस्य नियुक्त / नेमणूक करावयाचे असतील तरच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) मधील तरतुदी लागु होतील. तथापी महानगरपालिकेने रिक्त पदांकरीता नियुक्तीसाठी पालिका सदस्य म्हणून बाहेरुन सदस्यांची नियुक्ती करावयाचे ठरविल्यास कलम ३१(अ) च्या तरतुदी लागु होणार नाहीत. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन समितीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५(२) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्यिक, वित्तीय किंवा कामगार विषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य नसतील अशा व्यक्तिंमधून परिवहन समितीवर सदस्य नेमणूक करण्यात यावी. सदरची नेमणूक ही गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात यावी. सदरचा ठराव फक्त ह्या वर्षीच्या परिवहन सदस्य नेमणूकीसाठी लागु राहिल व ठरावानुसार परिवहन सदस्य निवडणूकीचा कार्यक्रम तातडीने घ्यावा असा ठराव मांडीत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

३१(अ) तरतुदी लागु होतात. तो ३१(अ) आहे.

**नगरसचिव :-**

तौलानिक पध्दती लागु होणार. त्या काय आहेत?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे महापालिकेचे सन्मा. सदस्य जर घेतले तर तौलानिक पध्दत आणि बाहेरुन घेतले तर?

**नगरसचिव :-**

ते लागू होणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही बाहेरुन जे सदस्य घेणार त्याला तुम्ही कंडीशन ठेवली आहे ना? म्हणजे परिवहनच्या होणाऱ्या सदस्याला त्या समितीच्या बाबतीत अनुभव पाहिजे.

**नगरसचिव :-**

ते ॲक्टमध्येच आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अनुभव म्हणजे काय?

**नगरसचिव :-**

नगरसेवक असेल तर त्याला अनुभवाची गरज नाही. पण नगरसेवका व्यतिरिक्त जर कोणी असेल तर ह्या बाबीचा अनुभव असणे आवश्यक आहे. प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल, अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्य वित्तीय किंवा कामगार विषयक बाबींचा त्यांची क्षमता दिसून आली असेल, ते पालिका सदस्य नसतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा आपण फॉर्म भरणार आहोत. समजा, गुप्त मतदानाने सांगितले त्यावेळी तुम्ही हे सर्टीफिकेट मागणी करणार की नाही?

**नगरसचिव :-**

फॉर्मसोबत घेतले जातील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्विकृत सदस्यांच्या वेळीसुध्दा हीच पध्दत होती. पण आपण घेत नव्हते.

**नगरसचिव :-**

घेतलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नगरसेवक आला तर त्याला......

**नगरसचिव :-**

नगरसेवक असेल तर त्याचे गॅझेट पुरेसे आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, मला असे विचारायचे आहे की, गुप्त मतदान पध्दती जी आहे तर समितींच्या निवडणूकीसाठी लागु होते का? महाराष्ट्र शासनाने गुप्त मतदान पध्दत बंद केलेली आहे. प्रत्येक ठिकाणी आपण आतापर्यंत तौलानिक संख्याबळाचा विचार करतो. तर आत्ता आम्ही ठराव केला तो बरोबर आहे की चुकीचा आहे?

**नगरसचिव :-**

नगरसेवक असेल तर कलम ३१(अ) लागु होतो.

**प्रशांत पालांडे :-**

गुप्त मतदान पध्दतीबद्दल विचारतो. कुठल्याही समित्यांची निवडणूक असेल तर गुप्त मतदान पध्दत बंद केलेली आहे. तौलानिक संख्याबळाचाच आपण विचार करतो. बाहेरचे सदस्य घ्यायचे असतील तरी.

**नगरसचिव :-**

बाहेरचे सदस्य असतील तर नाही.

**प्रशांत पालांडे :-**

आपल्याला बाहेरचे सदस्य घ्यायचे असतील तरी ते तौलानिक संख्याबळाप्रमाणेच घ्यायला पाहिजे का?

**नगरसचिव :-**

नाही.

**प्रशांत पालांडे :-**

कोणत्या नियमाप्रमाणे?

**नगरसचिव :-**

३१(अ) लागु होणार नाही असे म्हंटलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

गुप्त मतदान पध्दत बंद केलेली आहे. इव्हन आपण मा. स्थायी समितीला कुठे गुप्त मतदान पध्दत घेतो?

**नगरसचिव :-**

शासनाचे पत्र आहे, त्याच्यामध्ये नगरसेवक असेल तर कलम ३१(अ) लागु होईल. नगरसेवक नसेल तर कलम ३१(अ) लागु होणार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

कलम २५ प्रमाणे तौलानिक संख्याबळाचा विचार होणार नाही का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, जर सदस्यांमधून आपल्याला परिवहन समितीचे सदस्य निवडायचे असतील तर तौलानिक संख्येच्या बळावर नियुक्ती करता येते. जर बाहेरुन घ्यायचे असेल तर गुप्त मतदान पध्दतीने २५ लागु होतो. त्यामुळे तुम्हाला पहिल्यांदा सदस्यांमधून घेणार की बाहेरुन घेणार? बाहेरुन घेणार असणार तर २५.

**भगवती शर्मा :-**

साहेब, बाहेरुन घ्यायचे असा ठराव केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे त्याप्रमाणे या सभागृहाने निर्णय घ्या. बाहेरुन की, सदस्यांमधून? बाहेरुन घ्यायचे असेल तर २५ लागु होतो आणि सदस्यांमधून घ्यायचे असेल तर ३१(अ) लागु होतो.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, बाहेरुन घ्यायचे की, नगरसेवकांमधून हा अधिकार कोणाचा आहे?

**मा. आयुक्त :-**

सभागृहाचा.

**प्रशांत पालांडे :-**

प्रत्येक पक्षाचे विचार वेगळे आहेत. कोणाला नगरसेवक पाठवायचे असतील आणि कोणाला बाहेरचे. त्याच्यामध्ये आपल्याला काय करता येईल?

**नगरसचिव :-**

सभागृहाने केलेला आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आत्ता कम्प्लसरी बाहेरुन सदस्य घ्यायचे, नगरसेवकांमधून घेणार नाही? बघा आपण पुढे अडचणीत येऊ शकतो.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

सभागृहात बहुमताने ठराव झालेला आहे की, बाहेरचे सदस्य घ्यायचे.

**प्रशांत पालांडे :-**

त्या विषयावर चर्चा करु शकतो की नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आत्ता सचिव साहेब बोलले की, बाहेरचे सदस्य घ्यायचे. पण नगरसेवकांना आम्ही बोललो तर तुम्हाला परिवहनमध्ये पाठवायचे त्याला तुम्ही सांगितले की, सर्टीफिकेटची आवश्यकता, म्हणजे आम्ही नगरसेवकांना पाठवू शकतो, बंधनकारक नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर बाहेरचेच असा निर्णय सन्मा. सभागृहाने घेतला तर २५ प्रमाणेच कार्यवाही होणार. त्यानंतर बदल होणार नाही. सभासदांमधून असेल तर ३१ प्रमाणे ठराव व्हावा लागेल.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, परिवहन समितीवर कोणाला पाठवायचे तर आमच्या पक्षाची पण काही वेगवेगळी धोरणे असतात ना. मग त्यावेळी काय करावे लागेल?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

सन्मा. सभागृहाने बहुमताने निर्णय घेतल्यानंतर तुमच्या......

**प्रशांत पालांडे :-**

आपण एक वर्षासाठी ठेवू शकतो का?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

सभागृहामध्ये पक्षाची धोरणे चालत नाहीत.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, आपण एक वर्षासाठी ठेवू शकतो का?

**नगरसचिव :-**

सन्मा. सभागृहाचा अधिकार आहे. सचिवांना त्याच्यात अधिकार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

त्याच्यामध्ये दुसरी एक तरतुद आहे की, आपण जे बाहेरचे सभासद घेणार आहोत. त्याचें मतदार यादीमध्ये नाव असणे गरजेचे आहे का?

**नगरसचिव :-**

ते आहेच.

**शरद पाटील :-**

आत्ता सहा सदस्यांचे मतदान होईल का?

**नगरसचिव :-**

सहा आणि एक सात.

**शरद पाटील :-**

सातवा बाहेरुन घेणार? स्टॅन्डींग कमिटी?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

प्रकरण क्र. ४४ मंजूर झालेला आहे. प्रकरण क्र. ४५ चे वाचन करा.

**प्रकरण क्र. ४४ :-**

परिवहन समितीवर नगरसेवक किंवा बाहेरुन सदस्य घेणेबाबत धोरण ठरविणे बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवरील निम्मे ६ (सहा) सदस्य माहे फेब्रुवारी २००९ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झाले आहेत. निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी प्रशासनाने नेमकी कोणती पध्दत अवलंबवावी याबाबत नगरविकास विभागाकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते. क्र. मिभामनपा/११०९/२५९/नवि-२८ नगरविकास विभाग दि. २० जानेवारी २०१० नुसार मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ५१७५/२००७ प्रकरणी दि. २५/०७/२००७ रोजी दिलेला निर्णय व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५ मधील तरतुदीकडे लक्ष वेधले आहे.

परिवहन समितीवर पालिका सदस्य म्हणून निवडून आलेल्या सदस्यांमधून काही सदस्य नियुक्त / नेमणूक करावयाचे असतील तरच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) मधील तरतुदी लागु होतील. तथापी महानगरपालिकेने रिक्त पदांकरीता नियुक्तीसाठी पालिका सदस्य म्हणून बाहेरुन सदस्यांची नियुक्ती करावयाचे ठरविल्यास कलम ३१(अ) च्या तरतुदी लागु होणार नाहीत. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन समितीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५(२) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्यिक, वित्तीय किंवा कामगार विषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य नसतील अशा व्यक्तिंमधून परिवहन समितीवर सदस्य नेमणूक करण्यात यावी. सदरची नेमणूक ही गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात यावी. सदरचा ठराव फक्त ह्या वर्षीच्या परिवहन सदस्य नेमणूकीसाठी लागु राहिल व ठरावानुसार परिवहन सदस्य निवडणूकीचा कार्यक्रम तातडीने घ्यावा असा ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४५, राज्य ग्रंथालय परिषदेवर २ सदस्य नामनियुक्त करणे बाबत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

समितीबद्दल जरा माहिती द्या.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ठराव ऐका. नंतर बोला.

**भगवती शर्मा :-**

या प्रकरणा संबधी कोणतीही परिपूर्ण माहिती गोषवाऱ्यामध्ये दिलेली नसून हा विषय ग्रंथलयाशी संबंधीत असल्यामुळे नामनियुक्त सदस्यांची शैक्षणिक पात्रता व त्याची जवाबदारी याबाबती काहीही माहिती देण्यात आलेली नाही. म्हणून प्रकरण क्र.४५ ठराव परिपूर्ण माहिती घेवून पुढील मा. महासभेमध्ये आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्या गोषवाऱ्यामध्ये परिपूर्ण माहिती नाही. त्याचे शिक्षण किती? त्याची तिकडची पोस्ट काय? त्याला मानधन मिळणार की नाही? कसलाही उल्लेख नाही. पुढच्या सभेमध्ये माहिती आणून तो विषय परत आणायचा.

**प्रकरण क्र. ४५ :-**

राज्य ग्रंथालय परिषदेवर २ सदस्य नामनियुक्त करणे बाबत.

**ठराव क्र. ४६ :-**

या प्रकरणा संबधी कोणतीही परिपूर्ण माहिती गोषवाऱ्यामध्ये दिलेली नसून हा विषय ग्रंथलयाशी संबंधीत असल्यामुळे नामनियुक्त सदस्यांची शैक्षणिक पात्रता व त्याची जवाबदारी याबाबती काहीही माहिती देण्यात आलेली नाही. म्हणून प्रकरण क्र.४५ ठराव परिपूर्ण माहिती घेवून पुढील मा. महासभेमध्ये आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६, आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम करिता जागा भूसंपादन करणेबाबत विचार विनिमय करणे.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ''ड'' मधील २(१)(के) अन्वये प्रस्ताव.....

**मा. पिठासीन अधिकारी :-**

श्री. खान साहेब, आपल्याला २(के) खाली घ्यायचा आहे का? तो ठराव आपण नंतर घ्या. तशी मी मंजूरी देतो.

**अनंत पाटील :-**

२२९ सर्व्हे नंबर कोणता आला?

**मिलन पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास योजनेत मौजे - भाईंदर, स.क्र. २२९(७५८), २३०(७५७) या जागेत आ.क्र. ९१ (स्टेडीयम), क्षेत्र १८ हे., ४५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता, पूर्वेकडे रहिवास विभाग, भागशः स्मशानभूमी विस्तारीकरण व आ.क्र. ८९ (स्मशानभूमी विस्तारीकरण), क्षेत्र ०.७७ हे. व उर्वरीत जागा नाविकास विभागात सामाविष्ट होत आहे.

सदरची जागा तात्कालीन नगरपरिषदेने सरकारी जागा समजून जागेची मागणी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दि.०८/०९/१९९३ रोजी केलेली होती. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आदेश क्र. महसूल/कक्ष-१/मेज-१/एलबीपी/विकास आराखडा/२/९४/२१/३-९४ अन्वये मौजे भाईंदर, स.क्र. २२९पै., २३०पै. स्टेडीयम १८.० हे. ही जागा तात्कालीन नगरपरिषदेच्या ताब्यात देण्यात आलेली होती. तथापी, सदरची जागा निश्चितपणे सरकारी नाही, असे मा. जिल्हाधिकार, ठाणे यांचे निदर्शनास आल्याने पत्र क्र. महसूल/कक्ष-१/मेज-१/एलबीपी/ वि.आ./२/९४, दि.१५/०९/९४ व दि.२१/०३/९४ अन्वयेचा आदेश रद्द करुन जमीनीचा ताबा देवू नये, असे आदेश नगरपरिषदेस देणेत आलेले होते.

त्यानंतर, तात्कालीन नगरपरिषद कालावधीपासून तसेच महानगरपालिका स्थापनेपासून सॉल्ट विभाग, मा. जिल्हाधिकारी, ठाणे, मंडळ अधिकारी - ३, विभागाशी संपर्क साधून पत्रव्यवहार करुनही जागेच्या

मालकीबाबत निश्चितपणे बोध होत नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या ताब्यात जागा येण्यास विलंब होत आहे. तसेच सदरची जागा सि.आर.झेड. ने बाधीत होत असल्याने विकसीत करणेपूर्वी मा. शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत साधारणतः ७ ते ८ एकर जमीन महानगरपालिकेच्या ताब्यात असून वापर सुरु आहे. तथापी, जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्याने व सि.आर.झेड. ने बाधीत असल्याने स्टेडीयम विकसीत करणेस अडथळा निर्माण होत आहे.

त्यामुळे जागा मालकीचा संभ्रम पाहता व जागा सि.आर.झेड. ने बाधीत होत असल्याने महानगरपालिकेची तातडीची निकड लक्षात घेता व लोकप्रतिनिधी सर्वसामान्य जनता याची गरज लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने शासनाकडे प्रस्ताव सादर करुन सि.आर.झेड. मंजूरीबाबत व विनामुल्य जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत प्रशासनाने तातडीने मा. शासनाचे प्रस्ताव सादर करणे व विनामुल्य जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे व जागेचा आगाऊ ताबा महानगरपालिकेकडे देणेबाबत प्रस्ताव शासनाकडे सादर करणेकामी किंवा भूसंपादन व कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन आरक्षण क्र. ९१ (स्टेडीयम) ची जागा ताब्यात घेण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आरक्षण क्र. ९१ ही जागा माझ्या माहितीप्रमाणे राई, मुर्धा, मोर्वा या गावातील शिलोत्र्यांची जागा आहे. मग त्यांच्या बाबतीत तुम्ही काय ठरवले आहे?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आपल्या शहरामध्ये आपला एक रुपया न लागता, आपण खर्च न होता, बी.सी.सी.आय. बॉम्बे क्रिकेट असोशिएशन स्टेडीयम बांधण्याचा प्रस्ताव आपल्याकडे ठेवलेला आहे.

**अनंत पाटील :-**

परंतु, तिकडे जी वहिवाटीची जागा आहे. परंपरापासून ज्या शिलोत्र्यांची वहिवाट आहे, त्या शिलोत्र्यांना आपण......

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्या जागेमध्ये ज्या शिलोत्र्यांचा हक्क सिध्द होईल, त्यांना त्यांचे कॉम्पेन्सेशन मिळेल.

**अनंत पाटील :-**

मी हक्क सिध्द म्हणत नाही. आता वहिवाट आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

उद्या मी पण सांगेन माझी वहिवाट आहे.

**अनंत पाटील :-**

रस्ता केला त्यांना आपण पर्यायी जागेची व्यवस्था केली.

**कल्पना म्हात्रे :-**

त्यांचा मालकी हक्क आहे. त्यांच्या संमतीशिवाय तुम्ही काहीच करु शकत नाही.

**अनंत पाटील :-**

जमिनी संदर्भामध्ये जमीन खर्डा नावाचा उतारा आमच्याकडे आहे. सॉल्ट डिपार्टमेंटचा पूर्वीची सातबारा उतारा आहे. जमीन खर्ड्यावर शिलोत्र्यांची नावे आहेत.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

भुसंपादन अधिकारी त्याबाबतीत निर्णय घेतील आणि जर त्यांचा हक्क सिध्द होत असेल, मालकी असो किवा कसा असो तर त्याला महापालिका कॉम्पेन्सेशन देईल.

**अनंत पाटील :-**

ती जागा जरी सॉल्ट डिपार्टमेंटची असेल तरी पूर्वीचा ब्रिटीश काळाचा जो सातबारा उतारा आहे, त्याच्यामध्ये जमीन खर्डा म्हणून चक्क लिहलेले आहे. तिथे शिलात्र्यांची नावे आहेत. तुम्हाला लिस्ट आणून देतो. त्यांना हक्क लागतो की नाही?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मी तेच म्हणतो की, भुसंपादन करताना त्यांचा हक्क जर सिध्द झाला तर त्यांना कॉम्पेन्सेशन मिळेल.

**कल्पना म्हात्रे :-**

त्यासाठी त्यांची सहमती पाहिजे. मा. महासभेपुढे काय धोरण होणार आहे?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

या सभेमध्ये विषय आलेला आहे की, आपल्याला भुसंपादन करायचे आहे. भुसंपादन करताना तो विषय येईल.

**अनंत पाटील :-**

मला एवढेच म्हणायचे आहे की, तुम्ही शिलोत्र्यांना विश्वासात घेतल्याशिवाय याच्यावर कुठलेही करु नका. त्यांना काही तरी बेनिफिट मिळाले पाहिजे.

**कल्पना म्हात्रे :-**

शिलोत्र्यांना विश्वासात घ्या.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मी तेच म्हणतो आहे.

**अनंत पाटील :-**

मग तुम्ही मालकी हक्काचे कागदपत्र मागवा. तुमची अद्यापपर्यंत कोर्टात केसेस चालू आहेत.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

भूसंपादनाचा ठराव केल्याशिवाय त्यांचा हक्क कसा सिध्द होईल. आपल्याला भूसंपादन करायचे आहे. विषय तो आहे. ते सगळे बघावेच लागेल. आज विषय आला म्हणजे उद्या स्टेडीअम होत नाही. त्याच्यात मोठी प्रक्रिया आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

शेवटी तिकडे ते विचारतील ना.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आपल्याला कायदेशीर मार्गाचा अवलंब करायचा आहे. कायदेशीर मार्गामध्ये त्यांचा जो हक्क असेल तो त्यांना मिळणार.

**अनंत पाटील :-**

अडचण असली तरी आमच्या लोकांचे, शिलोत्र्यांचे पझेशन आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

पण भूसंपादन करायला तुम्ही विरोध का करता? तुम्हांला तुमचा हक्क मिळतो आहे.

**अनंत पाटील :-**

पण याच्यामध्ये शिलोत्र्यांचा उल्लेख तरी पाहिजे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आपल्याला कायदेशीर मार्गाने करायचे आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

शिलोत्र्यांना काय हक्क मिळेल याचा उल्लेख व्हायला पाहिजे.

**अनंत पाटील :-**

फक्त सॉल्ट डिपार्टमेंटचा उल्लेख केलेला आहे. गेल्या वेळेला आपण बंदपत्र तयार केले. गेल्या वेळेला दोन-तीन वेळेला ठराव झालेले आहेत.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

श्री. अनंत पाटील, तुम्हांला तिकडच्या लोकांची जेवढी काळजी आहे तेवढी मला पण आहे.

**अनंत पाटील :-**

मग इथे उल्लेख व्हायला पाहिजे ना.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन आपल्याला भूसंपादन करायचे आहे, एवढा एकच शब्द महत्वाचा आहे. ज्यांचा मालकी हक्क असेल आणि कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन त्यांचा हक्क साबीत होत असेल त्यांना महापालिका कॉम्पेन्सेशन देईल.

**अनंत पाटील :-**

आत्ताच्या घडीला सुध्दा ते लोक पझेशनमध्ये आहेत. मग त्यांना विश्वासात घेतल्यानंतर आपण......

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्याचा अर्थच तो आहे.

**अनंत पाटील :-**

तशी सुचना त्याच्यामध्ये घ्या.

**कल्पना म्हात्रे :-**

त्यांना विश्वासात घेणार असा शब्द टाका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आमचे मिठागर ५०-६० वर्षापासून आमच्याकडे आहे. आज सॉल्ट डिपार्टमेंटने आम्हाला नोटीस पाठवलेली आहे की, तुमचा मालकीचा हक्क असेल तर तुम्ही कागदपत्र घेऊन या. आत्ता शंभर वर्षापासून ती..... कायद्यामध्ये मालकी हक्क शिलोत्र्यांचा आहे. आणि त्यांच्याकडे कागदपत्र नाहीत आणि शासनाने कागदपत्र मागितले तर त्यांच्याकडे नाहीत. पण मालकी हक्क त्यांचा आहे. उद्या ते मालकी

सांगतील. आम्ही शंभर वर्षापासून इकडे आहोत. पण कागदपत्र नाहीत. म्हणजे ती जागा सरकार घेणार की नाही? मालकी हक्क त्यांच्याकडे आहे, आत्ता ते राहतात, तिकडे शेती करतात. पण त्यांच्या आजोबापासून त्यांच्याकडे काही कागदपत्रे नाही. आमच्या बरोबर झाले आहे. कारण आमच्याकडे कागदपत्र नाही. आमच्याकडे ताबा आहे. पण आमच्याकडे कागदपत्र नाहीत. तुम्ही गांभिर्य घ्या. त्यांच्याकडे मालकी हक्क आहे.

**मिलन पाटील :-**

त्याच्यात अशी सुधारणा केलेली आहे की, जागा विनामुल्य महापालिकेला हस्तांतरण करावी व जागेचा आगाऊ ताबा महानगरपालिकेकडे देण्यात यावा. शासनाकडे सादर करणेकामी भूसंपादन व कायदेशीर मार्ग अवलंबून त्या ताब्यात घेण्यात यावा.

**कल्पना म्हात्रे :-**

कायदेशीर म्हणजे काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांच्याकडे कागदपत्र नाहीत. फक्त मालकी हक्क आहे.

**अनंत पाटील :-**

त्याच्यामध्ये शिलोत्र्यांची वहिवाट आहे असे लिहा. त्यांना विश्वासात घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. पाटील साहेबांनी पहिले पण सांगितले होते. हा विषय आधी पण आला होता. त्यावेळी पण यांनी सांगितले की, त्या गावकऱ्यांचा तिकडे हक्क आहे.

**अनंत पाटील :-**

गेल्यावेळेला बंधपत्र तयार करायचे पण ठरवले होते.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

प्रकरण क्र. ४६, आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम करिता जागा भूसंपादन करणेबाबत विचार विनिमय करणे ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ४६ :-**

आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम करिता जागा भूसंपादन करणेबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास योजनेत मौजे - भाईंदर, स.क्र. २२९(७५८), २३०(७५७) या जागेत आ.क्र. ९१ (स्टेडीयम), क्षेत्र १८ हे., ४५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता, पूर्वेकडे रहिवास विभाग, भागशः स्मशानभूमी विस्तारीकरण व आ.क्र. ८९ (स्मशानभूमी विस्तारीकरण), क्षेत्र ०.७७ हे. व उर्वरीत जागा नाविकास विभागात सामाविष्ट होत आहे.

सदरची जागा तात्कालीन नगरपरिषदेने सरकारी जागा समजून जागेची मागणी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दि.०८/०९/१९९३ रोजी केलेली होती. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आदेश क्र. महसूल/कक्ष-१/मेज-१/एलबीपी/विकास आराखडा/२/९४/२१/३-९४ अन्वये मौजे भाईंदर, स.क्र. २२९पै., २३०पै. स्टेडीयम १८.० हे. ही जागा तात्कालीन नगरपरिषदेच्या ताब्यात देण्यात आलेली होती. तथापी, सदरची जागा निश्चितपणे सरकारी नाही, असे मा. जिल्हाधिकार, ठाणे यांचे निदर्शनास आल्याने पत्र क्र. महसूल/कक्ष-१/मेज-१/एलबीपी/ वि.आ./२/९४, दि.१५/०९/९४ व दि.२१/०३/९४ अन्वयेचा आदेश रद्द करुन जमीनीचा ताबा देवू नये, असे आदेश नगरपरिषदेस देणेत आलेले होते.

त्यानंतर, तात्कालीन नगरपरिषद कालावधीपासून तसेच महानगरपालिका स्थापनेपासून सॉल्ट विभाग, मा. जिल्हाधिकारी, ठाणे, मंडळ अधिकारी - ३, विभागाशी संपर्क साधून पत्रव्यवहार करुनही जागेच्या मालकीबाबत निश्चितपणे बोध होत नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या ताब्यात जागा येण्यास विलंब होत आहे. तसेच सदरची जागा सि.आर.झेड. ने बाधीत होत असल्याने विकसीत करणेपूर्वी मा. शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत साधारणतः ७ ते ८ एकर जमीन महानगरपालिकेच्या ताब्यात असून वापर सुरु आहे. तथापी, जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्याने व सि.आर.झेड. ने बाधीत असल्याने स्टेडीयम विकसीत करणेस अडथळा निर्माण होत आहे.

त्यामुळे जागा मालकीचा संभ्रम पाहता व जागा सि.आर.झेड. ने बाधीत होत असल्याने महानगरपालिकेची तातडीची निकड लक्षात घेता व लोकप्रतिनिधी सर्वसामान्य जनता याची गरज लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने शासनाकडे प्रस्ताव सादर करुन सि.आर.झेड. मंजूरीबाबत व विनामुल्य जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत प्रशासनाने तातडीने मा. शासनाचे प्रस्ताव सादर करणे व विनामुल्य जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे व जागेचा आगाऊ ताबा महानगरपालिकेकडे देणेबाबत

प्रस्ताव शासनाकडे सादर करणेकामी किंवा भूसंपादन व कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन आरक्षण क्र. ९१ (स्टेडीयम) ची जागा ताब्यात घेण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/युडी-१२, दि.१४/०५/९७ तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेत एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून महानगरपालिकेच्या क्षेत्राची व्याप्ती ७९४०.५६ हेक्टर इतकी आहे.

सदर मंजूर विकास योजनेमधील जागांवर सफाई कामगारांसाठी सेवेत असतांना सेवा निवासस्थाने बांधण्याचा तसेच सेवानिवृत्तीनंतर २५ वर्षे सेवा झाली असल्यास मालकी तत्वावर मोफत सदनिका देणेसाठीच्या गृहयोजनेबाबत शासनाने (पत्र क्र. सकानि-२००७/प्र.क्र.१७६/२००७/नवि-६, दि.२२/१०/२००७ अन्वये निर्देश दिलेले आहेत. शासनाच्या निर्देशाची व नियमावलीची छायाप्रत सोबत सादर.

महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी सेवेत असतांना सेवा निवासस्थाने बांधण्याचा तसेच सेवानिवृत्तीनंतर २५ वर्षे सेवा झाली असल्यास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याबाबत दि.२२/१०/२००८ च्या शासन निर्णयाद्वारे शासनाने निर्णय घेतला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा दि.२०/०२/२००९ चे प्रकरण क्र. ९७ व ठराव क्र. ८९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने विकसकांना जाहीर आव्हान करुन योजनेत सहभागी होणेस सुचित केले आहे. त्यानुसार काही विकासक सदर योजनेत सहभागी होणेस इच्छुक आहेत. त्यानुसार मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एम.एम.आर.डी.ए. च्या रेन्टल हाऊसिंगच्या धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेतील २६९.०० चौ.फुटाचे सदनिका करिता फक्त मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना विकास नियंत्रण नियमावलीत श्रम साफल्य सदनिकाकरिता विकास नियंत्रण नियमावलीत सवलत देणेचे अधिकार राहातील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेत प्राप्त होणाऱ्या मोफत सदनिकेचा उपलब्ध होणारा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय क्षेत्रात वापरता येईल. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्यास परवानगी देण्याबाबतची विनंती शासनास सादर करणेकामी ही महासभा मंजूरी देत आहे.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

ठराव मंजूर.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, २५ वर्षे कोणाला झाली?

**कल्पना म्हात्रे :-**

कोणाला २५ वर्षे झाली त्याची यादी आम्हांला द्या.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

सन्मा. सदस्यांनी शांतता राखावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, ज्या ज्या विकासकाने तुम्हाला इच्छूकपणा दाखवला. त्यांची पण नावे सांगितले तर बरे होईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे कोणकोणत्या कर्मचाऱ्यांना २५ वर्षे झाली आहेत त्यांची लिस्ट आम्हाला द्या आणि कोण इच्छूक आहेत त्यांची पण आम्हाला लिस्ट द्या.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

याच्यामध्ये इच्छूक हा शब्द नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजे कंम्पलसरी सर्वांना द्यायचे आहेत?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विकासक इच्छूक आहेत. विकासकांची नावे सांगा.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, समजा एखाद्याची २५ वर्षे सर्विस झाली. त्याच्या नावावर २० फ्लॅट आहेत, त्यालासुध्दा ही स्किम लागू आहे का?

**मा. आयुक्त :-**

जे सफाईचे काम करतात. ज्यांची २५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा झालेली आहे त्यांच्याकडे रहायला घर नाही अशा लोकांनाच द्यायचे आणि ते नोकरीत असताना दिले तर पगारातून त्याच घरभाडे भत्ता कट होईल. आणि नोकरी संपल्यानंतरसुध्दा ते तिथेच राहतील. परंतु, त्यांच्या वारसाला नोकरी लागेल म्हणजे त्यांना कन्टीन्यु घरभाडे भत्ता मिळणार नाही. मोफत द्यायचे आहे. आणि ज्यांच्याकडे घर नाहीत त्यांनाच. आणि ॲक्च्युअली सफाई कामगार म्हणून नेमणूकीच्या लोकांना देणार नाही. प्रत्यक्षात सफाईचे काम करतात त्यांना देणार आहे.

**मिलन पाटील :-**

आज ते सफाई कामगार शिपाई आहेत, क्लार्क आहेत.

**मा. आयुक्त :-**

म्हणूनच मी बोललो.

**कल्पना म्हात्रे :-**

असे २५ वर्षे झालेले किती लोक आहेत त्यांची लिस्ट द्या.

**मा. आयुक्त :-**

अडीचशे लोक आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, या टिपणीमध्ये लिहलेले आहे की, विकासकांना जाहिर आवाहन करुन.....

**कल्पना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आम्हांला यादी द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेने विकासकांना आवाहन केले आणि काही विकासक इच्छूक आहेत. आपण कोणत्या तारखेला आवाहन केले आहे ती तारीख सांगा आणि कोणाची नावे आली ते सांगा सिरिअस मॅटर आहे. ही मोघम टिपणी दिलेली आहे. एकतर तुम्ही केव्हा आवाहन केले त्याची तारीख आणि ते आवाहन कशाने केलेले आहे? वर्तमानपत्राने केले आहे की पत्र पाठवले आहे? आणि कोण इच्छूक आहेत त्याची यादी द्या.

**मा. आयुक्त :-**

वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तारीख सांगा.

**मा. आयुक्त :-**

आमची तारीख आहे दि. २२/०५/२००९.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोणता पेपर आहे.

**मा. आयुक्त :-**

लोकमत आणि सकाळ.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोण इच्छूक आले?

**मा. आयुक्त :-**

इच्छूक म्हणजे चर्चा करुन गेले. हे मंजूर झाल्यानंतर त्यांचे अर्ज येतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही एक तर सांगा चूक झालेली आहे. आत्ता इच्छूक आले नाहीत, बघू. आणि इच्छूक आले असतील तर नावे सांगा. या टिपणीमध्ये तुम्ही लिहीले आहे की, विकासक सदर योजनेत इच्छूक आहेत. इच्छूकांची नावे सांगा.

**मा. आयुक्त :-**

इच्छूक या शब्दाचे पूर्ण होत नाही. कारण तो अर्ज करायला पाहिजे, आम्ही मंजूरी द्यायला पाहिजे. इच्छूक म्हणजे करण्याची इच्छा व्यक्त करुन गेले. तुम्ही मंजूरी दिल्यानंतर परत प्रसिध्दीकरण करणार आणि त्याचे प्रपोझल मागवणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नावे सांगा.

**मा. आयुक्त :-**

सगळे विकासक येऊन गेले. सगळ्यांची नावे तुम्हाला माहिती आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, जेव्हा तुम्ही लोकमतमध्ये बातमी देता. पैसा खर्च करता, मग इच्छूकांची नावे का सांगत नाही?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

आदरणीय महापौर साहेब, सन्मा. सदस्य आपल्या विनंतीवरुन निवेदन करतो. हा गोषवारा तयार करते वेळेस आणि आपण हे जे जाहिर आवाहन केले होते, त्यावेळेस या शहरातील जे विकासक आहेत त्यांना आपण ही स्किम आणि शासनाचा जी.आर दिला होता. ही स्किम आहे ती २५ वर्षे सेवेत जे सफाई कामगार आहेत आणि जे मयत झाले त्यांच्या वारसांना मोफत घरे द्यायचा आहे. २७० स्क्वेअर फुटाचे. ज्याच्याकडे मिनिमम एक हेक्टर जमिन आहे. ते जे विकासक आहेत, त्याच्यामध्ये आपले सेव्हन इलेव्हनचे मा. महापौर साहेब हे इच्छूक आहेत, सोनम बिल्डर्स आहे. सालासार आहे आणि गुजरात बिल्डर्स आहे या चार लोकांनी दाखवलेल्या आपल्याला जवळ जवळ ७०० सफाई कामगारांची लिस्ट आलेली आहे. जसे रिटायर होतील तसे आपण तयार करणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपल्याकडे टोटल सफाई कामगार किती आहेत? आपल्याकडे ७०० लोकांचे अर्ज आले. आपण १६४१ ठेक्याने सफाई कामगार वापरतो.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

जे नियमात बसतील त्यांनाच मिळेल. त्याच्यामुळे लिस्ट विचारण्याची गरज नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे ७०० सफाई कामगार कुठे आहेत?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्यांनी नाव दिले असेल पण ते नियमात बसत नाही त्याला मिळणार नाही.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, सफाई कामगार म्हणून लागला आहे. पण आत्ता लिपिक किंवा अधिकारी झाला आहे. त्यांना पण तुम्ही देणार?

**मा. आयुक्त :-**

एकूण ८३२ सफाई कामगार आहेत. परंतु, प्रत्यक्षात २५० लोकच सफाईचे काम करतात. म्हणून २५० लोकांचाच विचार करणार आहे. २५० मधील लोकांकडे कोणाकडे घरे असतील, त्यांना देणार नाही.

**मिलन पाटील :-**

त्याची व्याख्या काय आहे? उद्या जर सफाई कामगाराने तुमचे ऑफीस साफ केले तर तो सफाई कामगार होईल का?

**मा. आयुक्त :-**

ऑफीसमधले लॅटरीन आणि युरिनला साफ केले तर तो सफाई कामगार आम्ही धरणार.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, त्यांची यादी जाहिर करा.

**मिलन पाटील :-**

तुमचे ऑफीस साफ केले तर ते होणार नाही ना?

**मा. आयुक्त :-**

होणार नाही. लॅटरीन, युरिनल, गटार, झाडू आणि स्मशानभूमीमधील राख उचलणारा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

विषय क्र. ४७ मंजूर.

**प्रकरण क्र. ४७**

ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याबाबत.

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह शासन निर्णय क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/युडी-१२, दि.१४/०५/९७ तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र.

टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेत एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून महानगरपालिकेच्या क्षेत्राची व्याप्ती ७९४०.५६ हेक्टर इतकी आहे.

सदर मंजूर विकास योजनेमधील जागांवर सफाई कामगारांसाठी सेवेत असतांना सेवा निवासस्थाने बांधण्याचा तसेच सेवानिवृत्तीनंतर २५ वर्षे सेवा झाली असल्यास मालकी तत्वावर मोफत सदनिका देणेसाठीच्या गृहयोजनेबाबत शासनाने (पत्र क्र. सकानि-२००७/प्र.क्र.१७६/२००७/नवि-६, दि.२२/१०/२००७ अन्वये निर्देश दिलेले आहेत. शासनाच्या निर्देशाची व नियमावलीची छायाप्रत सोबत सादर.

महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी सेवेत असतांना सेवा निवासस्थाने बांधण्याचा तसेच सेवानिवृत्तीनंतर २५ वर्षे सेवा झाली असल्यास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याबाबत दि.२२/१०/२००८ च्या शासन निर्णयाद्वारे शासनाने निर्णय घेतला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा दि.२०/०२/२००९ चे प्रकरण क्र. ९७ व ठराव क्र. ८९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने विकसकांना जाहीर आव्हान करुन योजनेत सहभागी होणेस सुचित केले आहे. त्यानुसार काही विकासक सदर योजनेत सहभागी होणेस इच्छुक आहेत. त्यानुसार मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एम.एम.आर.डी.ए. च्या रेन्टल हाऊसिंगच्या धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेतील २६९.०० चौ.फुटाचे सदनिका करिता फक्त मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना विकास नियंत्रण नियमावलीत श्रम साफल्य सदनिकाकरिता विकास नियंत्रण नियमावलीत सवलत देणेचे अधिकार राहातील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेत प्राप्त होणा-या मोफत सदनिकेचा उपलब्ध होणारा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय क्षेत्रात वापरता येईल. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्यास परवानगी देण्याबाबतची विनंती शासनास सादर करणेकामी ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४८, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनी मार्फत देखभाल व दुरूस्ती करण्यात येत असलेले स्ट्रीट लाईट पोल मनपाच्या ताब्यात घेवून खाजगी ठेकेदारास वार्षिक ठेकापद्धतीने देखभाल व दुरूस्तीसाठी देणे व टाटा पावर कंपनीकडून वीज पुरवठा घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**भगवती शर्मा :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत रिलायन्स एनर्जी लि. मार्फत वीजपूरवठा करण्यात येतो. तसेच उपनगरच्या धर्तीवर सार्वजनिक रस्त्यावर महानगरपालिकेच्या शिफारसीवरुन सार्वजनिक रस्त्यावर स्वखर्चाने स्ट्रीट लाईट बसविण्यात येते. रस्त्यावरील केबल्स, स्ट्रीट लाईट पोल देखिल महानगरपालिकेच्या मागणीनुसार स्वखर्चाने स्थलांतरीत करण्यात येतात.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस रिलायन्स एनर्जी लि. यांचे कडील स्ट्रीट लाईट पोल विकत घ्यावयाचे असल्यास स्ट्रीट लाईट पोल व केबलची किंमत तसेच रिलायन्स एनर्जी लि. ची सर्व प्रलंबित देयके तातडीने करावी लागतील महानगरपालिकेची सदर रक्कम भरण्याची आर्थिक स्थिती नाही.

या करीता सर्वप्रथम टाटा पावरकडे महानगरपालिकेमार्फत रिलायन्स एनर्जी लि. यांना स्ट्रीट लाईट पोल व सर्व प्रलंबित देयके भरण्याची तयारी आहे. याबाबत विचारणा करावी तसेच महानगरपालिकेने स्वतःच्या मालमत्ताना टाटा पावर कडून वीजपूरवठा घेतल्यास त्याचा दर काय राहील ? याबाबत सुध्दा माहिती घ्यावी. स्ट्रीट लाईट पोलचे टाटा पावर मार्फत सर्व रक्कम भरुन रिलायन्सच्या धर्तीवर चालविण्यास तयार आहेत का? व स्ट्रीट लाईट पोलवर जाहीरात करण्यास महानगरपालिकेस परवानगी देणार का? याबाबत टाटापावरकडे विचारणा करुन सर्व लेखी माहिती घेऊन सदर प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**लक्ष्मण जंगम :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

प्रकरण क्र. ४८ मंजूर.

**शरद पाटील :-**

यापुढे सचिवांनी ठराव वाचायचा.

**नगरसचिव :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत रिलायन्स एनर्जी लि. मार्फत वीजपूरवठा करण्यात येतो. तसेच उपनगरच्या धर्तीवर सार्वजनिक रस्त्यावर महानगरपालिकेच्या शिफारसीवरुन सार्वजनिक रस्त्यावर स्वखर्चाने स्ट्रीट लाईट बसविण्यात येते. रस्त्यावरील केबल्स, स्ट्रीट लाईट पोल देखिल महानगरपालिकेच्या मागणीनुसार स्वखर्चाने स्थलांतरीत करण्यात येतात.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस रिलायन्स एनर्जी लि. यांचे कडील स्ट्रीट लाईट पोल विकत घ्यावयाचे असल्यास स्ट्रीट लाईट पोल व केबलची किंमत तसेच रिलायन्स एनर्जी लि. ची सर्व प्रलंबित देयके तातडीने करावी लागतील महानगरपालिकेची सदर रक्कम भरण्याची आर्थिक स्थिती नाही.

या करीता सर्वप्रथम टाटा पावरकडे महानगरपालिकेमार्फत रिलायन्स एनर्जी लि. यांना स्ट्रीट लाईट पोल व सर्व प्रलंबित देयके भरण्याची तयारी आहे. याबाबत विचारणा करावी तसेच महानगरपालिकेने स्वतःच्या मालमत्ताना टाटा पावर कडून वीजपूरवठा घेतल्यास त्याचा दर काय राहील ? याबाबत सुध्दा माहिती घ्यावी. स्ट्रीट लाईट पोलचे टाटा पावर मार्फत सर्व रक्कम भरुन रिलायन्सच्या धर्तीवर चालविण्यास तयार आहेत का? व स्ट्रीट लाईट पोलवर जाहीरात करण्यास महानगरपालिकेस परवानगी देणार का? याबाबत टाटापावरकडे विचारणा करुन सर्व लेखी माहिती घेऊन सदर प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

प्रकरण क्र. ४९ चालू करा.

**प्रकरण क्र. ४८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनी मार्फत देखभाल व दुरूस्ती करण्यात येत असलेले स्ट्रीट लाईट पोल मनपाच्या ताब्यात घेवून खाजगी ठेकेदारास वार्षिक ठेकापद्धतीने देखभाल व दुरूस्तीसाठी देणे व टाटा पावर कंपनीकडून वीज पुरवठा घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत रिलायन्स एनर्जी लि. मार्फत वीजपूरवठा करण्यात येतो. तसेच उपनगरच्या धर्तीवर सार्वजनिक रस्त्यावर महानगरपालिकेच्या शिफारसीवरुन सार्वजनिक रस्त्यावर स्वखर्चाने स्ट्रीट लाईट बसविण्यात येते. रस्त्यावरील केबल्स, स्ट्रीट लाईट पोल देखिल महानगरपालिकेच्या मागणीनुसार स्वखर्चाने स्थलांतरीत करण्यात येतात.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस रिलायन्स एनर्जी लि. यांचे कडील स्ट्रीट लाईट पोल विकत घ्यावयाचे असल्यास स्ट्रीट लाईट पोल व केबलची किंमत तसेच रिलायन्स एनर्जी लि. ची सर्व प्रलंबित देयके तातडीने करावी लागतील महानगरपालिकेची सदर रक्कम भरण्याची आर्थिक स्थिती नाही.

या करीता सर्वप्रथम टाटा पावरकडे महानगरपालिकेमार्फत रिलायन्स एनर्जी लि. यांना स्ट्रीट लाईट पोल व सर्व प्रलंबित देयके भरण्याची तयारी आहे. याबाबत विचारणा करावी तसेच महानगरपालिकेने स्वतःच्या मालमत्ताना टाटा पावर कडून वीजपूरवठा घेतल्यास त्याचा दर काय राहील ? याबाबत सुध्दा माहिती घ्यावी. स्ट्रीट लाईट पोलचे टाटा पावर मार्फत सर्व रक्कम भरुन रिलायन्सच्या धर्तीवर चालविण्यास तयार आहेत का? व स्ट्रीट लाईट पोलवर जाहीरात करण्यास महानगरपालिकेस परवानगी देणार का? याबाबत टाटापावरकडे विचारणा करुन सर्व लेखी माहिती घेऊन सदर प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४९, उत्तन येथिल घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानुसार शिफारशींची अंमलबजावणी करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणे.

**राजेंद्र जैन :-**

सदर प्रकल्पाचा खर्च रु. ७ करोड ७ लाख ५८ हजार ५४६ रु. इतका खर्च दाखवलेला असून या प्रकल्पाचा करार हेंजर बायोटेक या कंपनी बरोबर झालेल्या बीओटी च्या करारानुसार ठरले असून उपरोक्त

काम करणे हे त्या हेंजर आयोटेकच्या ठेकेदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे हे काम त्याच्याकडून करुन घ्यावे असा मी ठराव मांडत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**सिसिलीया बावीघर :-**

शासनाने घनकचऱ्याच्या बाबतीत एक कमिटी नियुक्त केलेली होती. त्याचा अहवाल सभागृहामध्ये सादर करावा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आत्ता भिंत बांधण्याचा विषय आहे. आत्ता ठरावात असे सांगितले गेले की, जी जबाबादारी हेंजर बायोटेकची आहे.

**सिसिलीया बावीघर :-**

त्यांची आहे. पण सध्या हे कोर्ट मॅटर आहे आणि लोक या विषयी आंदोलन करीत आहेत आपण ते सुधारणा म्हणून......

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आपण ते चालू केलेले नाही. शासनाच्या निर्देशाप्रमाणे चाललेले आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, कोर्ट मॅटर काही नाही आणि कोर्ट मॅटरमध्ये स्टे नाही. पी.आय.एल. दाखल केले ते तारखांवर तारखा पडतात. यापूर्वी मा. हायकोर्टाने ऑर्डर दिलेली आहे की, प्लान्ट तातडीने पोलीस बंदोबस्तात सुरु करावा. गर्व्हमेंटने ही ऑर्डर दिलेली आहे की, पोलीस बंदोबस्त घेऊन प्लान्ट सुरु करावा. त्यामुळे तसा प्रश्न येत नाही.

**सिसिलीया बावीघर :-**

त्यामुळे चुका होत्या त्यामुळेच लोकांना त्रास झाला ना?

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, आत्ता दोन दिवस झाले कचरा उचलत नाही, त्याचे काय?

**मा. आयुक्त :-**

गर्व्हमेंटने प्लान्टमध्ये चुका काढल्या नाहीत. गर्व्हमेंटने तज्ञ समितीने सराउन्डींगमध्ये सुधारणा सांगितल्या आहेत. प्लान्टमध्ये सुधारणा सांगितल्या नाहीत. उदा. झाडे लावा, कंपाऊंड करा, कंपाऊंडच्या बाहेर नाली काढून ते पाणी घेऊन रिसायकलींग करा. हे प्लान्टमध्ये दोष दाखवलेले नाहीत. त्यामुळे तुमचा मुद्दा इथे उपस्थित होत नाही.

**सिसिलीया बावीघर :-**

मुद्दा उपस्थित कसा होत नाही. जर आपण भिंत बांधली तरी डोंगरामधून खालून जे पाणी खाली जाते ते खालीच जाणार ना?

**मा. आयुक्त :-**

नाही होणार. आपण भिंतच त्या तऱ्हेने घेणार आहोत की, पाणी खाली जाऊ नये.

**सिसिलीया बावीघर :-**

पाणी जमिनीतून मुरेलच ना?

**मा. आयुक्त :-**

जमिनीतून कुठे? तुम्ही बघायला तरी आलात का? तिथे पाषाण आहे.

**सिसिलीया बावीघर :-**

मी बघायला गेलेली दगडातून पाणी जाते.

**मा. आयुक्त :-**

तिथे पाषाण आहे. पाणी खाली जाणार नाही यासाठी तर ही व्यवस्था आहे. आणि कंपाऊंडच्या आतल्या बाजूने आम्ही नाले घेणार आणि पाणी एकत्र येणार.

**सिसिलीया बावीघर :-**

ती जागा ऊंचावर असल्यामुळे पाणी खाली मुरते आणि खालीच जाते.

**मा. आयुक्त :-**

ते तुमच्या मते ठरवा. आम्ही जो प्रस्ताव दिला आहे हा सेंट्रल गर्व्हमेंटच्या आणि स्टेट गर्व्हमेंटच्या तज्ञ लोकांनी हे सल्ले दिले आहेत. त्या सल्ल्याप्रमाणे आम्ही ठेवले आणि त्यांच्या सल्ल्याचा वर तुम्ही तज्ञ असाल तर माझे काही म्हणणे नाही.

**सिसिलीया बावीघर :-**

आम्ही तज्ञ नाही पण त्यांनी आपल्याला जे काही दिलेले आहे ते तुम्ही सादर करा. आम्हांला माहिती द्या.

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, सध्याच्या परिस्थितीत काय करायचे? मा. महापौर, सध्या दोन दिवस कचरा उचलत नाही, त्याचे आत्ता काय करायचे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांनी तुमच्याकडून अहवाल मागितला आहे. तुम्हांला त्यांनी सुचना केली ती मागितल्यावर द्या.

**मा. आयुक्त :-**

ज्या सुचना होत्या त्या सुचना इथे मागून काय उपयोग आहे. विषय कंपाऊंड वॉलचा ठेवला आहे आणि सुचना मागायची असेल तर अजेंडा मिळाला त्यावेळेस कार्यालयात मागायची.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या विषयपत्रिकेवर काय आहे? प्रशासनाने सुचविलेल्या सुचना पूर्ण करण्यासाठी आपण आर्थिक प्रशासकीय मंजूरी......

**मा. आयुक्त :-**

मी त्यांना तेच सांगतो. कंपाऊंड वॉल बांधून, आतून गटार घेऊन पाणी एकत्र घेवून रिसायकलींग करायचे.

(सभागृहात गोंधळ)

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, सध्याच्या परिस्थितीचे काय करायचे? दोन दिवस झाले शहरात कचरा उचलत नाही.

**भगवती शर्मा :-**

साहब, इन्होने एक अच्छा प्रश्न उठाया की, कचरे की अबकी स्थिती क्या है? कही पत्रोंके अंदर मा. महापौर द्वारा ऐसी सुचना आयी थी की, मै कचरा डालने के लिए जगह उपलब्ध कर रहा हू। और शहर मे कचरे से मुक्ती दिलाने का मै प्रयास कर रहा हू। लेकीन यही सेव्हन इलेव्हन हॉटेल प्रायव्हेट लिमिटेडने एक पत्र द्वारा मिरा भाईंदर महानगरपालिका व आरोग्य विभागाचे ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करणे व वाहन जप्त करणेबाबत, ऐसा एक पत्र मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कनकिया पोलीस स्टेशन को लिखा गया है। इसके अंदर आप खुलासा करेंगे? क्योंकी मैने सुना है, आपके उपर भी केस दर्ज करने के लिए कहा गया था। तो यह समस्या सुलझाने का प्रयास किया जा रहा है की, कचरे को एक जगह इकट्ठा रहने के लिए प्रयास किया जा रहा है? जरा इसके बारेमे आप पूर्ण माहिती दिजीए।

**मा. पिठासीन अधिकारी :-**

सचिव साहेब, हे पत्र जरा वाचून दाखवा.

**नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो, सेव्हन इलेव्हन हॉटेल प्रायव्हेट लिमिटेड. प्रति, पोलीस निरीक्षक सो., कनकिया पोलीस स्टेशन स्टेशन, मिरारोड (पूर्व) विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागाचे ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखन करणे व वाहने जप्त करणेबाबात. महोदय, मौजे नवघर कनकिया रोड येथे जुना सर्व्हे नं. २६२, हिस्सा नं. २, जुना सर्व्हे नं. २६४, हिस्सा नं. २, जुना सर्व्हे नं. २६०, हिस्सा नं. २, जुना सर्व्हे नं. २५९, हिस्सा नं. १,३,४, जुना सर्व्हे नं. २५८, जुना सर्व्हे नं. २६७, हिस्सा नं. २,३, जुना सर्व्हे नं. २६५, हिस्सा नं. ६,४,२ व जुना सर्व्हे नं. २६६, हिस्सा नं. १,३ या सदर जागा आमच्या मालकीच्या आहेत. सदर जागेवर आम्ही मिरा भाईंदर महानगरपालिका व इतर कोणासही कचरा टाकण्यास परवानगी दिलेली नाही. त्यामुळे सदर जागेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ठेकेदार जेथे कचरा टाकत आहेत. तरी आपण मिरा भाईंदर महानगरपालिका व त्यांचे ठेकेदार अशी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात यावा व कचरा टाकण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गाड्या जप्त कराव्या.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

श्री. नरेंद्र मेहता यांची सही आहे. निवडणूकीच्या काळामध्ये आपल्या याच मा. महापौरांनी खुप मोठ्या दयाळूपणे महापालिकेला जागा दिली की, माझ्या जागेत तुम्ही कचरा टाका आणि ते असे पत्र देतात. म्हणजे आपले मा. महापौर किती दयाळू आहेत.

**मधुसुदन पुरोहित :-**

मग आत्ता काय करायचे?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आणखीन एक नाटक केले होते तेही तुम्हांला माहिती आहे. आपल्या जागेतला कचरा आणून महापालिकेच्या दरवाज्यात टाकला होता.

**मधुसुदन पुरोहित :-**

प्रशासनाकडून आत्ता उद्या सकाळची परिस्थिती काय आहे?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

कचरा उचलणे चालू आहे.

**मधुसुदन पुरोहित :-**

काही ठिकाणावरुन कचरा उचलतात. काही ठिकाणी उचलत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, आपल्या संपूर्ण नगरसेवकांना, पदाधिका-यांना, संपूर्ण जनतेला महापालिकेची अडचण काय आहे ते माहित आहे. काल एकूण दोन पोलीस स्टेशनवर दोन लोक बसले होते की, महापालिकेच्या अधिका-यांवर आणि गाड्यांवर गुन्हा दाखल करा. म्हणून आम्ही स्लो केले आणि हे सन्मा. सभागृहापुढे सांगणे संयुक्तीक होणार नाही. खाजगी मालक एक ट्रीप कचरा टाकून घ्यायला अनऑफीशिअली ३०० रुपये घेतात. तरी आम्ही गेले ४-५ महिने कचरा टाकतो आणि ठेकेदारांना तुझे तु खर्च कर, आम्ही खर्च करु शकत नाही म्हणून सांगितलेले आहे. दोन गुन्हे दाखल करायला काल बसल्यामुळे आम्ही ते थोडेसे स्लो केलेले आहे. आज रात्रभरात आम्ही उचलू आणि प्लान्ट सुरु करण्याबाबत आम्ही प्रयत्नात आहोत. इथे जे आम्ही कचरा टाकला हे श्री. लक्ष्मण पांडूरंग पाटील, श्री. हेमंत शांताराम पाटील आणि श्रीम. जिजाबाई तुकाराम म्हात्रे यांनी आम्हाला कचरा टाकायला परवानगी दिलेली आहे.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मग मा. महापौरांचा प्रश्न कुठे येतो.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी सातबारा पाठवलेला आहे. त्यांच्या जागेत आम्ही टाकतो.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

आपले माजी नगरसेवक श्री. रतन कृष्णा पाटील पण आहेत.

**मुसरर्तबानो शेख :-**

मा. महापौर साहेब, मिरारोड पश्चिम मे राधास्वामी परिसर मे कचरा डम्प किया जाता है। और वहा पर दिन भर कचरा जलता है। शाम के वक्त कुछ जादा ही आग जलायी जाती है। उस का जो काला धुऑ पुरा दिन उठता है। वह मेरा वॉर्ड उसके ऑपोझीट पडता है। तो वो हवा के रुख से धुए के बादल इस तरफ आते है और मेरे वॉर्ड की सोसायटी उस लाइन मे, जो रेल्वे समांतर एरिया मे जो भी सोसायटी आती है वह बहोत सफर करती है और उनको दमे की शिकायते बढ गयी है। खासी और फेफडेकी तकलीफे, नाक मे जलन और स्कीन डिसीज ऐसे मेरे पास बहोत सारी कम्प्लेंट आ रही है। मै आपसे रिक्वेस्ट करुंगी की, जल्द से जल्द इसका उपाय ढूंढा जाए और पब्लीक को इस तकलीफ से निजाद दी जाए।

**मा. आयुक्त :-**

हमयही सोच रहे है। पोलीस डिपार्टमेंट, मा. महापौर साहब, सब पदाधिकारी सब स्टाफ मिलकर कचरा लेकर जाए, यह सुझाव हम सोच रहे है। सब मिलकर लेकर जाने का है। यही सबकी जिम्मेदारी है/

**मा. पिठासीन अधिकारी :-**

प्रकरण क्र. ५० चालू आहे.

**मा. आयुक्त :-**

प्लान्ट के उपर सब मिलकर जाने का। पिछे रहकर नही करने का। यही सबकी जिम्मेदारी है, सब मिलकर जाऐंगे।

**मा. पिठासीन अधिकारी :-**

तिकडच्या लोकांनासुध्दा विश्वासात घेऊ.

**प्रकरण क्र. ४९ :-**

उत्तन येथिल घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानुसार शिफारशींची अंमलबजावणी करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणे.

**ठराव क्र. ५० :-**

सदर प्रकल्पाचा खर्च रु. ७ करोड ७ लाख ५८ हजार ५४६ रु. इतका खर्च दाखवलेला असून या प्रकल्पाचा करार हेंजर बायोटेक या कंपनी बरोबर झालेल्या बीओटी च्या करारानुसार ठरले असून उपरोक्त काम करणे हे त्या हेंजर आयोटेकच्या ठेकेदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे हे काम त्याच्याकडून करुन घ्यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राजेंद्र जैन** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५०, केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत येणाऱ्या बस मार्गस्थ करणेच्या धोरणाबाबत.

**लक्ष्मण जंगम :-**

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील नागरिकांना परिवहन सेवा उपलब्ध करून देण्याकरिता ५० बस खरेदी करण्याचे प्रयोजन केले आहे व त्या प्रस्तावास केंद्र शासन व राज्य शासन यांनी मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने ५० बस खरेदी (५० चेसीज खरेदी करणे व ५० बस चेसीजवर बॉडी बिल्डींग करणेच्या दोन स्वातंत्र्य कामाकरिता) करण्याच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेने राज्य स्तरीय दैनिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करून संबंधितांकडून देकार मागवण्यात आले होते. प्राप्त झालेल्या देकारांबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मंजुरी करिता ठेवला असता ठराव क्र. ७६, दि. १७/१२/२००९ अन्वये मा. स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. सदर प्रकल्पाकरिता एकूण खर्चाच्या ३५ टक्के व १५ टक्के रक्कम अनुक्रमे केंद्र शासन व राज्य शासन अनुदानाच्या स्वरूपात देणार असून उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेस उभारावयाची आहे. केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत घ्यावयाच्या बस पी.पी.पी. (Public Private Partnership) तत्वावर मार्गस्थ करण्याचे शासनाने निश्चित केले आहे व त्यामुळे प्रकल्पाबाबत महानगरपालिकेवर कोणत्याही स्वरूपाचा आर्थिक भार पडणार नाही. याबाबत महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

प्रकल्पाअंतर्गत घ्यावयाच्या ५० बस पी.पी.पी. तत्वावर मार्गस्थ करावयाच्या प्रस्तावाकरिता तीन पद्धती आहेत. १) ५० टक्के गुंतवणूक, २) ७५ टक्के गुंतवणूक, ३) १०० टक्के गुंतवणूक. याबाबत विस्तृत :- प्रकल्पा करिता येणाऱ्या खर्चापैकी मा. महासभेने मंजुरी दिलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने वरित प्रमाणातील गुंतवणूकीची रक्कम खाजगी संस्थांकडून महानगरपालिकेने उभारावयाची व त्या खाजगी संस्थांनी मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयास अधीन राहून निश्चित केलेल्या दराने महानगरपालिकेस रॉयल्टी द्यावयाची. सदर पी.पी.पी. तत्वावर बस सुरू करणेकरिता चालक, वाहक, तिकिट तपासनीस, कार्यालयीन कर्मचारी, देखभाल - दुरूस्ती, इंधन, वंगण, बस डेपोकरिता जागा व अन्य liability संबंधीत कंत्राटदारावरच राहिल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आर्थिक हित जोपासले जाईल. प्रकल्पात कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांना अदा करावयाचे किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी, वैद्यकिय सुविधा, बोनस, गणवेष इत्यादि बाबतचे दायीत्व कंत्राटदारावर राहिल्याने त्याबाबत भविष्यात उद्‌भवू शकणाऱ्या समस्यांना महानगरपालिकेस सामोरे जावे लागणार नाही. सदर प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर सुरू केल्यास महानगरपालिकेने उभारलेली रक्कम कंत्राटदार गुंतवणूकीच्या माध्यमातुन महानगरपालिकेस देईल व त्यामुळे कोणताही आर्थिक भार न सोसता महानगरपालिकेस “रॉयल्टी” च्या रूपाने उत्पन्न प्राप्त होणार आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत बस खरेदी करण्याच्या प्रकल्पास खालिलप्रमाणे खर्च होणार आहे.....

| **अ.क्र.** | **बसची संख्या** | **प्रकल्पाचा खर्च** | | | | **प्रकल्पाकरिता केंद्र शासनाने अंदाजलेला खर्च** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चेसीज | बॉडी बिल्डींग | एकूण खर्च | ५० बस करिता | |
| १. | ५० | रू. १२,८७,५७६/- प्रती चेसीज | रू. ६,९०,०००/- प्रती बस | रू. १९,७७,५७६/- प्रती बस | रू. ९,८८,७८,८००/- | रू. ११,००,००,०००/- |

प्रकल्पाच्या वरील खर्चाची रक्कम उभारणेबाबत.....

| **अ.क्र.** | **प्रकल्पाचा एकूण खर्च** | **केंद्र शासन अनुदान ३५%** | **राज्य शासन अनुदान १५%** | **मनपास सुरूवातीस उभारावयाची रक्कम ५०%** | **पी.पी.पी. च्या माध्यमातुन उभारावयाची रक्कम (१००% गुंतवणूक)** |
|---|---|---|---|---|---|
| १. | रू. ९,८८,७८,८००/- ५० बस करिता | रू. ३,४६,०७,५८०/- | रू. १,४८,३१,८२०/- | रू. ४,९४,३९,४००/- | रू. ४,९४,३९,४००/- |

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत ५० बस खरेदी करणेकरिता महानगरपालिकेने उभारावयाची रक्कम पी.पी.पी. तत्वावर उभारावयाची असल्याने ती १०० टक्के रक्कम खाजगी संस्थेने गुंतवणूक करून महानगरपालिकेच्या ५० बस परवानगी प्राप्त मार्गावर मार्गस्थ कराव्यात व त्यापोटी महानगरपालिकेस घ्यावयाच्या रॉयल्टीचा दर व पद्धत निश्चित करणेची कार्यवाही मा. आयुक्त सो., व मा. स्थायी समितीने संयुक्तपणे करणेचे अधिकार ही महासभा देत आहे. देकार धारकाने बस पार्किंग करिता (डेपो) स्वतः पुरेशी जागा उपलब्ध करावयाची आहे. तसेच तिकिट दराबाबत मा. महासभेची अनुमती व एकत्रित परिवहन प्राधिकरणाची मंजुरी प्राप्त झालेल्या दरानेच तिकिट विक्री करावी लागेल. तिकिटांची छपाई महानगरपालिकेकडून करून घ्यावी लागेल व त्याच्या खर्चाची रक्कम देकार धारकाने महानगरपालिकेकडे जमा

करावी. मंजुर देकार धारकाने गरजेनुसार तिकिटांची मागणी महानगरपालिकेकडे करावी व तिकिट घेणेच्या वेळी रॉयल्टीची रक्कम महानगरपालिकेकडे अगोदर भरणा करणे आवश्यक राहिल. तसेच जो देकारधारक जास्तीत जास्त दराने रॉयल्टी देईल त्याच्या देकारास मंजुरी देण्यात येईल.

याकामी स्थानिक व राज्य स्तरीय वर्तमानपत्रात तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या वेब साईटवर निविदा सुचना प्रसिद्ध करून इच्छुकांकडून देकार मागवणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही महासभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, शेवटच्या पॅरेग्राफमध्ये रॉयल्टीची किंमत रक्कम घेणेबाबत धोरण ठरवून म्हणजे हा विषय पुन्हा मा. स्थायी समितीमध्ये जाऊन, म्हणजे आता तुम्ही मा. स्थायी समितीला अधिकार दिलेले आहेत. वर्तमानपत्रामध्ये मा. स्थायी समितीमध्ये ठरल्यानंतर जाणार की आत्ताच तुम्ही आर्थिक प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. मा. स्थायी समितीला अधिकार दिला रॉयल्टी ठरवणे, मार्गस्थ ठरवणे, तिकिटाचे दर ठरवणे, म्हणजे आज आर्थिक प्रशासकीय मंजूरी दिल्यानंतर हा प्रस्ताव पुन्हा मा. स्थायी समितीमध्ये जाणार की, डायरेक्ट आर्थिक व प्रशासकीय मंजूरी झालेली आहे. तुम्ही वर्तमानपत्रामध्ये काय देणार?

**मा. आयुक्त :-**

मा. स्थायी समितीपुढे जाणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. स्थायी समितीने ठरवल्यानंतर पुन्हा तुम्ही वर्तमानपत्रामध्ये देणार आहात ना?

**मा. आयुक्त :-**

मुद्दा तुमच्या लक्षात आला नाही की, महापालिकेचे जे चार कोटी.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठरावामध्ये जे वाचले आहे की, रॉयल्टी ठरविणे, तिकिट दर ठरविणे......

**मा. आयुक्त :-**

१५ टक्के रॉयल्टी ठरवलेली आहे. १५ टक्के आगाऊ भरायचे म्हंटलेले आहे. ठरावातच म्हंटलेले आहे की, १५ टक्के आगाऊ भरुन तिकिट घेऊन जायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आत्ता ठराव काय वाचला की, सर्व अधिकार मा. स्थायी समितीला दिलेले आहेत. तुम्ही अधिकार देता. ठरवले कुठे आहे? तुम्ही मा. स्थायी समितीमध्ये घेऊन गेल्यानंतर वर्तमानपत्रात प्रसिध्दी करणार की, आधीच करणार? तुम्ही एका बाजूला ठरावामध्ये मा. स्थायी समितीला अधिकार देता, एका बाजूला आर्थिक प्रशासकीय मंजूरी मागता, विषय काय आहे? सचिव साहेब, ठराव पुन्हा वाचा.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, रॉयल्टीचे दर ठरवून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एकतर तुम्ही या सभागृहामध्ये ठरवले, मा. स्थायी समितीला आणि आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. तुम्ही एका बाजूला अधिकार दिले आणि हा प्रश्न पुन्हा मा. स्थायी समितीमध्ये जाणार एवढाच माझा प्रश्न आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेला केंद्रशासन आणि राज्य शासनाकडून ४ कोटी ९४ लाख ३९ हजार ४०० रुपये अनुदान म्हणून मिळणार आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठरावामध्ये नमुद केले आहे की, मा. स्थायी समितीने ठरवावे. मला तेच विचारायचे आहे की, पुन्हा मा. स्थायी समितीमध्ये जाणार आहे का?

**मा. पिठासीन अधिकारी :-**

त्यांचे ऐकून घ्या.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेला ४,९४,३९,४००/- रुपये अनुदान मिळणार. तर महापालिकेचा जो हिस्सा भरायचा आहे तो त्या ठेकेदाराने भरायचा आहे. त्यांनी महापालिकेचा हिस्सा भरायचा. तीन एकर जमीन दहा वर्षासाठी स्वतःची घ्यायची किंवा भाड्याने घ्यायची, कसेही घेतले तरी आम्हाला चालेल. ह कोण फुलफिल करेल त्याने रॉयल्टी जास्त कोण देईल त्यांना टेंडर मंजूर करणार. टेंडर मागवणार, आर्थिक प्रशासकीय मंजूरी दिली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आर्थिक प्रशासकीय मंजूरी तुम्ही कशाची म्हणता?

**मा. आयुक्त :-**

टेंडर काढायला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही शेवटचा पॅरेग्राफ वाचा. अजून धोरण ठरवलेले नाही. एकतर मा. महासभेने आत्ता दिले की, जास्त रॉयल्टी देणारा. मग, तुम्ही मा. स्थायी समितीला कशाला मधे टाकता? जे चुकीचे ते मी बोलतो.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

याच्यामध्ये चुकीचे काही नाही.हा ठराव मा. स्थायी समितीकडे पाठवायचा आहे. आणि तिकडे आपलेही सदस्य असतील. प्रकरण क्र. ५० ठराव मंजूर.

**मधुसुदन पुरोहित :-**

मा. महापौर, एक महत्वाची सुचना द्यायची आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, ठराव वाचून कायम करा. सचिवांनी हा ठराव वाचायचा आहे. प्रोसीडींगमध्ये नोंद करा.

**मा. पिठासीन अधिकारी :-**

मा. विरोधी पक्षनेत्यांनी ठराव वाचलेला आहे.

**मधुसुदन पुरोहित :-**

माझ्याकडे कुठलाही विषय या विषयपटलावर नाही. फक्त एक महत्वाची सुचना आहे की, आपल्या शहरात ई-टेंडरींग चालू करण्यात येत आहे. त्यामध्ये २ कोटी ३० लाख रुपयाचा मुनाफा त्या ठेकेदाराला मिळणार आहे. त्याबद्दल जरा सविस्तर माहिती पाहिजे तर पाच मिनिटात देऊ शकतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, मला याची सत्यप्रत कधी मिळेल.

**मधुसुदन पुरोहित :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेने आपल्या इकडे ई-टेंडरींग व्यवस्था सुरु करण्यात येणार आहे. त्यासाठी कंपनीला तो ठेका दिलेला आहे. नियमाप्रमाणे तो ठेका वेबसाईटवर देणे गरजेचे आहे. महापालिकेची वेबसाईट आहे आणि कोर्टाचा आदेश आहे की, तुम्ही ई-टेंडरींगसाठी वेबसाईट देणे गरजेचे आहे. त्या कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन केले आहे, ते वेबसाईटवर आले नाही. कारण याच्यावर दोन-चार दिवसात दहा डेमो फ्री दिलेले आहेत आणि ते झाल्यानंतर इमिजिएटली त्याला ठेका सॅंग्शन होईल. त्याबद्दल माहिती असणे आणि देणे हे गरजेचे आहे. मग आपल्या महापालिकेचे दोन-अडीच करोडचे नुकसान होणार आहे, त्याबद्दल मला पाच मिनिटे सुचना देणे गरजेचे होते. कुठल्याही कंपनीला आपण बोलवले असते, याच्यामध्ये कॉम्पीटीशन नावाची कुठलीही वस्तु झालेली नाही. फक्त सात कंपन्या आलेल्या. सातमधून दोन लोकांनी बीडमध्ये पार्टीसिपेशन केलेले आहे. जर आपण महाराष्ट्राच्या कुठल्याही कंपन्यांना बोलावले असते तर फ्री डेमोसाठी दहा-वीस कंपन्या आल्या असत्या. पण अशी परिस्थिती आहे, प्रेस कॉर्पेरेशन म्हणून एक कंपनी आहे. त्यांच्याकडे आपल्या निविदेची बारा पाने गेली आहेत आणि बाकीच्या ज्या सहा कंपन्या आहेत त्यांच्याकडे १९ पानांची निवीदा गेलेली आहे. तर एकाला निविदेची बारा पाने आणि एकाला एकोणीस पाने जातात ते काही कळत नाही. त्यानंतर जेव्हा रजिस्ट्रेशन केले त्यानंतर जेव्हा आम्ही सीएफसी डिपार्टमेंटला विचारले की, याचे ७,६००/- रुपये कसले? खरे म्हणजे फर्स्ट ग्रेड, सेकंड ग्रेड आणि थर्ड ग्रेट अशा तीन डिजीटल सिग्नेचर असतात. साडेसातशे, साडेआठशे आणि नऊशे रुपये. फक्त हा त्याचा स्टॅन्डर्ड रेट आहे. जेव्हा आपण टॅक्सेशनसाठी ग्रेड घेतो तेव्हा ९००/- रुपये लागतात. आमच्या सीएफसी डिपार्टमेंटकडून आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, त्याला कमीत कमी चार हजार रुपये खर्च आहे. मी विचार करतो, चार हजार रुपये खर्च असेल सिक्युरिटी आहे, तो कुठलीही माहिती पाहिजे तर कोणाला देणार नाही. म्हणजे तो सिक्युरिटी ठेवणार. आत्ता परिस्थिती अशी आहे की, एका व्यक्तीला एका रजिस्ट्रेशनला ३,६००/- रुपये मुनाफा कशाला द्यायचा? आणि दुसरी गोष्ट अशी आहे की, प्रत्येक वर्षी तुम्हांला ७,६००/- रुपये देऊन रजिस्ट्रेशन करावे लागेल. याचा अर्थ ७,६००/- डिजीटल सिग्नेचर तोच चालत राहणार. पण तुम्ही ७,६००/- रुपये कंन्टीन्यु देत राहा. म्हणजे अशी परिस्थिती आहे. जर या मिरा भाईंदर शहरामध्ये संपूर्ण ठेके आणि ठेकेदारांची संख्या जर मोजली तर ती मला वाटते एखाद हजार लोक असतील. आणि हा ठेका त्या कंपनीला पाच वर्षासाठी देण्यात येत आहे. जर एक हजार ठेकेदार, चार हजार सहाशे रुपये मुनाफा गुणीले पाच वर्ष केले तर. दोन कोटी तीस लाख रुपये प्रॉफीट त्याला होईल. मग दोन कोटी तीस लाखा कशाला द्यायचे?

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, श्री. मधुसुदन पुरोहित यांनी उपस्थित केलेला विषय अत्यंत महत्वाचा आहे. पण माझी आपल्याला अशी विनंती आहे की, या विषयाला जास्त वेळ लागणार आहे. तर विषयपत्रिका संपल्यावर तो विषय घ्या.

**मधुसुदन पुरोहित :-**

पुढच्या चार दिवसानंतर आपण महापालिकेचे दोन कोटी तीस लाख रुपयांचे नुकसान करु. त्यापेक्षा आत्ता या विषयावर बोलणे अति गरजेचे आहे. कारण सध्या आपल्याकडे आर्थिक परिस्थिती नाही आणि आपण कोणाला तरी फुकट दोन करोड तीस लाख रुपये कमवायला देतो आणि अशा अटी टाकलेल्या आहेत की, त्या ठेकेदाराचे गुजरातला ऑफीस पाहिजे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, हे विषयपत्रिकेवरचे विषय होऊ द्या नंतर त्यांना बोलू द्या.

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, तो ठेका रद्द करण्यात यावा.

**लक्ष्मण जंगम :-**

विषयपत्रिकेवरचे जे महत्वाचे विषय आहेत ते संपवा आणि नंतर बोला.

(सभागृहात गोंधळ)

**सिमा मिश्रा :-**

मा. महापौर साहेबांच्या मान्यतेने बोलले. महापालिकेने ई-टेंडरींगसाठी निविदा काढलेली होती. त्यामध्ये मनपावर काही आर्थिक भार येणार नाही......

**मधुसुदन पुरोहित :-**

आपल्या वेबसाईटवर होती का? कोर्टाचा आदेश आहे.

**सिमा मिश्रा :-**

मा. उच्च न्यायालयाचे आदेश असे आहेत की, आपण आपले ई-टेंडर्स वेबसाईटवर पब्लीश करावे. म्हणून आपण एक स्वतंत्र संकेतस्थळ www.mbmc.abcprocure.com असे घेतलेले आहे. त्याच्यामुळे मनपावर काही आर्थिक भार येणार नाही.

**मधुसुदन पुरोहित :-**

मी ८०० रुपयांची ई-मुद्रांकची डिझीटल घेईन, ते चालेल का?

**सिमा मिश्रा :-**

डिजीटल सिग्नेचर तुम्ही कोणत्याही सर्विस प्रोव्हायडरकडून घेऊ शकता.

**मधुसुदन पुरोहित :-**

उद्या जर कोण ठेकेदार ती प्रोव्हायडरकडून बसून तो तिकडे जर ठेका भरत असेल.....

**मिलन पाटील :-**

मॅडम, आपल्या म्युनिसीपाल्टीच्या वकीलाने सांगितले आहे की, ही वेबसाईड जी आता तुम्ही बोलले ही वेबसाईट सध्या चालु नाही. थोडे दिवस चालू होती, परंतु चालू नाही असे हायकोर्टात दिले आहे.

**मधुसुदन पुरोहित :-**

मॅडम, तुम्ही आपल्या वेबसाईटवर दिलेले नाही. माझ्याकडे प्रुफ आहे. साहेब, आपल्या शहरात हौशी ठेकेदार आहेत. त्या लोकांनी ७,६००/- रुपये रोख रक्कम रुपये भरलेले आहेत. त्या ठेकेदारांना सांगितले की, चेक दिला आणि जर जो चेक बाऊन्स झाला तर तुम्हाला आम्ही इन्व्होलमेंटमध्ये घेणार नाही. म्हणून लोकांनी कॅश भरले. असे हौशी ठेकेदार आहेत. त्यांना फक्त नियम पाहिजे आणि त्याचे पालन करण्यास तयार आहेत. कारण त्यांना असे वाटते की, उद्या मी इन्व्होलमेंट घेतले नाही तर मला ठेका मिळणार नाही आणि परिस्थिती अशी आहे की, त्या ठेकेदाराने ७,६००/- रुपयांची झेरॉक्स रिसीट स्कॅनींग करुन पाठवली आहे. माझ्याकडे आहे दाखवू का? उद्या तो ठेकेदार २५-५० लाख रुपये गोळा करुन पळून गेला तर आपण काय उत्तर देणार? साहेब, ही अॅक्नॉलेजमेंट झेरॉक्स आहे. त्याच्यावर काय भरोसा करणार? आणि कसला हा ठेकेदार, झेरॉक्स पाठवतो आणि अटीशर्ती अशा होत्या की, त्याचे ऑफीस गुजरातमध्ये पाहिजे, हैद्राबादमध्ये पाहिजे. मिरा भाईंदरला काम करायचे आहे की, हैद्राबादला काम करायचे आहे? आणि त्याने तीन हजार करोडचे काम केले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, ई-टेंडरींगचे जे काम आहे ते दहा दिवसापूर्वी पूर्ण झालेले आहे. आपल्या वकीलांना बघायला सांगितले तर माझी हरकत राहणार नाही. आणि वेबसाईट आमच्या खर्चाने चालवत नाही. जो ठेकेदार आणि ई-टेंडरींग करायला अपॉइन्ट केलेला आहे, याला प्रत्येकाचे ९४/- रुपये आम्ही महापालिकेकडून देतो. ठेकेदाराकडून ९४/- रुपये घ्यायचे बंधन त्याच्यावर घातलेले आहे आणि बाकीचा जो खर्च आहे तो त्याचा त्यानेच करायचा आहे. महापालिकेचा काही खर्च नाही.

**मधुसुधन पुरोहित :-**

साहेब, मी वेबसाईट बद्दल बोलत नाही. वेबसाईट मागील पाच वर्षे झाली, चालू झालीच नाही. मुद्दा ई-टेंडरींगचा आहे.

**मा. आयुक्त :-**

कोर्टचा विषय आला की, इथे माझ्या वकिलांना सांगेन. मी त्यांना सांगतो.

**मधुसुधन पुरोहित :-**

त्यांनी विषयाचे विषयांतर केल तर मी काय करू? दोन कोटी तीस लाख रूपये आपले नुकसान होते, त्याची भरपाई करण्याचा विषय मी सांगतो. तुम्ही दोन जणांमध्ये बीड घेतली कशी? नियम सांगतो की, कमीत कमी तीन माणसे पाहिजे. यांनी दोन मध्ये बीड घेतली आणि अटीशर्ती अशा की, यालाच ठेका मिळाला पाहिजे. तीन हजार कोटीची काय गरज आहे?

**मा. आयुक्त :-**

ठाणे महापालिकेचे १५१/- रूपये आहे आणि आपले फक्त ९४/- रूपये आहे. टेंडरची किंमत जर एक हजार रूपये असेल तर आपले ई टेंडरींग करणारा सॉफ्टवेअरवाला आहे तो १०९४/- रू. त्यांच्याकडून घेणार. महापालिकेला काही खर्च नाही. ९४/- रूपये ठेकेदाराकडून घेणार आणि १०००/- रूपये आम्हाला मिळणार.

**मधुसुधन पुरोहित :-**

साहेब, वेबसाईट हा विषय नाही. विषय ई - टेंडरींग आहे.

**मा. आयुक्त :-**

ई - टेंडरींगचेच सांगतो.

**राजेंद्र जैन :-**

श्री. पुरोहित साहब, यह समझमे नही आ रहा है की, दो करोड तीस लाख का घाटा हमको कैसे हो रहा है?

**मधुसुदन पुरोहित :-**

अगर इन्होने टीएसएल से लिया होगा तो चार हजार रूपया खर्चा है। ३६०० रूपये एक्स्ट्रा दे रहे है। ऐसी कौनसी चीज वो करने वाला है जो उसको यह लोग ३६०० रूपया मुनाफा दे रहे है।

**राजेंद्र जैन :-**

यह बता रहे है की, पर बीड ९४ रूपए दिया जा रहा है। दो करोड तीस लाख का खर्चा कैसे आ रहा है, यह मालून नही पडा।

**मधुसुदन पुरोहित :-**

पर बीड की बात नही कर रहा हु। पर ठेकेदार बता रहा हु। आप मल्टीप्लीकेशन देखो, मिरा भाईंदर शहर मे अगर एक हजार ठेकेदार पाच बार पाच साल मे अगर अपना रिन्यु कराते है तो इट कम्स फाईव्ह थाउजंड. पाच हजार ठेकेदार अगर ७६००/- रूपया भरते है तो दो करोड तीस लाख रूपया उसमे से चार हजार रूपया हटा दिया तो दो करोड तीस लाख रूपया वह कमाएगा।

**राजेंद्र जैन :-**

श्री. पुरोहितजी पाच साल तक ई टेंडरिंग भी हो रही है। हमको कुछ सुविधा भी मिल रही है।

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, आमच्या टेंडरची किंमत ॲड करून त्याचे ९४/- रूपये ॲड करून इतके कॉस्ट येणार आहे हे कशाला सांगायला पाहिजे. जी रक्कम ५०,०००/- टेंडरची किंमत आहे, त्यावर ९४/- रूपये ॲड करणार. ९४/- रूपये ते घेणार आणि ५०,०००/- आम्हाला देणार. टेंडरची जी किंमत आहे तीच पण ठेकेदाराला ज्यादा ९४/- रूपये खर्च पडतो.

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, माझा विषय ७६००/- रूपयांचा आहे. ९४/- रूपयांचे काही देणे घेणे नाही. रजिस्ट्रेशन ७६००/- रूपये कसले घेतात? एका ठेकेदाराने दरवर्षी ७६००/- रूपये कशाला द्यायचे? साडेसातशे रूपयाला देतो, उद्यापासुन चालू करा.

**मा. आयुक्त :-**

ती त्याची खाजगी रजिस्ट्रेशन फि आहे. त्याने घरामध्ये बसून टेंडर भरायचे असेल तर ते घ्यावे लागेल. नाहीतर आमच्याकडे येउन टेंडर भरले तरी चालते. ते त्यांच्या मनावर आहे.

**मधूसूदन पुरोहित :-**

साहेब, याच्यावर चर्चा व्हायला पाहिजे. आम्ही एम.एस.ई.बी. चे ठेके भरतो. आम्हाला माहिती आहे, ८३०/- रूपयाला आम्ही डिजीटल सिग्नेचर घेतो. उद्या जर सायबर कॅफेला किंवा माझ्या घरी बसून....

**मा. पिठासिन अधिकारी :-**

मी पिठासीन अधिकारी म्हणून बसलो तरी हा विषय मलाही कळत नाही. तुम्ही या विषयावर मा. आयुक्तांकडे बसा. मा. आयुक्तांच्या ते अजुन लक्षात आलेले नाही आणि सभागृहातील किती नगरसेवकांना हा विषय कळत असेल हे मला माहिती नाही. तुमचा विषय चांगला आहे.

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, हा प्रस्ताव पारित झाला नाही तर फुकटमध्ये या लोकांनी दहा डेमो कशाला घेतले?

**मा. पिठासिन अधिकारी :-**

तुम्ही आजच्या आज मा. आयुक्तांकडे बसा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, मला विषय कळला. त्यांचे म्हणणे असे आहे की, त्या ठेकेदाराकडे सर्व ठेकेदारांनी रजिस्ट्रेशन करायला ७००० फि कशाला घेतात? जर त्या ठेकेदाराला मिरा भाईंदर महापालिकेचे टेंडर घ्यायचे असेल आणि त्यांना जर वेबसाईटवरून टेंडर भरायचे असेल, टेंडरची कॉपी वेबसाईटवरून घ्यायची असेल आणि घरात बसून टेंडर भरायचे असेल, त्याचे रजिस्ट्रेशन फि आहे. ते तुम्ही ॲक्सेप्ट करून भरू नका. डायरेक्ट आमच्याकडून टेंडर फॉर्म घ्या. एक हजार टेंडरची कॉस्ट भरा आणि तुम्ही आमच्याकडे येउन डब्यात टेंडर टाका. ते कम्प्युटरवर करायचे असेल, आम्हाला मा. हायकोर्टाने असे सांगितले आहे की, एक स्टेट लेव्हलच्या पेपरला, एक स्थानिक पेपरला आणि वेबसाईटवर द्यायला सांगितले. त्या आदेशाप्रमाणे आम्ही दहा दिवसापासुन सुरू केलेले आहे. ज्या ठेकेदाराला रजिस्ट्रेशन करून कायम स्वरूपाचे वेबसाईटवरूनच टेंडर भरायचे असेल, तर ठेकेदाराची रजिस्ट्रेशनची कॉस्ट आमच्यावर पडते हे सांगायचे कशाला?

**मधूसूदन पुरोहित :-**

साहेब, मी क्लेरिफिकेशन करतो. एखादा माणूस शिक्षीत नाही. तो तुमच्याकडून मॅन्युअल फॉर्म घेउन जाईल. तो फॉर्म भरेल आणि दुसरा शिक्षित ठेकेदार सायबर कॅफेवरून नंबरींग मारत राहील. मग या व्यक्तीने तुमच्या समोर बसून राहयचे का? असे कसे होणार? एक माणूस मॅन्युअली करणार, एक माणूस ई टेंडरींगने करणार, दोन्ही कसे करणार? आपण जेव्हा नोटीस काढतो त्याच्यात लिहिलेले आहे की, आपण ई पद्धतीने काम करणार आहे.

**राजेंद्र जैन :-**

श्री. पुरोहित साहब, आपने दो करोड तीस लाख बोला, यह एक हजार ठेकेदार के लिए बोला। लेकीन एक ठेकेदार साल मे बीस बार मी भर सकता है, फिर भी फिज उतनी ही रहेगी।

**मधूसूदन पुरोहित :-**

सर, आप मेरा मुद्दा नही समझ रहे है की, हमने चार हजार रूपया जिसको ठेका दिया है उसको क्यो देना? मेरा ई टेंडरींग का कोई विरोध नही है। बहोत बढीया है। महापालिका का भ्रष्टाचार बहोत कम होगा। मेरा बोलने का मुद्दा यह है की, सारे लोगो को मार के एक को तीन करोड कमाने क्यो दे रहे है?

**मा. आयुक्त :-**

केबीनमध्ये बसून सगळ्यांना बसवतो, चर्चा करू. तुमचे पटले तर मा. स्थायी समितीपुढे किंवा मा. महासभेपुढे आणू.

**मधूसूदन पुरोहित :-**

साहेब, याच्यापुढे जोपर्यंत कुठलाही निर्णय होत नाही, ई टेंडरींग नाही व्हायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ई-टेंडरींग चालू राहिल आणि मा. महासभेला आणि मा. स्थायी समितीला हे चालले हे बरोबर वाटले नाही, त्या क्षणाला थांबवू. हायकोर्टाची ऑर्डर आहे, चालू राहणार.

**मधूसुदन पुरोहित :-**

साहेब, तोपर्यंत हजार लोकांनी रजिस्ट्रेशन केले...

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांचे जे म्हणणे आहे ते आणि आपल्या समजण्यामध्ये विसंगती आहे. पहिले एक गोष्ट अशी क्लीअर करा की, आपली रेग्युलर वेबसाईट चालू आहे का? नाही. त्या बोलल्या दुसरी वेबसाईट चालू केली.

**चंद्रकांत मोदी :-**

गये मिटींग मे मॅडम ने बोला था की, वेबसाईट बंद है।

**सिमा मिश्रा :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. ई टेंडरींग साठी आपण स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण करून घेतलेले आहे. त्याची लिंक आपल्या मुख्य वेबसाईटला लिंक करून तुम्ही ई टेंडरींगवर क्लीक केले तर त्या लिंकवर तुम्ही जाउ शकता.

**प्रफुल्ल पाटील :-**

कोर्टाचे आदेश आहेत की, तुमची वेबसाईट करा. वेबसाईटवर तुम्ही टेंडरींग करा. ई टेंडरीग कसे झाले? आत्ता तुम्ही इनडायरेक्टली गेलात. ठिक आहे. तुम्ही समजा इनडायरेक्टली गेलात, तर तुम्ही ई टेंडरीग करायचे कोणाला कॉन्ट्रॅक्ट दिले. आहे का? तो किती पैसे घेतो?

**मधुसुदन पुरोहित :-**

सात हजार सहाशे रूपये.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग आपल्याला किती भरतो?

**मा. आयुक्त :-**

आपल्याला टेंडरची किंमत, जी आम्ही ठरवू ती एक फॉर्म फी, जी आपली ठरवू ती आणि त्यावर ९४/- रूपये.

**मधुसुदन पुरोहित :-**

वरचे तो कमवतो.

**मा. आयुक्त :-**

तो चौऱ्याण्णव रूपये घेणार आणि एक हजार रूपये आम्हाला देणार.

**मधुसुदन पुरोहित :-**

मग ६,६००/- रूपये तो कमवतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

तो त्याच्यामध्ये ६,६००/- रू. कमवतो.

**मा. आयुक्त :-**

साहेब, आपल्याकडे आर्कीटेक्टचे रजिस्ट्रेशन असते आम्ही जर रजिस्ट्रेशन फि वाढवली, तर कंटीन्यु गावातील काम घेणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पण ती रजिस्ट्रेशन फि आम्हाला मिळत नाही.

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, ती महापालिकेला मिळत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

६,६००/- रूपये तो कमवतो आणि आम्हाला फक्त एक हजार रूपये मिळतात.

**मा. आयुक्त :-**

आम्हाला टेंडरची किंमत मिळणार. आणि त्या ठेकेदाराला चौऱ्याण्णव रूपये मिळणार. परंतु कायम स्वरूपाचे टेंडर भरण्याची रजिस्ट्रेशन फि त्यांच्याकडे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कायम स्वरूपाची फी लावली, मग ती महानगरपालिकेला मिळाली पाहिजे. मग ती टेंडर काढणाऱ्याला कशी काय? ती सिस्टम कोणाची आहे? ४० हजार त्याचे लोडींग कले आहे?

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, भाईंदरमध्ये सिस्टम ऑपरेशन आहे. भाईंदरला तेच सिस्टम, तेच सॉफ्टवेअर आणून देतो. आणि त्याच्या अर्ध्या किंमतीत देतो. दरवर्षी या रिसिप्टवर पिरिएड लिहिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

दरवर्षी आहे का वन टाईम आहे.

**सिमा मिश्रा :-**

दरवर्षी आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

दरवर्षी कसे काय? कोण भरणार?

**मधुसुदन पुरोहित :-**

त्यांनी पिरिएड लिहिला आहे, फेब्रुवारी २०१० ते फेब्रुवारी २०११. याला ते पण लिहिता येत नाही तो फेब्रुवारी २०१० ते फेब्रुवारी २०११ लिहितो आणि स्कॅन करून देतो. बारा महिने कसे होतात?

**सिमा मिश्रा :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. ई टेंडरींग जेएनएनयुआरएम तहत महापालिकेला अनिवार्य आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहेत.

**मुधुसुदन पुरोहित :-**

मॅडम तुम्ही महापालिकेचा फायदा करता की तोटा करता तेवढे सांगा. तुम्ही त्याला ४००० रूपये कशाला कमवायला देता? तुम्ही त्याला त्याचे मेन्टेनेन्स चार्जेस द्या आणि तो त्याचा वन टाईम इनव्हेस्टमेंट आहे आणि ऑलरेडी तो शंभर एक कंपन्यांची कामे करतो. त्याच ऑपरेशन मध्ये आपले काम करणार आहे आणि तो या शहराची वाट लावणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही स्वतःची सिस्टम का लावत नाही? आत्ता तुम्ही एवढा मोठा डी.पी.आर. पाठवला मग त्याच्यात तुम्ही स्वतःची सिस्टम का इंट्रोड्युस करत नाही? व्हाय अदर पिपल वॉन्ट टू कम इन इनटरफेस इन युअर ई बिझनेस?

**मधुसुदन पुरोहित :-**

दोन पैसे मिळावे हा यांचा उद्देश आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा ई बिझनेस आहे.

**पिठासिन अधिकारी :-**

सन्मा. नगरसेवक पुरोहित साहेब, आपण गटनेत्यांची मिटींग बोलवून त्या ठेकेदाराला बोलवून घेउ आणि......

**मधुसुदन पुरोहित :-**

वो चिज ७५० रू. मे मिलती है। फिर वही बात कर रहे है।

**मा. आयुक्त :-**

महापालिकेचे नुकसान होणार.

**शशिकांत भोईर :-**

अगर फायदे का बात है तो महापालिकेने ही शुरू करना चाहिए।

**मधुसुदन पुरोहित :-**

हम उसको इतना ढाई करोड रू. क्यो कमाने के लिए दे रहे है। महापालिका क्यो नही कमा रही है। जो सिस्टम १० लाख रूपये मे आता है तो हम सामने वाले को ढाई करोड रूपया क्यो दे रहे है।

**पिठासिन अधिकारी :-**

सन्मा. सदस्य पुरोहित जी गटनेत्यांची जेवढ्या लवकर मिटींग ठेवता येईल ती ठेवू.

**मधुसुदन पुरोहित :-**

माझ एक मत आहे. ह्याच्यापुढे ई-टेंडरींग करून देउ नका. १२४ ठेकेदाराने रजिस्टर केले. १२४ X ७६०० रू. उद्या जर आपण बोललो की हा प्रस्ताव पारित नाही करायचा. १२४ ठेकेदाराने रजिस्ट्रेशन केलेले आहे. ७६०० X १२४ तुम्ही देणार का?

**पिठासिन अधिकारी :-**

तुम्ही आता विषय आज आलेला आहे ना.

**मधुसुदन पुरोहित :-**

कोणी आणला?

**पिठासिन अधिकारी :-**

तुम्ही आता बोललात ना.

**मधुसुदन पुरोहित :-**

त्यांनी ऑपरेट कशाला केल?

**पिठासिन अधिकारी :-**

तुम्ही आता बोललात तर आम्हाला माहित पडत ना.

**मधुसुदन पुरोहित :-**

मग त्याची माहिती सर्वांनी घ्यायला पाहिजे ना.

**पिठासिन अधिकारी :-**

तुम्ही चांगली माहिती दिली. प्रॉब्लेम काही नाही. पण गटनेत्यांच्या मिटींगमध्ये...

**मधुसुदन पुरोहित :-**

साहेब, याला जर स्थगिती आणली आणि फिगर २०० झाल तर डायरेक्टली दिड लाख रू. कोण देणार?

**पिठासिन अधिकारी :-**

तुम्हाला सांगतो की, गटनेत्यांच्या मिटींगमध्ये या विषयावर चर्चा करायची. कुठेतरी मार्ग काढायचा की नाही. मार्ग काढायला तुम्हाला बसायलाच लागणार आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेबांनी अस सांगितल आहे की, गटनेत्यांची मिटींग बोलवा त्यामध्ये चर्चा करा आणि ते चुकीच वाटल तर रद्द करायला पाठवा त्यांचे पैसे परत करा.

**पिठासिन अधिकारी :-**

सचिव साहेब, पुढचा विषय घ्या.

**शशिकांत भोईर :-**

पिठासिन अधिकारी साहेब, यालाच अनुसरून तुम्हाला एक गोष्ट सांगतो, सुवर्ण जयंती रोजगार योजना आहे. त्याच्यामध्ये संगणक प्रशिक्षण घेतात. ड्रॉईंगचे प्रशिक्षण घेतात. त्याच पण रजिस्ट्रेशनचे १०० रू. घेतात. महापालिका जर मोफत प्रशिक्षण देत असेल. मग ट्रेनिंग स्कुल मध्ये किंवा प्रशिक्षण देतात संगणक चालवायला देतात. मग तुम्ही १०० रू. रजिस्ट्रेशन फि का घेतात. महापालिका उलट त्यांना १०० रू. द्यायला

लावतात. पालिका मोफत प्रशिक्षण देते. आणि १०० रू. त्यांना कमवायला देतात. तर याचा मेन कोण आहे? आणि त्याला कोणी अधिकार दिला की १०० रू. घ्यायचे आहे. महापालिका पाठवतात ना.

**मधुसुदन पुरोहित :-**

त्या विभागाच्या अधिका-याची कधी ही भेटा मिस्टर संख्ये बजेट संपला खर्च संपला.

**शशिकांत भोईर :-**

कोणतही असु द्या ड्रॉईंगच पण असुद्या तरीपण १०० रू. हे का घेतात? जर महापालिका, पालिकेचे सदस्य ही मोठ्या आनंदाने सर्वांना लेटर देतात आणि १०० रू. त्यांनी कमावायचे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, त्या मुलांच ड्रायव्हींगच, टेलरींगच प्रशिक्षण झाल्यानंतर त्यांनाच उलट आपल्या महानगरपालिकेने ३०० रू. द्यायचे आहे. तर त्यांच्या कडूनच १०० रू. कसे काय घ्यायचे?

**पिठासिन अधिकारी :-**

हे विषय संपल्यानंतर ह्याच्यावर चर्चा करू.

**प्रकरण क्र. ५० :-**

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत येणा-या बस मार्गस्थ करणेच्या धोरणाबाबत.

**ठराव क्र. ५१ :-**

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील नागरिकांना परिवहन सेवा उपलब्ध करून देण्याकरिता ५० बस खरेदी करण्याचे प्रयोजन केले आहे व त्या प्रस्तावास केंद्र शासन व राज्य शासन यांनी मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने ५० बस खरेदी (५० चेसीज खरेदी करणे व ५० बस चेसीजवर बॉडी बिल्डींग करणेच्या दोन स्वातंत्र्य कामाकरिता) करण्याच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेने राज्य स्तरीय दैनिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करून संबंधितांकडून देकार मागवण्यात आले होते. प्राप्त झालेल्या देकारांबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मंजुरी करिता ठेवला असता ठराव क्र. ७६, दि. १७/१२/२००९ अन्वये मा. स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. सदर प्रकल्पाकरिता एकूण खर्चाच्या ३५ टक्के व १५ टक्के रक्कम अनुक्रमे केंद्र शासन व राज्य शासन अनुदानाच्या स्वरूपात देणार असून उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेस उभारावयाची आहे. केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत घ्यावयाच्या बस पी.पी.पी. (Public Private Partnership) तत्वावर मार्गस्थ करण्याचे शासनाने निश्चित केले आहे व त्यामुळे प्रकल्पाबाबत महानगरपालिकेवर कोणत्याही स्वरूपाचा आर्थिक भार पडणार नाही. याबाबत महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

प्रकल्पाअंतर्गत घ्यावयाच्या ५० बस पी.पी.पी. तत्वावर मार्गस्थ करावयाच्या प्रस्तावाकरिता तीन पद्धती आहेत. १) ५० टक्के गुंतवणूक, २) ७५ टक्के गुंतवणूक, ३) १०० टक्के गुंतवणूक. याबाबत विस्तृत :- प्रकल्पा करिता येणा-या खर्चापैकी मा. महासभेने मंजुरी दिलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने वरित प्रमाणातील गुंतवणूकीची रक्कम खाजगी संस्थांकडून महानगरपालिकेने उभारावयाची व त्या खाजगी संस्थांनी मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयास अधीन राहून निश्चित केलेल्या दराने महानगरपालिकेस रॉयल्टी द्यावयाची. सदर पी.पी.पी. तत्वावर बस सुरू करणेकरिता चालक, वाहक, तिकिट तपासनीस, कार्यालयीन कर्मचारी, देखभाल - दुरूस्ती, इंधन, वंगण, बस डेपोकरिता जागा व अन्य liability संबंधीत कंत्राटदारावरच राहिल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आर्थिक हित जोपासले जाईल. प्रकल्पात कार्यरत असणा-या सर्व कर्मचारी/अधिकारी यांना अदा करावयाचे किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी, वैद्यकिय सुविधा, बोनस, गणवेष इत्यादि बाबतचे दायीत्व कंत्राटदारावर राहिल्याने त्याबाबत भविष्यात उद्‌भवू शकणा-या समस्यांना महानगरपालिकेस सामोरे जावे लागणार नाही. सदर प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर सुरू केल्यास महानगरपालिकेने उभारलेली रक्कम कंत्राटदार गुंतवणूकीच्या माध्यमातुन महानगरपालिकेस देईल व त्यामुळे कोणताही आर्थिक भार न सोसता महानगरपालिकेस “रॉयल्टी” च्या रूपाने उत्पन्न प्राप्त होणार आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत बस खरेदी करण्याच्या प्रकल्पास खालिलप्रमाणे खर्च होणार आहे.....

| अ.क्र. | बसची संख्या | प्रकल्पाचा खर्च | | | | प्रकल्पाकरिता केंद्र शासनाने अंदाजलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चेसीज | बॉडी बिल्डींग | एकूण खर्च | ५० बस करिता | |
| १. | ५० | रू. १२,८७,५७६/- प्रती चेसीज | रू. ६,९०,०००/- प्रती बस | रू. १९,७७,५७६/- प्रती बस | रू. ९,८८,७८,८००/- | रू. ११,००,००,०००/- |

प्रकल्पाच्या वरील खर्चाची रक्कम उभारणेबाबत.....

| अ.क्र. | प्रकल्पाचा एकूण खर्च | केंद्र शासन अनुदान ३५% | राज्य शासन अनुदान १५% | मनपास सुरूवातीस उभारावयाची रक्कम ५०% | पी.पी.पी. च्या माध्यमातुन उभारावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | (१००% गुंतवणूक) |
| १. | रू. ९,८८,७८,८००/- ५० बस करिता | रू. ३,४६,०७,५८०/- | रू. १,४८,३१,८२०/- | रू. ४,९४,३९,४००/- | रू. ४,९४,३९,४००/- |

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत ५० बस खरेदी करणेकरिता महानगरपालिकेने उभारावयाची रक्कम पी.पी.पी. तत्वावर उभारावयाची असल्याने ती १०० टक्के रक्कम खाजगी संस्थेने गुंतवणूक करून महानगरपालिकेच्या ५० बस परवानगी प्राप्त मार्गावर मार्गस्थ करावयात व त्यापोटी महानगरपालिकेस घ्यावयाच्या रॉयल्टीचा दर व पद्धत निश्चित करणेची कार्यवाही मा. आयुक्त सो., व मा. स्थायी समितीने संयुक्तपणे करणेचे अधिकार ही महासभा देत आहे. देकार धारकाने बस पार्किंग करिता (डेपो) स्वतः पुरेशी जागा उपलब्ध करावयाची आहे. तसेच तिकिट दराबाबत मा. महासभेची अनुमती व एकत्रित परिवहन प्राधिकरणाची मंजुरी प्राप्त झालेल्या दरानेच तिकिट विक्री करावी लागेल. तिकिटांची छपाई महानगरपालिकेकडून करून घ्यावी लागेल व त्याच्या खर्चाची रक्कम देकार धारकाने महानगरपालिकेकडे जमा करावी. मंजुर देकार धारकाने गरजेनुसार तिकिटांची मागणी महानगरपालिकेकडे करावी व तिकिट घेणेच्या वेळी रॉयल्टीची रक्कम महानगरपालिकेकडे अगोदर भरणा करणे आवश्यक राहिल. तसेच जो देकारधारक जास्तीत जास्त दराने रॉयल्टी देईल त्याच्या देकारास मंजुरी देण्यात येईल.

याकामी स्थानिक व राज्य स्तरीय वर्तमानपत्रात तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या वेब साईटवर निविदा सुचना प्रसिद्ध करून इच्छुकांकडून देकार मागवणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही महासभा मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. लक्ष्मण जंगम** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५१, मिरा रोड येथिल रूग्णालय इमारतीत रक्तपेढी चालविण्यासाठी अशासकिय संस्थांना चालविण्यास देण्याकरिता विचार विनिमय होणेबाबत.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये रूग्णालयाची इमारत बांधून तयार झालेली आहे. सदर इमारतीत तळमजल्यावर रक्तपेढी सुरू करणे प्रस्तावित आहे. रक्तपेढीतील अंतर्गत बांधकाम जवळपास पूर्ण झालेले आहे. तसेच रक्तपेढी चालविण्यासाठी आवश्यक 1. Central Drugs Standard Control Organization Govt. of India 2. State Blood Transfusión Council Govt. of Maharashtra यांची परवानगी घेण्यात आलेली आहे.

सदर रक्तपेढी रूग्णालयाच्या सोबत चालू करणे गरजेचे आहे. ही रक्तपेढी अनुभवी अशासकीय संस्थेस योग्य त्या अटीशर्तीनुसार चालविण्यास दिल्यास आर्थिक बचत होईल. तसेच त्यांच्या अनुभवाचा फायदा महापालिकेस होईल.

तरी अशासकीय संस्थेस रक्तपेढी सुरू करणेकरिता आवश्यक जागा, अखंडीत विज जोडणी, पाणी जोडणी, दुरध्वनी जोडणी, फर्निचर (टेबल, खुर्ची, रॅक्स), वातानुकुलन यंत्रे, उपकरणे व साहित्य, संगणक सुवीधा महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात याव्यात तसेच विज, दुरध्वनी यांचे मासिक देयक, द्रावणे तपासणी किट्स इतर आवश्यक सर्व साहित्य व परवाने मंजूरी अशासकीय संस्थेने पुरवठा करून रक्तपेढी सुरू करावी व त्यासाठी रक्ताचा कमीत कमी दर देणाऱ्या अशासकीय संस्थेस रक्तपेढी चालविण्याची जाहिर निविदा राज्यस्तरिय, जिल्हास्तरिय जास्त खप असणाऱ्या दैनिकात प्रसिध्दी कराव्यात. तसेच महानगरपालिकेच्या दाखल रूग्णांना रक्तपेढीनी मोफत रक्त पुरवठा करण्यात यावा व इतर महानगरपालिका हद्दीतील रूग्णांना कमीत कमी दरात रक्त पुरवठा करावा याबाबत ठराव मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यापुर्वी याच्यासाठी निविदा निघाली होती का?

**पिठासिन अधिकारी :-**

यापुर्वी नाही आताच लवकर बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

निघाली आहे. हे खाजगी संस्थेला देण्यासाठी वर्तमान पत्रामध्ये २००० पुर्वी याची निविदा निघाली होती. आणि प्रस्ताव आज येतो. पण जी गोष्ट सहा महिन्यापुर्वी वर्तमान पत्रामध्ये आली.

**पिठासिन अधिकारी :-**

तुम्हाला काय सांगायच ते सांगा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

डॉक्टरांना विचारा ६ महिन्यापुर्वी जाहिरात निघाली होती. सार्वजनिक बांधकाम ने ती जाहिरात काढली होती. काम कोणाचे आहे?

**डॉ. चकोर :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो दि. २५/०५/२००९ रोजी आपण अशाच निविदा मागवल्या होत्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

निविदा कोणी काढली होती? कुठल्या डिपार्टमेंट नी काढली होती?

**डॉ. चकोर :-**

सार्वजनिक संस्थेकडून निविदा मागवल्या होत्या. त्यामध्ये सबरबन ब्लड बँक आणि सरला ब्लड बँक दोन ह्याच्याकडून प्रस्ताव आले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता तुम्ही ह्या ठरावामध्ये काय मागतात.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, ते गोषवारा म्हणतात. गोषवाऱ्यामध्ये काय लिहिल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापालिकेने चालवावी अथवा अशासकिय संस्थेची चालवावी. या बाबत चर्चा.

**मा. आयुक्त :-**

हे चालवायला कोण सामाजीक संस्था पुढे येतात का ते पाहिल. कारण आपण दवाखाना चालवत असताना मशिनरी खरेदी करणे, स्टाफ लावणे यापेक्षा मशिनरी सह कोण येत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे तुम्हाला प्रस्तावच नाही की शासकिय ला द्यायच की महानगरपालिकेला? आधीच तुम्ही टेंडर काढून टाकल.

**मा. आयुक्त :-**

टेडर नाही काढल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

निविदा काढली.

**मा. आयुक्त :-**

कुठली सामाजिक संस्था करायला तयार आहेत का ते विचारल?

**स्नेहा पांडे :-**

तो फिर यहापर प्रस्ताव लाना चाहिए ना। प्रस्ताव ही नही है।

**मा. आयुक्त :-**

कोणत्या पद्धतीने मशिनरी बसवून पुरवायला तयार किंवा मशिनरी शिवाय सगळ तुम्ही करून द्यायच म्हणून आहे. फक्त आपल काय आहे महापालिकेने इमारत, लाईट, पाणी आम्ही देणार. बाकीची मशिनरी त्यांनी स्टाफ बसवायची. त्यांनी नेमायच आणि महानगरपालिकेला काय दराने तुम्ही रक्त पुरवठा करणार. म्हणजे इतर खाजगी हॉस्पीटलमध्ये त्यांच कॉस्टली असत. आम्ही इमारत, पाणी, लाईट पुरवतो त्यामुळे स्टाफ तुमचा मशिनरी तुमची काय दराने रक्त पुरवठा करणार. याचा विचारणा करायची आहे. तुम्ही मंजुरी दिल्यानंतर टेंडर काढणार. आता कोणत्या पद्धतीने आपण करायच. याचा ठराव आहे. आणि ते जे मागवल ते उपयोगाच नाही. त्या पद्धतीने चालणार नाही. हे सामाजिक संस्थेला द्याव लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही आधी टेंडर मागवल.

**मा. आयुक्त :-**

मागवल म्हणजे मशिनरी आम्ही बसवणार. फक्त चालवण्याच टेंडर द्यायच.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यावेळी तुम्हाला मा. महासभेची मंजुरीची आवश्यकता वाटत नव्हती. आता तुम्हाला मंजुरीची आवश्यकता वाटते. डॉ. चकोर यांच्याकडे मी गेलो आणि त्यांना विचारल की, हे रक्तपेढीच काय? तर ते बोलले मला माहितच नाही.

**दिपक खांबित :-**

आता नविन अटीशर्तीने ठरवायच.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्हाला वाटत मी चुकीच बोलतो ठिक आहे चुकीच बोलतो.

**दिपक खांबित :-**

आपल्याला काही माहिती नव्हत ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता तुम्ही धोरण ठरवता. एवढी घाई का झाली. त्यावेळी तुम्हाला निविदेची गरज नव्हती. महापालिकेची मंजुरीची गरज नव्हती. आज तुम्हाला मंजुरीची गरज का वाटली.

**दिपक खांबित :-**

म्हणून आपल्याला कळल ना टेंडर कसे येतात ते. त्यावरून आपण गोषवारा तयार केला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग ते पैसे फुकट गेले ना.

**राजेंद्र जैन :-**

आप जगह दे रहे है। यह हम किसी एन.जी.ओ. को देंगे। वह भी कमायेगा। जब कोई प्रायव्हेट नर्सिंग होम या प्रायव्हेट क्लिनिक चलाता है तो उसको कमसे कम उसको कमाने के लिए सेटल्ड होने के लिए ५ साल लगते है। वह लोन वगैरे लेता है। हम उस एन.जी.ओ. को जगह दे रहे है। और साथमे पुरे मिरा भाईंदर नगरपालिका की गुडवील दे रहे है। की उसका नाम होगा। उसको पेशन्ट मिलेंगे तो उसको पेशंट कहासे मिलेंगे उसकी चिंता नही है। उसको जगह मिल रही है। मेरा बोलना यह है की जगह नही जाये। हमारा नाम दिया जाये। लकीन पानी का चार्ज दिया जाए। इलेक्ट्रीकसिटी का चार्ज दिया जाये। और कोईभी मशिन कोई भी सायटीक जो उपकर नही दिया जाये। क्योंकी वहॉपर कमाने के लिए आनेवाला है। कारण यह है की, आरोग्य विभाग मे एक सर्व्हे नही किया है की, पुरे मिरा भाईंदर मे महिने के लिए कितने ब्लड लगते है। मै आपको एक्झाम्पल देता हुँ। अगर हम यह माने की १०० ब्लड की बॉटल मिरा भाईंदर मे लगती है। अगर १०० बॉटल लगती है यानी के १ बॉटल का प्रायव्हेट मे १४०० रू. लगता है। १०० मे से अगर २० लोगो को बी.पी.एल. है और ८० लोग ए.पी.एल. होगे अगर हम १०० मे से २० लोगो को फ्रि दे दे तो खर्चा सिर्फ २८०० बढता है। और ८० लोगो को ३० टक्के देदे तो कुल मिलाके कॅल्क्युलेशन ऐसी है की, मिरा भाईंदर महे अगर हम १०० लागो को कॅश पेमेंट मे करते है तो हार्डली ६०००० रू. देना पडता है। जब की हमको पुरा पुरा पैसा बिना किसी व्यवस्था के देना है। ६०,०००/- रू. देकर हम महिनेका छुट्टा पाते है। यहा करोडो का खर्चा करके हाथी सिर पे बांधोगे। इसलिए मै बोल रहा हु की हम जगह दे नही रहे है। हम गुडवील दे रहे है। इसके अलावा कुछ भी नही दिया जाये। इलेक्ट्रीक सिटी हमे चार्ज करेंगे क्योंकी वह कमायेगा। पाणी कम चार्ज के कमायेगा। और कोई भी इन्स्ट्रमेंट हमारा देना हमको नही होना चाहिए। अगर हम मिरा भाईंदर का पैसा बचाना चाहते है तो यह कदम होना चाहिए।

**पिठासिन अधिकारी :-**

ठिक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे. म्हणजे काय? त्यांनी सिस्टम घ्यायच नाही का?

**प्रकरण क्र. ५१ :-**

मिरा रोड येथिल रूग्णालय इमारतीत रक्तपेढी चालविण्यासाठी अशासकिय संस्थांना चालविण्यास देण्याकरिता विचार विनिमय होणेबाबत.

**ठराव क्र. ५२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये रूग्णालयाची इमारत बांधून तयार झालेली आहे. सदर इमारतीत तळमजल्यावर रक्तपेढी सुरू करणे प्रस्तावित आहे. रक्तपेढीतील अंतर्गत बांधकाम जवळपास पूर्ण झालेले आहे. तसेच रक्तपेढी चालविण्यासाठी आवश्यक 1. Central Drugs Standard Control Organization Govt. of India 2. State Blood Transfusión Council Govt. of Maharashtra यांची परवानगी घेण्यात आलेली आहे.

सदर रक्तपेढी रूग्णालयाच्या सोबत चालू करणे गरजेचे आहे. ही रक्तपेढी अनुभवी अशासकीय संस्थेस योग्य त्या अटीशर्तीनुसार चालविण्यास दिल्यास आर्थिक बचत होईल. तसेच त्यांच्या अनुभवाचा फायदा महापालिकेस होईल.

तरी अशासकीय संस्थेस रक्तपेढी सुरू करणेकरिता आवश्यक जागा, अखंडीत विज जोडणी, पाणी जोडणी, दुरध्वनी जोडणी, फर्निचर (टेबल, खुर्ची, रॅक्स), वातानुकुलन यंत्रे, उपकरणे व साहित्य, संगणक सुवीधा महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात याव्यात तसेच विज, दुरध्वनी यांचे मासिक देयक, द्रावणे तपासणी किट्स इतर आवश्यक सर्व साहित्य व परवाने मंजूरी अशासकीय संस्थेने पुरवठा करून रक्तपेढी सुरू करावी

व त्यासाठी रक्ताचा कमीत कमी दर देणा-या अशासकीय संस्थेस रक्तपेढी चालविण्याची जाहिर निविदा राज्यस्तरिय, जिल्हास्तरिय जास्त खप असणा-या दैनिकात प्रसिध्दी कराव्यात. तसेच महानगरपालिकेच्या दाखल रूग्णांना रक्तपेढीनी मोफत रक्त पुरवठा करण्यात यावा व इतर महानगरपालिका हद्दीतील रूग्णांना कमीत कमी दरात रक्त पुरवठा करावा याबाबत ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५२, मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीत हॉस्पीटल, शाळा, कॉलेज व सार्वजनिक सोईसुविधा करिता वापर करण्यात येणा-या इमारतींना वाढीव चटईक्षेत्र मिळणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण १९ महसूली गावांचा समावेश असून एकूण क्षेत्र ७९४०.५६ हे. आहे. त्यापैकी २१३४.७९ हे. क्षेत्र हे मंजूर विकास योजना प्रमाणे विकसनशील (Developable) क्षेत्र आहे.

सदर विकसनशील क्षेत्रापैकी बहूतांश भाग हा सि.आर.झेड. ने तसेच सॉल्ट विभागाच्या जमीनीनी बाधीत होत आहेत. तसेच मंजूर विकास योजनेत एकूण ३८६ आरक्षणे असून त्यापैकी १५६ आरक्षणे सि.आर.झेड. ने बाधीत होत आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका ही मुंबई व ठाणे महानगरपालिकेच्या लगत असल्याने शहराचा विकास झपाट्याने होत आहे. लोकसंख्या वाढीचा वेग शहराचा दशकातील २९७% असा आहे. आजमितीस शहराची लोकसंख्या सुमारे १० लक्ष इतकी आहे. महानगरपालिका क्षेत्रात लोकसंख्येच्या मानाने अद्यावत हॉस्पीटल, शाळा, कॉलेज नाहीत. तसेच विकसनशील क्षेत्र सि.आर.झेड. सॉल्ट विभागाने प्रभावित असल्यामुळे फक्त २५% इतकेच क्षेत्रावर विकास होवू शकतो. शहरात हॉस्पीटल, शाळा, कॉलेज, सार्वजनिक सोईसुविधा विकसीत करण्याकरिता आवश्यकते प्रमाणे जमीन उपलब्ध नाही. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार शासनाने दि.०८/०२/२०१० अन्वये निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार हॉस्पीटल बांधणेकरिता वाढीव म्हणजे ३.० (म्हणजे मुळ मंजूर १.० + वाढीव १.० + वाढीव १.०) चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध झाल्यास मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना वाढीव लोकसंख्येप्रमाणे जास्त प्रमाणात सोईसुविधा उपलब्ध होवू शकतील. सदर विषयाच्या अनुषंगाने हॉस्पीटल, शाळा, कॉलेज, सार्वजनिक सोईसुविधा करिता इमारतींना ३.० चटईक्षेत्र निर्देशांक मिळावा असा विकास नियंत्रण नियमावलीतील क्र. ३३/२ क्रमांने शासकीय, सार्वजनिक संस्था तसेच नोंदणीकृत धर्मदाय ट्रस्टच्या वैद्यकिय इमारतीसाठी शासनाच्या मान्यतेने अतिरिक्त एक वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. मुंबई उपनगरातील अंधेरी ते ठाणे जिल्ह्यातील डहाणू या परिसरात अद्यायावत व सुसज्ज असा दवाखाना / हॉस्पीटलची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे नागरीकांची वैद्यकियदृष्ट्या अत्यंत गैरसोय होत आहे. मिरा भाईंदर शहर हे मुंबई महानगरपालिका क्षेत्रास लागून असून १० लक्ष लोकसंख्याचे वाढते शहर असून मिरा भाईंदर शहरात अद्यायावत व सुसज्ज असे हॉस्पीटल असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सद्यस्थितीत अनुज्ञेय असलेल्या २.० चटईक्षेत्र निर्देशांक अजुन १.० वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक मिळण्यासाठी काही संस्थांची विनंती आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता खालील बाबींची पूर्तता करणा-या संस्थांना सद्यस्थितीत अनुज्ञेय असलेल्या २.० चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा अजुन वाढीव १.० चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यात यावा.

१) भूखंडाचे क्षेत्र कमीत कमी ४०००.०० चौ.मी. असावे.
२) असा भूखंड कमी कमी १५.०० मी. रुंदीच्या रस्त्यांवर स्थित असावा.
३) सदर दवाखाना / हॉस्पीटल कमीत कमी २०० खाटांचा आवश्यक आहे.
४) सदर हॉस्पीटल मल्टीस्पेशलीस्ट असणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे तरतूद परिपत्रकाद्वारे ३३/२ मध्ये सामाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ फेरबदल करण्याची कारवाई करण्यात यावी. वरील प्रमाणे फेरबदलाची सर्व वैधानिक कारवाई करण्यासाठी तसेच प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर करण्यासाठी मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अधिकार देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे मौजे, स.क्र. ५०६, ५०७/१पै. मध्ये आ.क्र. १८३ (दवाखाना व प्रसुतिगृह) या जागेतील नियोजित बांधकाम परवानगी मधील अट क्र. ३४ मध्ये सुट देण्याबाबत.

विषयांकित प्रकरणी मंजूर विकास योजनेतील आ.क्र. १८३ (दवाखाना व प्रसुतिगृह) या आरक्षणाचा विकास करण्यासाठी जमीन मालकांस म्हणजेच मे. दी उमराव इंस्टीट्युट ऑफ मेडिकल सायन्स ॲन्ड रिसर्च यांना नियमाप्रमाणे परवानगी देण्यात आली आहे. त्यामध्ये सदर आरक्षण दवाखाना व प्रसुतिगृह यासाठी असल्यामुळे आरक्षणाच्या १०% इतके बांधकाम क्षेत्र दवाखान्यासाठी व रुग्णालयासाठी संख्याच्या एकूण खाटांपैकी १५% खाटा आग्रहाप्रमाणे नगर परिषदसाठी उपलब्ध करुन देण्यात यावे, अशी अट परवानगीमध्ये नमुद करण्यात आली होती.

मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षण दवाखाना व प्रसुतिगृह साठी असून सदर आरक्षणाचे विकासकाचे माध्यमातून सर्वसाधारण जनतेस आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे हा महत्वाचा उद्देश आहे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार संस्थेस आरक्षणाचे कारणामुळे ठराविक आकाराचे बांधकाम करुन ते महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन उर्वरीत आरक्षणाचे जागेवर लगतच्या वापर विभागाप्रमाणे रहिवास / वाणिज्य वापर सुध्दा करता येवू शकला असता, तथापी, अर्जदार संस्थेने तसे न करता सदर जागेवर रुग्णालयाचे बांधकाम प्रस्तावित केले असून, सदर संस्थेचा सदर हेतू पाहूनच यापूर्वी शासनाने या ठिकाणी रुग्णालयाचे बांधकामास अनुमती दर्शविली आहे. प्रस्तुत आरक्षणाचे समावेशक आरक्षणाचे माध्यमातून विकासाबाबतची तरतूद नियम क्र. ९, टेबल क्र. ३ मधील अ.क्र. V (I) मध्ये नमुद आहे. त्यातील शेवटची बाब खालीलप्रमाणे आहे.

The Municipal Corporation may hand over the Dispensary & Maternity Home, Community Centre / Hall or Primary Health Centre to a Public Organisation for operation & maintenance of terms decided by it.

मौजे भाईंदर पूर्व, स.क्र. ५०६, ५०७/१पै. मध्ये आ.क्र. १८३ (दवाखाना व प्रसुतिगृह) या जागेतील बांधकाम **"रुग्णालय"** म्हणून झालेले आहे. त्यामुळे शहरात अद्यावत व सुसज्ज दवाखान्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे. तसेच समावेशक आरक्षणाचे माध्यमातून आरक्षणाचा विकास जागेवर झालेला असून त्यामध्ये दवाखानाचे क्षेत्र महानगरपालिकेने घेवून चालवणे व्यवहारीक होत नाही.

सदर संस्था ही धर्मदाय नोंदणीकृत असून विरार - वसई ते मिरा भाईंदर क्षेत्रात मोठे रुग्णालय नसलेने मिरा भाईंदर क्षेत्रातील नागरीकांना तातडीचे उपचाराकरिता बोरवली येथे जावे लागते. सदर स्वयंपूर्ण रुग्णालय मिरा रोड येथे होत असलेने आ.क्र. १८३ चे नामनिधान **"रुग्णालय"** असे करावे व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विहीत कार्यवाही प्रशासनाने करावी. तसेच मुळ मंजूर बांधकाम प्रस्तावातील दवाखाना व प्रसुतिगृहाच्या १०% बांधकाम क्षेत्र हस्तांतरण व १५% राखीव खाटा महानगरपालिकेस ठेवणेची अट रद्द करण्यात येत आहे.

त्यानुसार आयुक्तांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार विकास योजनेत व विकास नियंत्रण नियमावलीतील आवश्यक ते बदल प्रस्तावित करणेस ही महासभा मंजूरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता जो ठराव मांडण्यात आला तर हा विषय काय आहे? एक विषय असा आहे की, मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावली हॉस्पीटल शाळा कॉलेज व सार्वजनिक सुखसोयी म्हणजे संडास बाथरूम आणले त्याला पण ३ एफ.एस.आय. आहे. सार्वजनिक सोय म्हणजे मार्केट बांधल त्याला तीन म्हणजे हे आहे काय? विषय काय टायटल काय आणि ठराव काय? ठरावामध्ये आरक्षण वगैरे बरेच सांगितले. हा विषय तुमच्या गोषवाऱ्यात आरक्षण कुठे म्हटलच नाही की, पर्टीक्युलर आरक्षणाला ३ एफ.एस.आय. द्या. बाकीच्या आरक्षणाला देवू नका. की पर्टीक्युलर आरक्षणाला विकसित करायच आहे. विषय काय आहे? ठराव काय आहे? जो विषय आहे तो सर्वांना सरसकट ३ एफ.एस.आय. लावा. असा विषय आहे. मग, त्याच्यात स्पेशली हेच आरक्षण आहे. आणि त्यालाच तो विषय लागु आहे. अस कस होईल. पिठासिन अधिकारी म्हणून आपली ही एक जबाबदारी होती की, विषयाप्रमाणेच तो ठराव झाला पाहिजे. सर्व साधारण सर्वच जेवढे हॉस्पीटल असतील, शाळा असतील, कॉलेज असतील, चांगल आहे. जे पण हॉस्पीटल बांधतात, शाळा बांधतात, कॉलेज बांधतात त्यांना वाढीव एफ.एस.आय. मिळाला पाहिजे. हे सगळ चांगल आहे आणि विकास नियमावलीमध्ये तशा प्रकारची आपल्याला बदल करणे आवश्यक आहे. अस असताना पर्टीक्युलर सर्व्हे नंबर चा प्रस्तावीत प्रशासनाने कुठे केल? त्यांच्या गोषवाऱ्यामध्ये अस कुठे ही म्हटल नाही की, अमुक सर्व्हे नंबर मध्ये अमुक आरक्षण क्रमांकामध्ये अमुक ३ टी.डी.आर. द्याव किंवा ३ एफ.एस.आय. द्यावा म्हणून अस काही नाही. मला या ठिकाणी एक सांगा की, आम्ही उठा बशा किती काढायच्या. एकदा विकास नियंत्रण नियमावली बनवली जशी आली तशी मंजुर केली ९१ ला. फायनल आराखडा झाला तेव्हा बनवली. त्याच्यानंतर या

शहराला टी.डी.आर. लागू झाला तेव्हा बनवली आता २ वर्षापुर्वी आम्ही विकास नियमावली बनवलेली ती बनवल्यानंतर डेप्युटी डायरेक्टर कडे त्याची सुनावणी झाली. सुनावणीमध्ये आम्ही जे काही प्रस्तावित केल होत ते किती मंजुर झाल किती मंजुर नाही झाल. त्याचा अहवाल कधी मा. महासभेला सादर केलाय नगररचना विभागाने. त्यांना काही गरज नाही. म्हणजे आम्हीच सगळ उकरुन काढायच का? आम्हीच शोधायच का? की, आमच्या शहराच इथे वाटोळे झालेले आहे, तिथे वाटोळ झालेल आहे. त्यांनी प्लान पास करून मस्तपैकी कैलासवासी किंवा स्वर्गवासी व्हायच ते पुढे त्यांनी ठरवाव. सध्यातरी ते स्वर्गात राहण्या सारखे राहतात. आणि मग जबाबदारी कोणावर टाकायची आमच्यावरती का? मग ती विकास नियंत्रण नियमावलीच काय झाल? त्याला काडी लावून पेटून टाकली का? घनकचऱ्याच्या प्रकल्पामध्ये का लावायची अजुन हे तुम्ही मा. महासभेत रिपोर्टींग का करत नाही. मा. महासभेकडून तुम्ही सगळे ठराव पास करून घेता. की, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये असे बदल तसे बदल पाहिजेत आणि आम्ही करून दिल्यानंतर सुनावणी लागली. सुनावणीमध्ये आम्ही प्रस्तावित केलेल जे शहराच्या फायद्यासाठी होत ते सुनावणीमध्ये उडवून लावल तेव्हा कधीही कुठल्याही अधिकाऱ्याने एक प्रकारच भाष्य या ठिकाणी केल नाही. आणि आज अचानक जाग आली की, ३ चटई क्षेत्र सत्र द्यायच आहे. मोडकळीस झालेल्या इमारती उद्यापासुन पाडायला लागतील. तुम्ही त्याच्यासाठी काय केल? आज खरा मोठा प्रश्न तो आहे. कितीतरी इमारती पडायला आलेल्या आहेत. पण तुमचा २ पेक्षा जास्त एफ.एस.आय. नाही. आम्ही अडीच कि ३ एफ.एस.आय. ची मागणी केली होती. त्याच्याशी जास्त एफ.एस.आय. घेता येत नाही. तो पण गर्दीच्या ठिकाणी म्हणजे जिथे जास्त दाटाची लोकवस्ती असेल त्या ठिकाणी तो वाढीव एफ.एस.आय. अव्हेलेबल आहे. मग त्या लोकांच काय करायच? हा विषय नेमका कशासाठी घेतला आहे की, पर्टीक्युलर आरक्षणाच्या फयद्यासाठी घेतलेला आहे की, सर्व साधारण, सगळ्या नागरिकांच्या भल्यासाठी हा घेतलेला आहे. याचा अर्थ प्रशासनाने आम्हाला करावा ना आणि पहिल्या विकास नियंत्रण नियमावलीच काय झाल? नेमक त्यांनी काय एक्सेप्ट केल आणि काय एक्सेप्ट नाही केल? हे तरी नगररचना विभागाने सांगाव की, ३ चा एफ.एस.आय. आम्ही मागितला होता पण त्यांनी ३ चा एफ.एस.आय. नाही दिला मग किती दिला? आणि सुनावणी कधी झाली? माहिती का दिली नाही? आणि ह्याच्यात नेमक कुठल्या आरक्षणासाठी ठराव मागताय.

**भगवती शर्मा :-**

मला या ठरावामध्ये सुचना ॲड करायची आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. २६३ टाउन हॉल व ड्रामा थिएटर करीता आरक्षित आहे. सदर आरक्षण जमीन मालकानी विकसित करण्यासाठी मागणी केली आहे. याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तथापी शासनाने महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत सदर आरक्षण जमीन मालकाने समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून आरक्षण विकसित करणे संदर्भात तरतूद नसल्याने सदर प्रस्तावाचा सद्यस्थितीत विचार करता येत नाही असे महानगरपालिकेस कळविलेले आहे.

तरी सदर आरक्षण क्र. २६३ समावेश आरक्षणाच्या तरतूदी अन्वये करुन घेण्याकरीता MRTP Act 1966 मधील कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास ही सभा मान्यता देत आहे. मा. आयुक्त यांनी पुढील सर्व कार्यवाही पार पाडून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**जुबेर इनामदार :-**

माझ्या या ठरावात सुचनेचा सुद्धा समावेश करण्यात यावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय काय आहे? आता ३७ मध्ये सब आरक्षण तुम्ही...

**पिठासिन अधिकारी :-**

सन्मा. सदस्य प्रशांत पालांडे तुम्ही बोला.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, मिरा रोडच १८३ नंबरच आरक्षण क्र. जो आहे. तिथे जे बांधकाम चालू आहे. त्याच्याबद्दल एक महाराष्ट्र शासनाच अरबन डेव्हलपमेंट डीपार्टमेंटची एक ऑर्डर आहे. खालची लाईन वाचतो. प्रोव्हाईडेड दॅट फॉर द हॉस्पीटल बिल्डींग विच फुलफिल फॉलॉविंग ॲडीशनल क्रायटेरिया ॲन्ड ॲडीशनल एफ.एस.आय. अपटू मॅक्झीमम २०० ऑफ द ओरिजनली परमिसेबल एफ.एस.आय. शॉल बी अलाउड वीथ क्लीअर ॲप्रुवल ऑफ गर्व्हरमेंट स्पष्ट ऑर्डर आहे. मला नगररचनाच्या अधिकाऱ्यांना विचारायच आता सध्या स्थितीत तिथे काय परिस्थिती आहे? बांधकाम किती झालेले आहे?

**उत्तरेश्वर लोंढे :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. हा विषय सभागृहापुढे येताना शाळा, हॉस्पीटल आणि सार्वजनिक जागा यासाठी ३ एफ.एस.आय. आलेला होता. हा ७ जानेवारीला मा. महासभा होईल अशा दृष्टीने मी त्यावेळेला रजेवर होतो पण तो विषय आलेला आणि तो विषय आपल्याकडे तसाच सर्क्युलेट झाल्यामुळे नवीन गोषवारा देता आला नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

विषय आला होता, म्हणजे पर्टीक्युलर कोणी दिला होता? अ,ब,क,ड,ई..

**उत्तरेश्वर लोंढे :-**

त्यानंतर ८ फेब्रुवारी २०१० ला महाराष्ट्र शासनाने एम.आर.टी.पी. च्या ३७ (१) नुसार निर्देश उमराव जान इन्स्टीट्युट साठी दिलेला आहे. आपण ज्या सर्व्हे नंबरचा उल्लेख केला तो उमराव जान इन्स्टीट्युट साठी त्यांनी निर्देश दिल्याप्रमाणे ९० दिवसाच्या आत आपण हा विषय मा. महासभेपुढे घेवून तो पाठवा. आणि त्याच्यामध्ये ३ एफ.एस.आय. त्यांनी करावा. असे शासनाने निर्देश दिले आणि आपण मा. महासभेने ३७ ची कारवाई करावी. अस ८ फेब्रुवारी २०१० म्हणजे आपली विषय पत्रिका तयार झाल्यानंतर आपल्याला आदेश आलेला आहे. त्यामुळे त्या ठरावामध्ये आला असेल. काल परवा दिवशी माझ्याकडे पत्र आलेल आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, तिथे बांधकामासाठी सद्यस्थितीत काय परिस्थिती आहे.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

सद्यस्थितीमध्ये त्याठिकाणी २ एफ.एस.आय. बांधकमा आपण परमिशन शासनाच्या ह्याच्याने ते दिलेले आहे. हॉस्पीटल म्हणून शासनाने त्याला २ एफ.एस.आय. वाढीव मान्यता दिलेली आहे. म्हणजे अे प्लस वन च त्याच प्रमाणे त्याला परमिशन दिलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

२०० टक्के त्यांनी वाढीव बांधून झालेल आहे की, व्हायच बाकी आहे.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

बाकी आहे.

**प्रशांत पालांडे :-**

बांधलेल नाही.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

२ एफ.एस.आय. च बांधलेल आहे.

**प्रशांत पालांडे :-**

तिसरे बांधायच बाकी आहे.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

त्यांना वाढीव १ एफ.एस.आय. पाहिजे. त्यासाठी शासनाकडे त्यांनी हे केलेल आहे

**प्रशांत पालांडे :-**

ते काम केलेल नाही का? अस मी विचारले.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

त्याठिकाणी जावून मी तपासणी करून आपल्याला सांगेन.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आज विषय पत्रिकेवर आलेला आहे...

**उत्तरेश्वर लोंढे :-**

जो विषय आहे तो डायरेक्टीव्ह ह्याचा आहे. वाढीव बांधकाम त्याठिकाणी आहे की, नाही. शासनाचे जे डायरेक्टीव आहे त्याप्रमाणे केल.

**प्रशांत पालांडे :-**

८ तारखेची शासनाची ऑर्डर आहे. त्याच्या अगोदर झालेल आहे की नाही. अस विचारतो.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

तपासणी करून आपल्याला माहिती देतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

विषय काय आहे? तुमचा जनरल विषय शाळा, कॉलेज, हॉस्पीटल आणि या डायरेक्शन तुम्हाला कधी आल्या? विषय पत्रिका निघाल्यानंतर.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

८ फेब्रुवारीला.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी तुम्हाला परत तो प्रश्न विचारतो. की, तुम्हाला कुठल्या बुद्धीमान माणसाने सांगितल की, हा विषय घ्या. आणि पुर्वी तुम्हाला बुद्धीला कधी पटल नाही की, आपल्या विकास नियंत्रण नियमावलीची वाट शासनाने लावून टाकली म्हणून आणि आमच्या रहिवाश्यांची पण वाट लावून टाकली. आम्हाला पुढे गरज नाही. आमच्या बिल्डींग पडतील ना तेव्हा ३० माणसांच्या किंवा २० माणसांच्या लाथा मारून बाहेर हाकलू आणि १० लोकांना सांगू की तुम्ही इथे रहा. कारण आम्हाला वरती एफ.एस.आय. बांधायची परवानगी नाही. अस कोण बुद्धीमान माणूस आहे त्याच मला नाव सांगा हा विषय घ्यायला कोणी सांगितल.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

साहेब जो विषय आहे तो विषय पर्टीक्युलर सर्व्हेनंबरचा नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी तुम्हाला विषयाच बोललो. सर्व्हे नंबर ठरावात नाही आला म्हणून तुम्हाला विचारल. उमराव ओस्तवाल कोण आहे ते मला माहिती नाही. मी तुम्हाला विचारतो तुम्हाला जेव्हा डायरेक्टींगच्या हिशोबाने तुम्ही जर विषय घेतला असता तर मी मानल असत की, गर्व्हमेंटचे डायरेक्टीव्ह आले. तुम्हाला तो ठराव करण आवश्यक आहे. कारण ३७(१) चा तो अर्थच आहे. गर्व्हरमेंटने डायरेक्शन द्यायच. ३७(२) खाली तुम्ही ठराव करायचा. ३७ (३) खाली पुन्हा त्यांनी फायनल करायचा. हे गर्व्हरमेंटचे डायरेक्टीव आहेत. पण गर्व्हरमेंटचे डायरेक्टीव यायच्या अगोदर तुम्ही हा मा. महासभेच्या अजेंडावर विषय घेतला म्हणजे कोणीतरी बुद्धीमान दिव्य पुरूष ज्याच या शहराच मोठ स्वप्न असेल.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

साहेब, मला या विधान परिषदेचे सदस्य आहेत त्यांनी मला आणि आयुक्त साहेबांना चर्चेला बोलावल होत आणि गर्व्हरमेंटच्या याच्यामध्ये पण गेलो होतो. शेंडे साहेबांकडे त्यावेळेस हे फाईल डायरेक्टीव्हसाठी सी.एम. साहेबांकडे होती आणि त्यांनी म्हणाले हा ऑलरेडी डायरेक्ट येणार आहे आणि आपण विषय घ्यावा म्हणून हा विषय ऑलरेडी दिलेला होता. ७ जानेवारीच्या मा. महासभेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हाला धन्यवाद. तुम्ही येणाऱ्या काळाच नियोजन करतात. सध्या चाललय काय? त्याची वाट लागली ते जावू दे. मी त्याच्याबद्दल म्हणत नाही. पण तुम्ही हा विषय डायरेक्टच घ्यायचा घेता ना. कोणाच्या इन्स्टीट्युटला चांगल काम करतात त्याला विरोध करण्याच कारण नाही. मग, लपवा छपवी कशाला करायची. आज ही तुम्हाला डायरेक्शन आले. मला वाटते आजही सभागृहात कोणाचा विरोध नसेल. तुम्हाला आमच्या आमदाराने सांगितले की, हे तुम्ही करा तर बॅकडेटेड मध्ये तुम्ही जातत कशाला? आणि मग, परत त्याची उडका उडकी केली की आता किती बांधकाम झाल आता कीती पाहिजे. मग त्याच्यामध्ये खोलात आपल्याला कशाला जायच? आपण नियमानुसार घ्या ना. डायरेक्टीव्हच्या आधारावरती तुम्हाला विषय घेता येतो. आता इथे तुम्ही ब्लॅन्क घ्या. ब्लॅन्क ठराव घ्या. तीन एफ.एस.आय. क्षेत्र आम्ही मंजुर करतो. म्हणजे ते सगळ्यांना लागल. इन्स्पाईट ऑफ द डायरेक्टीव आजच्या तारखेला डायरेक्टीव्ह तुम्हाला आले नाही. पण आम्हाला गरज वाटते की, ३ एफ.एस.आय. देण्याची गरज आहे. ह्याच्यामध्ये इन्क्ल्युड करा की, जुन्या इमारती, मोडकळीस आलेल्या इमारती. त्याच पुर्नविकास करण्यासाठी असाच प्लेन ठराव घ्या. या सर्वांना ३ एफ.एस.आय. लागू करावा. म्हणजे ऑटोमेटीक तो ॲप्लीकेबल होतो. कुठल्याही संस्थेला. जेव्हा तुम्ही पर्टीक्युलर म्हणता तेव्हा तुम्हाला पर्टीक्युलर विषय आणावा लागेल. असा विषय कशाला देईल. विषय काय आणि तुम्ही सांगता काय? हे अस लपवा छपवी करू नये. तुम्ही चांगली व्यक्ती आहात. तुमच अतिशय चांगल आहे. आणि मला अस वाटत की, ह्याच्यामध्ये काहीतरी गोलमाल आहे. म्हणूनच अस उलट सुलट झाल आणि ठराव झाल्यानंतर लक्षात आल. आम्ही कोणाच्या वैयक्तीक फायद्यासाठी जर विषय आणत असू तर मग, शहराच पण बघा. शहरामध्ये सगळ आहे. कोणीही असु दे. जो शहरात आहे त्याच भल झाल पाहिजे. कोणाचीही संस्था असू दे चांगल काम करतात. त्यांचे भले व्हाव. मग, सगळ्यांचा सरसकट ठराव घ्याना.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

साहेब, पहिला ठराव तसाच आहे. आतमध्ये ३ एफ.एस.आय. सर्वांसाठीच आहे. आणि ह्याच्यासाठी वेगळे डायरेक्टीव ह्या ठरावामध्ये ॲड केल.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही डायरेक्टीव प्रमाणे गेले तर तुम्हाला शाळा, कॉलेजेस घेता येत नाही. त्यांनी स्पष्ट काय म्हटलय. त्यांनी स्पष्ट म्हटलय हॉस्पीटलसाठी म्हटलय आणि तिथे संस्थेच नाव टाकल. उमराव इन्स्टीट्युट ऑफ मेडीकल ठिक आहे. त्याच्यासाठी गर्व्हमेंटने डायरेक्शन दिले तर त्याच्यावर मा. महासभेला ठराव करायला काहीही हरकत नाही. पण तुम्ही विषय आणता सर्व शाळा, कॉलेज, हॉस्पीटल हे डायरेक्शन आहेत फक्त हॉस्पीटलच्या बाबतीत एक काहितरी करा ना. एकतर तुम्ही हाच विषय घ्या हाच ठराव घ्या नाहीतर मग हा विषय घेतला तर सर्वांनाच ३ एफ.एस.आय. लागू होतो.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, विचार असा केला होता की, इंडीव्हीज्युअल करण्याऐवजी गावात शाळा, कॉलेजेस आणि इतर हॉस्पीटलांनाही लागू व्हाव. इंडीव्हीज्युअल संस्थेला न देता सर्वांना लागू व्हाव ह्या दृष्टीने तो विषय घेतलेला होता. पण हा विषय घेतल्यानंतर हे आल की, इंडीव्हीज्युअलला तेवढा फायदा देण्याऐवजी सर्व संस्थेला फायदा व्हावा हा हेतु होता. त्यापाठीमागे शाळा, कॉलेज आणि इतर लोक हॉस्पीटल बांधकाम चालू आहे किंवा येणार हॉस्पीटल कोणी बांधणार असतील त्यांना ही लागू व्हाव. आणि फक्त रिझर्व्हेशन पुरते लागू नाही राहाव. रेसीडेन्शीअल झोन मध्ये जरी कोणी हॉस्पीटल काढल तरी त्यांना ३ एफ.एस.आय. द्यावा. या हेतुने हा विषय आणला होता.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, रेसिडेन्शीअल मध्ये हॉस्पीटल प्रत्येक इमारतीमध्ये रेसिडेन्शीअल साठी जागा हॉस्पीटलची म्हणून सांगतील, दाखवतील आणि एक्स्ट्रा एफ.एस.आय. बिल्डींगसाठी घेतील.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, जुन्या मोडक्या इमारतीच आपण काय करणार?

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये चॅरीटेबल ट्रस्ट संस्था म्हटल.

**प्रकाश दुबोले :-**

तुम्ही आता काय बोलतात की, रेसिडेन्शीअल एरियामध्ये जरी हॉस्पीटल होणार असेल त्याना ही द्याव.

**मा. आयुक्त :-**

त्यांना क्षेत्राच बंधन आहे ना.

**प्रकाश दुबोले :-**

नाही. साहेब कस आहे एखाद रेसिडेन्शीअल इमारत चार मजली असेल तो म्हणणार एक माळा मी हॉस्पीटलसाठी देणार.

**मा. आयुक्त :-**

ते नाही चालणार, पुर्ण बिल्डींग हॉस्पीटलची पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, जुन्या मोकळ्या इमारती आहेत त्याच काय करणार.

**मा. आयुक्त :-**

मिनिमम ४ हजार मीटर.

**जुबेर इनामदार :-**

४ हजार स्क्वेअर फिट असायला पाहिजे आणि कमीत कमी २०० बेडचे हॉस्पीटल असायला पाहिजे त्याचे स्पष्ट डायरेक्शन आहेत.

**मा. आयुक्त :-**

उद्या महापालिकेच टेंबा हॉस्पीटल चालू आहे. त्यांना पण आपोआप ३ मिळेल ना.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, जुन्या मोडक्या इमारती आलेल्या आहेत. त्यांना पण ३ पटीने एफ.एस.आय. द्या ते पण ह्याच्यामध्ये ॲड करा.

**पिठासिन अधिकारी :-**

सुचना ॲड करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य जुबेर इनामदार यांनी जो ठराव मोडला त्यामध्ये माझी अशी सुचना घ्या की ज्या जुन्या मोडक्या इमारती आहेत त्यांना पण ३ एफ.एस.आय. द्या.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये ठराव झाल्यानंतर पेपरला जाहिरात देवून ऑब्जेक्शन मागवण्यात येणार आहे. ऑब्जेक्शन, सजेशन आल्यानंतर तो विचारात ठेवून मग अंतिम मंजुरी करून शासनाकडे पाठवणार आहे. फक्त आम्हाला करायच बंधन आहे. पण आम्ही लवकर केल तर पेपरला येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आता भगवती शर्मा यांनी काय सुचना मांडली ती वाचून दाखवा ना.

**पिठासिन अधिकारी :-**

तुमचा विषय यामध्ये ॲड करून घेवू.

**प्रफुल्ल पाटील :-**

याच्यामध्ये मोडकळीस आलेले सगळे सरसकट ठराव घ्या आणि यानुसार येणार जेवढी जेवढी गर्व्हरमेंटची डायरेक्शन आहे. कुठल्याही इन्स्टीट्युट च्या बाबतीत त्या संदर्भात मा. आयुक्त साहेबांनी उचित निर्णय घ्यावा. एखाद्या डायरेक्शनच आम्ही निर्णय घेणार मग ते डायरेक्शन सभागृहामध्ये विषयानुसार पाहिजे ना. तुम्ही विषयानुसार नसलेले विषय कसे आम्हाला घ्यायला सांगतात.

**मा. आयुक्त :-**

ते काय मी इंडीव्हीज्युअल ठेवलेल नाही. सामुहिक ठेवलेल आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणूनच या विषयाला सामुहिक ठराव घ्या.

**मा. आयुक्त :-**

हा विषय नंतर आला परंतु आम्ही जो विषय ठेवला तो सामुहिक सर्वांना लागू व्हावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

आणि म्हणूनच हा सामुहिक एकच ठराव घ्या. जेवढी जेवढी शाळा कॉलेजेस किंवा हॉस्पीटल असतील. संस्थेच्या आणि मोडकळीस आलेल्या इमारती.

**मा. आयुक्त :-**

इमारती एक्झीस्टींग ना. सरसकट.

**प्रफुल्ल पाटील :-**

जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती.

**मा. आयुक्त :-**

त्यामध्ये धोकादायक इमारत आहे. त्याचा पण एरियस पाडण्यापुर्वी सर्टीफाय करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

हो बरोबर आहे.

**मा. आयुक्त :-**

सर्टीफाय केल्यानंतर तेवढाच एरिया मिळेल याची व्यवस्था करतो. कमीत कमी ते जास्त असेल म्हणजे जे मिळेल ते.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण ३ यासाठी केला की कोणीही बांधेल तर फुकट बांधून देणार नाही. २ एफ.एस.आय. असला तर त्याला एक ही पैसा भेटला तर तो बांधून घेईल.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे अडीच करायच.

**प्रफुल्ल पाटील :-**

यांना पण ३ एफ.एस.आय. द्या ॲक्च्युअली ३ पेक्षा जास्त आहे. खर म्हणजे नगररचना विभागाने आपल्याला ॲक्च्युअल माहिती द्यायला पाहिजे की, काही ठिकाणी चार, साडे चार आहे. मग त्याठिकाणी तिथल्या लोकवस्तीला ३० टक्के कमी घेवू दे. आणि चार तर आपण देवू शकत नाही. साडे चारपण आपण देवू शकत नाही.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

साहेब, एक विनंती करतो. आपण म्हटले की, आपण डी.सी.आर. च आहे. २८ ऑगस्टला डी.सी.आर. ३७ झालेला होता. तर त्याच्यामध्ये ३७ मंजुर आहे. त्याची कॉपी आपल्या सर्व सन्मा. सदस्यांना देण्यासाठी मी आपल्या नगरसचिवांकडे कॉपी दिलेली होती. तर ते आपल्याला सर्वांना पुरवठा करणार होते. पण त्यावेळेला आचार संहिता होती विधान सभेची.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या विषयावर मी सभागृहामध्ये चर्चा करायला सांगितली होती. पण तुम्ही नाही केली.

**उत्तरेश्वर लोंढे :-**

